Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचा[र]

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख ६ माहे सप्टेंबर सन १९१५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीनें रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कमीत कमी शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } S. Clements,
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं २

### अस्सल अंगुरी.

## हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।≈ ता. शुद्ध शिलाजीत. -।। तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिब्बती ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ३**
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाश्यांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळया**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तात्बडतोब दूर होतात किं रु. १०८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला नं. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ पासून. वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

मासिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासुद्धां १ रु० ८ आणे. वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधी प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

### जाहीरनोटीस

जाहीर नोटीस मौजे शेंबबु॥ ता॥ मलकापूर व कसबे मलकापूर ता० मलकापूर या गांवचे य दुसरे ठिकाणचे सेट स[ावका]र व इतर लोकांस खालीं सही क[रणार] यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, [मौजे] सेंब बु॥ ता० मलकापूर येथील शेत [नंबर] २९ पैकीं पोट नंबर १ एकर [ ] गुंठे आकार रुपये ७८≡८३ हे शेत आमचे स्वतःचे खरीदीचे मालकीचे असून ते शेत आमचे वडील भावाची विधवा कृष्णाबाई जवजे गणेश इचे नांवानीं ती जिवंत आहे तों पर्यंत खाण्याकरितां दिलें आहे. तिजला खरीदी अगर गहाण देण्याचा अधिकार नाहीं. जर कारितां तीजपासून कोणी खरीदी वगैरे घेतल्यास ते गैर कायदेशीर होऊन फोकळ होणार. तिजला कोणी कर्ज वगैरे दिल्यास त्या कर्जाचा जबाबदार मी नाहीं. कळावें. ता०

सही

सही रंगो बाळाजी द० खु०
नो० नं० ३९०

### नोटीस

बेशमी कासम वल्लद हुसेन मुसलमान वस्ती भोकर ( भादली ) तालुका जळगांव मेरू जिल्हा खानदेशः—

यांसः---

या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी मजशी तल्लाख देऊन सोडून दिल्याप्रमाणें वागत आहां. तुमचे वर्तन मी तुमच्या घरीं येऊन राहण्यासारखें नाहीं. ७ वर्षे झालीं. तर आतां जनरिती प्रमाणें ७ वर्षांची खावटी व मेहर देऊन तुटलेला कब्जांबंध पूर्णपणें तोडून टाकावा ह्मणजे मीही आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें दुसरा योग्य मार्ग स्वीकारीन. याप्रमाणें सर्व गोष्ट पुरी करण्यास मी तुह्माला पंधरा दिवसांची मुदत देत आहे. इतक्यांत जर ही गोष्ट करणार नाहीं तर तुमचा गुपचूपपणा हाच दुसरा तल्लाख समजून तुमच्यावर कायदेशीर तजवीज चालवीन आणि या नोटिशीच्या खर्चासुद्धां सर्व नुकसानी भरून घेईन. कळावें ता. १-९-१९१५

सही.

खासदस्त मर्द शेककासम रा. जानोरी ( देशमुखाची ) ता. खामगांव तर्फे मुखत्यार बाप शेकगहबुब वा॥ जानमहमद नि. खुद कबुल दस्तुर शेकअबदुल्ला वा॥ मा॥ बडे सा.

नो. नं. ३९१

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरल्याचे, लिस्टफार्म पर्ध्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, } मॅनेजर
सदाशिवाश्रम, आकोलें }

### नोटीस

नोटीस बेशमी शेखबाबा वा॥ शेखटाक व शेखमहेताब वा॥ शेखलाल रा० कजबे पातुर्डा ता० जळगांव जि० बुलढाणा

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे राहते घराचे पूर्वे कडील भिंतीशीं शेतांतून जनावरें येण्याजाण्याचा नवीन रस्ता केला आहे. तरी असें केल्यापासून माझे घराचे भिंतीचें नुकसान होण्याचा संभव आहे. तरी असें न करितां तुह्मी आपले जुने रस्त्यांतून जनावरें नेण्या आणण्याची वहिवाट ठेवावी. सदर्हु नोटीस पावतांच ८ आठ दिवसाचे आंत वरील गोष्टीचा बंदोबस्त करावा. असें न करतां भिंतीचे नुकसानी बद्दल तुमच्याजवळून किंमत भरली जाईल. व मला त्रास झाल्याबद्दल तुमच्यावर कोर्ट मार्फत दावा केला जाईल. नोटिशीचा खर्च व कोर्ट खर्च सर्व तुह्मास द्यावा लागेल. कळावें. ही नोटीस ता. २१-८-१९१५ रोजी दिली.

सही

१ सैय्यदअब्बास वा॥ सैय्यदगफुर मु. राहणार पातुर्डा ता० जळगांव जि० बुलढाणा द० खु०
नो० नं० ३९२

…यास आह्मी
… आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल
ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं,
चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबा-
बदार आहों. माल रोखीनें अगर व्ही.
पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर
एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर

नो. नं १६३

## पत्रव्यवहार

### इजारदार व इनामदार सभा

### यवतमाळ.

#### वार्षिक सभा.

(ता० २१-८-१९१५ इ. रोजीं सभेंत झालेल्या कामांचा गोषवारा.)

यवतमाळ येथें नुकत्याच बांधून तयार झालेल्या इजारदार व इनामदार सभेच्या भव्य व सुंदर दिवाणखान्यांत इजारदारांची सभा ता. २१-८-१९१५ इ. रोजीं सायंकाळीं चार वाजतां भरली होती. सभेस जिल्ह्यांतील सर्व तालुक्याचे मिळून सरासरी ६० इजारदार हजर होते. या दिवाणखान्यांत हीच पहिली सभा ह्मणून येथील लोकप्रिय डेप्युटि कमिशनर मि. चापमन साहेब यांस मुद्दाम सभेस निमंत्रण केलें होतें. साहेब बहादूर हे रा. विश्वनाथपंत कुळकर्णी डि. सुपरिंटेंडेंट आफ लँड रेकार्ड यांचे सह सभेंत दाखल झाल्यावर सभेच्या ठरीव कार्यक्रमास सुरुवात झाली. अध्यक्षस्थान रावसाहेब बळवंत रामचंद्र लांडगे इजारदार सभेचे व्हाईस चेअरमन यांनीं स्वीकारिलें. त्यांच्या थोड्याशा प्रास्ताविक भाषणानंतर सभेचे एक सेक्रेटरी रा. काणे यांनीं सन १९१४।१५ इ. सालच्या सभेच्या कामाचा रिपोर्ट छापून काढलेला वाचून दाखविला. त्यानंतर सभेचे दुसरे सेक्रेटरी रा. मार्तंड सखाराम हजरनवीस बी. ए. एल. एल. बी. वकील इजारदार घोडदरा यांनीं (अ) आपल्या सरकारास चालू महायुद्धांत यशश्चिंतन करण्याचा, (ब) पूर्ण जयापर्यंत युद्ध सुरू ठेवण्याच्या निश्चयास पाठिंबा देण्याचा, (क) या आणिबाणीचे प्रसंगीं सर्व इजारदारांनीं सरकारास मदत करावी अशाबद्दल सूचना करण्याचा आणि (ड) अशी मदत आजपर्यंत ज्या ज्या इजारदारांनीं सरकारास केली आहे …ांचें त्यांचें अभिनंदन करण्याचा, असा …ंगी राजनिष्ठेचा ठराव सभेपुढें मांडून …चे समर्थनार्थ योग्य भाषण केलें. त्यावर … दत्तोपंत काणे यांनीं पुष्टीदाखल फार …ंक व सुरस भाषण केलें. ते ह्मणालेः– … युद्धास कित्येक लोक भारतीय युद्धाची … देतात पण मला यास राम राव… युद्धाची उपमा द्यावीशी वाटते. … साध्वीला बलात्कारानें हरण करून … रावणानें तिला लंकेच्या अशोक … टाकिलें. त्या रावणाचें पारिपत्य करून सीताशुद्धि करणें व पृथ्वीतलावरील हा आसुरी अत्याचार बंद पाडणें या स्वातंत्र्याच्या व न्यायाच्या सात्विक बुद्धीनें श्रीरामानें रावणाशीं लढाई केली. व अखेर जय मिळविला. प्रस्तुत युद्धांत जर्मनी व आस्ट्रिया यांनीं मिळून विशेषसें कारण नसतां सर्व्हियावर शस्त्र उगारून व कांहीं एक कारण नसतां बेल्ज्यमचें स्वातंत्र्य नष्ट करून फ्रान्स व राशिया यांशीं लढाई आरंभिली. हें पाहून इंग्लंडासही केवळ स्वातंत्र्य न्याय यांच्या संरक्षणार्थ जर्मनीच्या विरुद्ध युद्धांत पडावें लागलें. श्रीरामचंद्राचा स्वतःचा पराक्रम मोठा होता तरी प्रसंगीं वानरासारख्या वन्य प्राण्यांचा त्यास फार उपयोग झाला. तद्वत यवतमाळ जिल्ह्यांतील इजारदार बहुतेक अशिक्षित आणि शेतकरी वर्गांतले आहेत तरी जिल्ह्यांतून जमा झालेल्या मदतीच्या रकमेंत त्यांचीच देणगी विशेष आहे व होईल अशी मला खात्री आहे. यवतमाळ जिल्ह्यांतील इजारदार लोक हे इतर हिंदी प्रजाजनाप्रमाणें स्वभावतः राजनिष्ट आहेतच. तरी ते सरकाराशीं अधिक कृतज्ञ असण्याचें कारण त्यांस याच सरकारांतून इजार गांवांतील पाटीलकी, पटवारीपणा, कोतवालकी वगैरे सर्व प्रकारचे वतनदारी हक्क मिळाले आहेत. वऱ्हाड व मध्यप्रांत यांतच काय पण हिंदुस्थानच्या दुसऱ्या बहुतेक भागांत जहागीरदार, देशमुख, देशपांडे वगैरे वतनदारांचे हक्क जुन्या सरकारापासून चालत आले आहेत. पण या ब्रिटिश सरकारापासून नवीन वतनदारी हक्क कोणास मिळालेले असतील तर ते यवतमाळ जिल्ह्यांतील इजारदारासच होत. हिंदुस्थानच्या लोकांची वतनदारी हक्कांसंबंधानें पूर्वापार प्रीति आहे व तसे हक्क इजारदारांस या सरकारांतून मिळाले ह्मणून ते सरकारशीं अधिक कृतज्ञ आहेत. या वतनदारी हक्काचे प्रीतीकरितांच ते इजाऱ्यांतील पटवारीपणाचा आपला हक्क सोडण्यास तयार होत नाहींत. असो, हें युद्ध पूर्ण जय येई पर्यंत चालविण्याचा सरकारचा जो निश्चय आहे तोही याच कारणा करितां इजारदारांस संमत आहे. याप्रमाणें भाषण झाल्यानंतर सर्वानुमतें हा ठराव पास झाला. या पुढें सभेच्या कार्यक्रमापैकीं, (१) इजारे गांवांतील पटवारीपणावरील इजारदारांचा हक्क, व त्यासंबंधीं सरकारी धोरण आणि (२) इजाऱ्यांतील शेतकऱ्यांना पाहिजे असलेली वनचराईच्या नियमांतील सवलत यांबद्दल दोन ठराव पास होऊन नंतर अध्यक्षांचें समारोपा दाखल भाषण झालें. त्यापूर्वीं रा. यशवंतराव देशमुख जहागीरदार तळेगांव यांनीं सभेचें कार्यक्षेत्र वाढविण्याच्या कांहीं सूचना केल्या पण त्यांच्या शक्याशक्यतेचा विचार करितां त्या कायद्याच्या व अमलबारीच्या दृष्टीनें अव्यवहार्य होतील असें बहुमतानें ठरल्यावरून त्यांनीं त्या परत घेतल्या. तरी रा. यशवंतराव यांनीं इजारदार सभेची उपयुक्तता व कार्यक्षमता वाढविण्याची जी इच्छा दर्शविली ती सर्वांस प्रशंसनीय वाटली व त्याबरहुकूम सभेचें दफतर ठेविलें जावें असें अध्यक्षांनीं सांगितलें.

अध्यक्षाचे भाषणानंतर मे० डेप्युटी कमिशनर साहेबांनीं जमलेल्या इजारदारांस उद्देशून हिंदींत भाषण केलें. त्यांनीं प्रथम सभेंत झालेलीं कामें, सभेच्या कामांची शिस्त व इजारदार लोकांची एकी याबद्दल संतोष व्यक्त करून ते इजारदारांच्या या नव्या दिवाणखान्यासंबंधानें ह्मणाले— "इजारदार सभेनें हा भव्य व सुंदर दिवाणखाना बांधून सर्व इजारदारांचें बळ एकत्र केलें आहे. ज्याप्रमाणें हृदयांत रक्ताचा मुख्य साठा असून तेथून त्यांतील रक्त हात पाय इत्यादि अवयवांना योग्य तऱ्हेनें पोहोंचत असतें त्याप्रमाणें इजारदाराचा हा बंगला इजारदार लोकांस सर्व तऱ्हेची मदत होण्याकरितां उपयोगांत येईल अशी मला उमेद आहे."

नंतर ते इजाऱ्यांतील पटवारीपणाच्या हक्काकडे वळले. त्यांनीं वणी व केळापूर तालुक्यांचीं सर्कलें पाडून तयार केलेले नवीन नकाशे दाखवून पटवाऱ्याचे कामांस सरकलें पाडून वगैरे काम करण्याच्या सरकारी पद्धतीस— हा इजारदारांचा हक्क कसा आडवा येतो हें दाखविण्याचा प्रयत्न केला. "इजारदार लोक वतनदारीचे हक्कांस कसे व कां चिकटून राहूं इच्छितात. हें रा. काणे यांच्या भाषणावरून मला समजलें. पण सरकारच्या सोयी गैरसोयीचाही इजारदारांनीं विचार केला पाहिजे," असें साहेब बहादूर शेवटीं ह्मणाले.

इतकें झाल्यानंतर पानसुपारी, हारतुरे, अत्तर, गुलाब, होऊन साहेब बहादुरांचे आगमनाबद्दल अध्यक्षांनीं आभार प्रदर्शित केले. व नंतर सभेचें काम आटपलें.

या प्रसंगीं जमलेल्या सर्व इजारदारांचा साहेब बहादुरासह दिवाणखान्याचे समोर व्यवस्थित रीतीनें फोटो घेण्यांत आला.

रामचंद्र गंगाधर भागवत
क्लार्क
इजारदार सभा यवतमाळ

---

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण वद्य १३ शके १८३७

## संत कवींची परंपरा.

आमचा महाराष्ट्र देश ( या ठिकाणीं हा शद्ब मराठीभाषा बोलणारांचा देश या व्यापक अर्थानें आह्मीं योजिला आहे. ) ईश्वराच्या विशेष कृपेंतला आहे किंवा निदान होता असें त्या देशाच्या इतिहासाचे खोल थर बारकाईनें पाहणारास सहज दिसून येईल. या देशाच्या इतिहासाचा अतिशय उज्वल व अतिशय चमत्कार वाटण्याजोगा भाग ह्मणजे या देशांतली संतकवींची परंपरा हा आहे. या परंपरेला प्रारंभ मुकुंदराजापासून एकदा झाला, येवढें काय तें सांगतां येतें. पण या परंपरेचें दुसरें टोंक अमुक असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. श्रीज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम, देवनाथ, दयाळनाथ, तुकाराम, सोहिरानाथ, वगैरे संतकवि या परंपरेंतलीं उज्वल रत्नें होत. हीं मराठी भाषा बोलणाऱ्या निरनिराळ्या प्रांतांत लोकांत जागृति उत्पन्न करण्याकरितां ईश्वरी योजनेनेंच विखुरलीं होतीं असें ह्मणावें लागतें. त्या योजनेंप्रमाणें ते आपआपलें अवतारकृत्य करून गेले. त्यांच्या अवतारकृत्याचा इतिहास लिहून ठेवणारा लेखक जरी अद्याप निर्माण झाला नाहीं, तरी लोकांच्या हृत्पटलावर, समाजाच्या विचारकेंद्रावर, राष्ट्रदेहांतल्या रक्ताशयावर त्यांच्या कृत्यांचा येवढा जबरदस्त परिणाम झाला आहे कीं या विभूति होऊन गेल्याला शें दोनशें वर्षें लोटलीं तरी महाराष्ट्रांत जो थोडा बहुत सजीवपणा हल्लींच्या अवनतिकाळांत राहिला आहे तो त्या संतकवींच्या अमृतवाणीचाच परिणाम निःसंशय आहे. या विभूति ह्मणजे राष्ट्रीय जीवनाचा जिवंत झराच होत. या उज्वल रत्नांपैकीं दोन तीन रत्नें आमच्या वऱ्हाड प्रांताच्या सुदैवानें त्याला प्राप्त झालीं होतीं. देवनाथ किंवा दयाळनाथ या सत्पुरुषांना आह्मी विदर्भवासी लोकांनीं आपलीं ह्मणणें ही एक प्रकारची संकुचित दृष्टिच आहे. कारण, सूर्य चंद्र जसे एकदेशीय नव्हेत, अमृत वर्षणारे मेघ जसे एकदेशीय नव्हेत किंवा साऱ्या पृथ्वीचा ताप हरण करण्याचा भार आपणावर घेणारा मारुत ज्याप्रमाणें एकदेशीय ह्मणतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें महाराष्ट्रभाषा बोलणाऱ्या साऱ्या जनसमूहाला अज्ञान तिमिरांतून काढून ज्ञानरूपी किरणांनीं प्रकाशित करणाऱ्या आणि त्यांचा त्रिविध ताप हरण करून त्यांना शांतिसुखोदधींत यथेच्छ विहार करण्याचें भाग्य प्राप्त करून देणाऱ्या या संतांना एकदेशीय ह्मणतां येणार नाहीं. आह्मी एकदेशित्वाच्या दृष्टीनें या संतांकडे पाहतों ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. ज्ञानेश्वर, तुकाराम, किंवा नामदेव यांच्यासारख्या

अपवादभूत विभूति सोडून दिल्या, तर बाकीच्या संतांच्या विषयीं विचार करतांना आमच्या आकुंचित मनांत त्यांच्या कामगिरी विषयींचे आकुंचित विचार आल्याशिवाय राहत नाहींत. सोहिरानाथासंबंधानें सावंतवाडी कडील प्रांतांत जी निःसीम पूज्यबुद्धि व अभिमान दृष्टीस पडतो, तितका तो पुणे प्रांतांत दिसत नाहीं; किंवा एकनाथाविषयीं मोगलाईतल्या लोकांमध्यें जो प्रेमातिरेक आढळतो तसा वऱ्हाडांतल्या लोकांत आढळेल अशी अपेक्षा करणें वाजवी नाहीं. त्याच प्रमाणें देवनाथ व दयाळनाथ या गुरुशिष्याच्या जोडीसंबंधानें वऱ्हाडांतल्या लोकांमध्यें जो अभिमान आढळतो तसा सातारा कोल्हापूर प्रांतीं तो आढळला नाहीं तर आह्मी तेथील लोकांना नांवें ठेवणें न्यायाचें होणार नाहीं. वस्तुतः धर्म, नीति व साहित्य या तिघांच्या राज्यमर्यादा इतक्या विस्तृत आहेत कीं त्यांचा निर्देशच करतां येत नाहीं, पण वर सांगितल्याप्रमाणें आमची संकुचित व क्षुद्रदृष्टि तो निर्देश करावयास लावते. एकाअर्थीं हें ही समाजाच्या हिताचेंच आहे. कारण त्याच्या योगानें त्या त्या प्रांताला त्या त्या संताविषयींचा अभिमान वाटूं लागून त्यामुळें त्या संताविषयींच्या कर्तव्याची जाणीव ही त्याबरोबर होते. ही जाणीव साहित्याच्या अभिवृद्धीला एकंदरीनें पोषकच झालेली आहे असें आजपर्यंतच्या अनुभवावरून ह्मणतां येतें. हा अभिमान व ही जाणीव उत्पन्न झाल्यामुळेंच मराठी भाषेंत अनेक उत्तमोत्तम ग्रंथांची भर पडली आहे. ही जाणीव वाडीकरांत होती ह्मणूनच सोहिरानाथाच्या कवितेचे ४ व्हाल्यूम वाडीकर मंडळीनें द्रव्यानिधि जमवून प्रकाशित केले पराडकरासारख्या लक्ष्मीच्या अवकृपेंतल्या माणसाच्या हातून या जाणीवेमुळेंच मोरोपंताच्या कृतीचे ६ व्हाल्युम आतांपर्यंत बाहेर पडले, व या जाणीवीमुळेंच आमच्या प्रांतांतले तिघे विद्वान् गृहस्थ देवनाथासारख्या वैदर्भकवीचा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचें कंकण हातांत बांधून महाराष्ट्र वाङ्मयाची सेवा करण्यास पुढें आले आहेत. बुलढाण्याचे सबजज्ज रा. अच्युत सीताराम साठे एम. ए. बी. एल, दर्यापूरचे वकील रा. सुंदर निळकंठ पांडे व रा. पांडुरंग सखाराम अग्निहोत्री या तिघा गृहस्थांनीं 'वैदर्भकाव्यसंग्रह' प्रकाशित करण्याचें महत्कृत्य शिरीं घेऊन या संग्राहांतलीं दोन उज्वल रत्नें ह्मणजे दयाळनाथाची कविता व देवनाथाची कविता महाराष्ट्रवाचकांस उपलब्ध करून देण्याचें श्रेय घेतलें आहे. पैकीं दयाळनाथाच्या कवितेच्या पुस्तकासंबंधानें आह्मी आपला अभिप्राय दोन वर्षांपूर्वी तें पुस्तक प्रसिद्ध झालें त्याच वेळीं दिला आहे. देवनाथाच्या कवितेचें पुस्तक नुकतें गेल्या महिन्यांतच प्रसिद्ध झालें. तें वाचून प्रकाशकाच्या कामगिरीसंबंधाचें आमचें जें मत झालें आहे तें आह्मी पुढचे लेखांत देऊं. देवनाथाच्या कवितेचें परीक्षण आह्मांस कर्तव्य नाहीं. तो आमचा अधिकार ही नाहीं. कारण, देवनाथासारखे प्रासादिक प्रतिभासंपन्न आणि अवतारी पुरुष कोणीकडे आणि आमच्यासारखे ज्ञानलवदुर्विदग्ध खर्डे घासे लेखक कोणीकडे! देवनाथांच्या संबंधानें आमच्याठायीं इतकी पूज्यबुद्धि आहे कीं त्यांची योग्यता खरोखर तुकाराम, रामदास, एकनाथ, ज्ञानेश्वर इ० संतमालिकेंत बसविण्यासारखी होती काय? किंवा त्यांच्या कवितेंतील संताच्या वाणींतली ओजस्विता, प्रतिभा, प्रज्वलितपणा, गांभीर्य, तीव्रता, मोहकता, सौंदर्य, इ. गुण किती अंशानें वास करीत होते, असे प्रश्न कित्येक वेळां चिकित्सक पंडित करीत असतात, त्याच्या संबंधानें ही आह्मांस विशेष कांहीं सांगावयाचें नाहीं. कारण, आह्मी या प्रश्नांचें कसेंही उत्तर दिलें तरी कोणत्यानाकोणत्या पक्षाकडून आह्मांला अंधत्वाचें सर्टिफिकीट मिळावयाचेंच. आह्मी या संतकवीला श्रेष्ठ वाचा मान दिला तर तो अभिमानजन्य अतएव अंधदृष्टीनें दिलेला ह्मणून कित्येक ह्मणणार. बरें, चिकित्सकांसारखें मत दिलें तर आमच्या अभिमानाला त्यामुळें बाध येणार. तेव्हां या भानगडींत न पडतां साठे प्रभृति संपादकांनीं वैदर्भ काव्यसंग्रहाच्या या द्वितीय गुच्छाच्या संपादनाचें कार्य कोणत्याप्रकारें बजाविलें आहे तें सांगून त्यांच्या कृतीचा अल्प परिचय आमच्या वाचकांस करून देण्याचें ठरविलें आहे. इतकें सांगून हा प्रस्ताविक लेख पुरा करतों.

---

## बॉय स्काउट ऊर्फ बालस्वयंसेवक

समाजाची किंवा देशाची परिस्थिति जशी बदलत जाईल त्या मानानें तेथील शिक्षणपद्धतींतही फरक झाल्यास त्या देशाचें पाऊल प्रगतीच्या मार्गांत राहतें. शिक्षण ह्मणजे केवळ पुस्तकी विद्या नव्हे, तर भावी नागरिक तयार करण्याचें तें साधन आहे. पूर्वींच्या काळीं पुस्तकी विद्या थोडी असे. तथापि उत्तम नागरिक किंवा ग्रामीण होण्यास लागणारें शिक्षण शाळेंतून नव्हे तर व्यावहारिक पद्धतीनें दिलें जात असे. गांवांत सार्वजनिक उत्सव असले कीं त्या उत्सवाची तयारी करण्यांत गांवांतले विद्यार्थी उत्सुकतेनें पुढें होत असत. कोणाच्या घराला आग लागली तर गांवांतली तरुण मंडळी जिवाकडे न पाहतां ती विझविण्यास झटत. प्रेताच्या स्मशानयात्रेला जातींतल्या प्रत्येक घरचा एकेक मनुष्य आलाच पाहिजे, असा निर्बंध अद्याप ही खालच्या जातींतून दिसून येतो. या चाली ह्मणजे सार्वजनिक उपयोगाचें कृत्य करण्याचें शिक्षण देणाऱ्या शाळाच होत. पण या जुन्या चाली मोडल्या, आणि त्या जागीं तशा उपयुक्त नव्या चाली आल्या नाहींत. यामुळें समाजाची मोठी हानि झाली आहे. ही हानि आतां सरकारी अधिकाऱ्यांच्या नजरेस येऊन कांहीं ठिकाणीं शाळांतून बॉय स्काउटस् ह्मणजे बालस्वयंसेवक तयार करण्याची पद्धति प्रचारांत आणण्याचे यत्न होत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. बंगाल्यांत दोन वर्षांपूर्वी महापुरानें कित्येक गांवें वाहून गेलीं त्या वेळीं व गतवर्षीं कुंभमेळ्याचे वेळीं अनेक बंगाली तरुणांनीं विलक्षण स्वार्थत्याग व प्रशंसनीय धाडस दाखविलें. वस्तुतः हें वळण प्रत्येक विद्यार्थ्याला लागलें पाहिजे. विद्यार्थी ह्मणजे नुसते ग्रंथ कीटक होतां कामाचे नाहींत. त्यांना उत्कृष्ट नागरिक किंवा ग्रामीण व्हावयाचें आहे व सार्वजनिक कामें करावयाचीं आहेत हें लक्षांत घेतलें तर मुंबईसरकारनें तिकडील हायस्कुलांतून बालस्वयंसेवक तयार करण्याची जी पद्धति सुरू केली आहे तिचा प्रचार सर्व प्रांतांतून होणें श्रेयस्कर आहे असें दिसून येईल.

---

## महाराष्ट्रीय ग्रंथकार

मुंबई येथें नुकत्याच निघूं लागलेल्या 'चंद्रिका' मासिक पुस्तकानें महाराष्ट्रांतल्या ठळक ठळक ग्रंथकर्त्यांचा परिचय करून देण्याचा स्तुत्य उपक्रम केला आहे. आमच्या महाराष्ट्रसमाजाच्या विचारांस वळण लावणाऱ्या ग्रंथकर्त्यांची वास्तविक योग्यता किती आहे व त्यांनीं हातीं घेतलेल्या कामांत त्यांना कितीसें यश प्राप्त झालें आहे याचा अंदाज करण्यास तें एक साधन होईल, आणि याच दृष्टीनें 'चंद्रिका' कर्त्यांनीं हें सदर उघडलें असेल तर ते करून देत असलेला परिचय फारच संक्षिप्त असतो, व त्यामुळें त्यांचा उद्देश सिद्धीस जाण्याचा विशेषसा संभव नाहीं हें त्यांस आह्मांस सुचवावयाचें आहे. चार पानांत सहा ग्रंथकारांच्या ग्रंथांच्या नांवापलीकडे काय देतां येणें शक्य आहे? नुसत्या ग्रंथांचीच यादी पाहिजे असेल तर ती बुकसेलरांच्या क्याटलागांतून किंवा मासिक पुस्तकांच्या वर्ष अखेरच्या लेखांच्या अनुक्रमणिकांतून मिळेल. 'चंद्रिका' कर्त्यांनीं जें करावयास पाहिजे तें हें कीं त्यांनीं एकेका वेळीं एकेक ग्रंथकार घेऊन त्याच्या लेखांची दिशा कोणती आहे व त्या लेखांचा परिणाम दृश्य किंवा अदृश्य रीतीनें समाजावर कोणता घडला आहे हें मार्मिक रीतीनें व कोणाची भीड न धरतां दाखवावें. असें केलें तरच या लेखांपासून इष्ट कार्याची सिद्धि घडण्याचा संभव आहे.

---

## देशी संस्थानांची जागृति.

इंग्रज सरकारच्या कृपेनें देशी संस्थानिकांची परचक्राच्या भीतीपासून मुक्तता झाली आहे व त्यांनीं मनावर घेतल्यास त्यांना आपला सगळा वेळ, उत्साह शक्ती व द्रव्य याचा उपयोग रयतेच्या सुखवृद्धीकडे खर्चतां येईल. पण बडोदें, ह्मैसूर वगैरे दोनचार संस्थानिकांनीं या भाग्याच्या संधीचा योग्य फायदा करून घेतला आहे व अधिक करून घेण्याची बुद्धी जागृत ठेविली आहे. बडोदें संस्थानच्या अधिपतीचें लक्ष शिक्षण प्रसाराकडे विशेष आहे. ह्मैसूर उद्योगधंद्यांच्या वाढीकडे अधिक लक्ष घालीत आहे. ग्वालेर शेतीसुधारणेच्या मागें लागलें आहे. देवास ग्रामपंचाइतीच्या पुनरुज्जीवनार्थ यत्न करीत आहे. बाकीचे संस्थानिक काय करीत आहेत याची खबर जगाला नाहीं. इंदूरच्या संस्थानिकांच्या मनांत पुष्कळ व चांगल्या गोष्टी करण्याची प्रेरणा प्रादुर्भूत झालेली दिसते परंतु या प्रेरणेला दृश्य स्वरूप येत नाहीं. इंदूरास विद्याप्रसारार्थ कांहीं विशेष तजविजी होणार आहेत असें ऐकतों. येथील महाराजांचे मनांत बडोद्याच्या सेंट्रल लायब्ररीसारखी संस्था काढवयाची आहे. मराठी व हिंदी वाङ्मयास उत्तेजन देण्यासाठीं ५००० रुपयांची रकम ही त्यांनीं काढून ठेवल्याचें कळतें. लहान मुलांना हंसत खेळत शिक्षण देणारी एक संस्था काढण्याचाही विचार चालला आहे, संस्कृत कॉलेज उघडण्याची कल्पना अद्याप गर्भावस्थेंत आहे. या व दुसऱ्या कित्येक गोष्टी वरून श्रीमंत होळकर सरकारच्या तरुण डोक्यांत उदात्त कल्पनांचा प्रादुर्भाव होतो असें दिसतें. पण या कल्पनांना दृश्य स्वरूप येत नाहीं. याला कारण त्यांना योग्य सल्लागार व लायक अधिकारी यांची अनुकूळता जशी असावी तशी दिसत नाहीं. दृश्य स्वरूप मिळाल्याशिवाय नुसत्या कल्पनांना किंमत नाहीं, व भाग्योदयाच्या नुसत्या आशा लावून ठेवण्यानें रयतेची तृप्ति होत नसते हें तत्त्व महाराज साहेबांनीं लक्षांत घेऊन एकेक कल्पना मूर्त स्वरूपांत आणून सोडण्याची त्वरा केली पाहिजे.

---

## युद्धाच्या बातम्या.

गेल्या आठवड्यांत पश्चिमेकडील समर भूमीवर जरी विशेष ह्मणण्यासारखे जयपराजय कोणत्याच पक्षाचे झाले नाहींत तरी वायूच्या राज्यांत भयंकर खळबळ चालली होती. विमानांच्या लढायांना अधिक जोर आला होता. सहा जर्मन विमानांनीं पारिसवर हल्ला करण्याचा यत्न केला होता, पण तो फसला. आणखी दोन तीन ठिकाणीं जर्मनांनीं हवेंतून बांब टाकून स्त्रीहत्त्या व शिशुहत्त्या यांचें पाप जोडलें. या पापाचें प्रायाश्चित एका विमानाला ताबडतोब मिळालें. फ्रेंचांनीं त्यांचा पाठलाग करून एकाला अग्निसमर्पण केलें. दोस्तराष्ट्रांच्या विमानांनीं ब्रिक्सचूट येथील जर्मन लायनीवर बांब टाकून निरपराधी स्त्रियांना व अर्भकांना नव्हे तर मर्द शिपायांना ठार केलें. फ्रेंच वर्तमान पत्रांवरून असें कळतें कीं पश्चिमेकडे इंग्रजांनीं आपली हद्द बरीच पुढें सरकावली आहे. पूर्वेकडे राशीयाला लष्करी छक्केपंजे लढवावे लागतात, त्यांचें धोरण अज्ञ लोकांना न कळून राशीयाची पिछेहाट होत आहे असें त्यांना वाटतें. खरा प्रकार अगदीं उलट आहे. व्हिल्नापाशीं राशीयानें जर्मनांना अडवून धरलें आहे. एकदम पांच चार ठिकाणीं राशीयनांना मागें हटविण्याचा जर्मनांचा प्रयत्न आहे. पण राशीयन बहादुरीपुढें त्यांचें चालत नाहीं. एक दोन ठिकाणें ज्यांचें संरक्षण करणें विशेष फायद्याचें नव्हतें अशीं राशीयनांनीं आपण होऊन सोडून दिलीं. पण तीं सोडतांनासुद्धां जर्मनीला लूट सांपडूं नये किंवा मजबूत किल्ले वगैरे त्यांच्या हातीं लागूं नयेत ह्मणून राशीयनांनीं जाण्याचे अगोदर त्यांचा विध्वंस करून टाकिला होता. जर्मनीचा राशीयांत पुढें पुढें रेटीत जाण्यांत तीन हेतु असावेत असा तर्क आहे. एक पेट्रोग्राड घेण्याचा, दुसरा मास्को हस्तगत करण्याचा, व तिसरा राशीयाचें धान्याचें कोठार ह्मणून प्रसिद्ध असलेला दाक्षिणेकडील मुलुख घेण्याचा. पण हे तिन्ही हेतु सफळ न होतां जर्मनीच्या पापांचा मात्र घडा पुरा भरेल आणि मग दैवीचमत्कारानें सुद्धां जर्मनीचा अधःपात टाळतां येणार नाहीं असें तज्ञांचें मत आहे.

तिकडे इटालियन लोक आस्ट्रियाला शेरास सव्वाशेर भेटले आहेत. स्ट्रिनो दरींत त्यांनीं आस्ट्रियाचा चांगलाच धुव्वा उडविला, आणि शत्रूच्या यांत्रिक तोफा व दारूगोळा हस्तगत केला. दोन आस्ट्रियन किल्ल्यांचा ही नाश केला.

## इतर बातम्या.

आपल्या देशांतल्या कारखान्यांतून तयार होणारा सगळा दारूगोळा मित्रराष्ट्रांना—विशेषतः रशियाला—देण्याचा जपाननें निश्चय केला आहे.

सबमरीनच्या बाबतींत आपण आपलें धोरण फिरवूं असें जर्मनीनें अमेरिकेपाशीं कबूल केलें आहे. पण अमेरिकन लोक जर्मनीच्या सद्धेतूविषयीं साशंक आहेत. लुसिटानियाच्या बाबतींत बोलण्याच्या अगोदर अरोबिक बोटीच्या बाबतींत तुह्मी आपला कलंक धुवून काढा असें अमेरिकन लोक जर्मनीला ह्मणत आहेत. अगोदर जर्मनीनें अमेरिकेचें नुकसान भरून देण्याचें कबूल केलें आणि आतां त्या वचनांतून पळवाट पाहत आहेत.

जर्मनीचें इंग्लंडचें युद्ध सुरूं होण्याचे अगोदर पुष्कळ दिवस जगांत जेथें जेथें जर्मनीचीं व्यापारी जहाजें होतीं त्या सर्वांना युद्ध सुरू होणार आहे अशी नक्की बातमी होती असें कोर्टातल्या खटल्यांत आलेल्या पुराव्यावरून शाबीत झालें आहे. यावरून जर्मनीचा हा बेत फार जुना होता हें उघड होतें.

## जर्मनींतले हिंदी कैदी.

जर्मनींतल्या हिंदी कैद्यासंबंधानें पुष्कळ दिवस बातमी येईना, ह्मणून लोक फार काळजींत होते. पण आतां बर्लिन येथील अमेरिकन वकिला मार्फत समाधानकारक बातमी आली आहे. तिचा सारांश इंडिया पत्रावरून आह्मी देतों. वून्सडार्फ येथें ब्रिटिश इंडियनासाठीं एक नवी छावणी उभारली आहे. या ठिकाणीं निरनिराळ्या जातींच्या हिंदी लोकांना निरनिराळ्या बराकींतून ठेविलें आहे. यांत ९५ बलुची मुसलमान, १६० गुरखे, ६५ शीख, व ७१ ठाकुर आहेत. तीन मुसलमान आफिसरांसाठीं एक स्वतंत्र लहान खोली आहे. एकंदर सुमारें ४०० हिंदी शिपाई व ४ आफिसर येथें आहेत. यांना प्रार्थनेसाठीं स्वतंत्र जागा दिली आहे. आफिसरांना दर महा १० मार्क नांवाचीं नाणीं पगारादाखल मिळतात. पण ते अगदीं साधें जेवण जेवून शिल्लक उरते ती आपल्या शिपायांच्या कामाला लावतात. बराकी चांगल्या हवाशीर व स्वच्छ असून तेथें गर्दी नाहीं. शिपायांना कामें करावीं लागत नाहींत. गुरखे फुटबॉल खेळून दिवस काढीत आहेत. मुसलमानाकरितां एक मशीद बांधली आहे. प्रत्येक जातीसाठीं स्वतंत्र स्वैपाकगृहें आहेत. खाण्याला कणीक, बटाटे, तांदूळ, व आठवड्यांतून एकदा मटन मिळतें. लोक आनंदांत आहेत. जर्मन पाहरेवाले हत्यारबंद नाहींत. पत्रें व पार्सलें मिळण्याची व्यवस्था नुकतीच झाली आहे.

## हिंदुस्थानांतील बातम्या.

मुंबईचे सर महंमद युसफ इस्माएल या मुसलमान गृहस्थानें मुसलमान मुलांच्या उच्च शिक्षणाची सोय करण्यासाठीं ८ लक्ष रुपये मुंबई सरकारच्या स्वाधीन गतवर्षीं केले होते. पण स्वतंत्र मुसलमानांचें कॉलेज काढण्या इतका इंग्रजी शिक्षणाचा प्रसार त्या लोकांत झालेला नाहीं. ह्मणून प्रथम साष्टी येथें विलायतच्या नमुन्यावर व शिक्षणखात्याच्या डायरेक्टरांच्या हुकमतीखालीं हायस्कूल व बोर्डिंग काढून पुढें योग्य प्रसंगीं त्याला जोडून कॉलेज काढण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

यंदाचे वर्षीं डॉ० सर रवींद्रनाथ ठाकुर (टागोर), डॉ० जगदीशचंद्र बोस, डॉ. पी. सी. राय व महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री यांना कलकत्ता युनिव्हर्सिटीनें आपापल्या आवडीच्या विषयांवर व्याख्यानें देण्यासाठीं बोलाविलें आहे. एक दोन व्याख्याते विलायतेहून ही आणावयाचे आहेत.

मुंबईच्या डिप्रेस्ड क्लासेस मिशनचे सेक्रेटरी रा. शिंदे यांनीं व्हाइसराय साहेबाकडे पाठविलेला आपल्या संस्थेचा रिपोर्ट वाचून लार्ड हार्डिंज साहेबांनीं संतोषपूर्वक सहानुभूतीचें पत्र व २५० रुपयांची देणगी पाठविली आहे.

श्री. गायकवाड सरकारांनीं आपल्या संस्थानांतल्या शिक्षणाच्या स्थिती संबंधानें चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमली आहे.

औद्योगिक बाबतींत ह्मैसूर संस्थान झपाट्यानें मार्ग आक्रमण करीत आहे. तेथें चामड्याचा कारखाना चांगला चालला आहे. आगकाड्यांचा कारखाना काढण्यासाठीं १९९ चौरस मैलाचें रान संस्थाननें आंखून दिलें आहे. रोज तीनशे ग्रोस आगपेट्या तयार होतील येवढा कारखाना लवकरच उभारला जाईल. त्याला संस्थाननें भरपूर सवलती दिल्या आहेत. विजेनें चालणारे हातमाग लवकरच प्रचारांत यावयाचे आहेत. रेशीम तयार करण्याचें काम शिकविण्यासाठीं एक इटालियन आणिला होता. तो आपलें काम संपवून नुकताच परत स्वदेशीं गेला. अंतर्गत व बहिर्गत व्यापारासंबंधाचे आंकडे मिळविण्यासाठीं संस्थाननें स्वतंत्र व्यवस्था केली आहे.

बंगाल्यांत रेशीम तयार करण्याच्या उद्योगाचें पुनरुज्जीवन करण्याचें तेथील गव्हर्नरलॉर्ड कार्मायकेल यांच्या मनांत आहे.

## पोलीस नीतिसूत्रें.

आतांपर्यंतच पोलीस रिपोर्ट व सरकारी अधिकाऱ्यांचीं भाषणें यांचें सामान्य धोरण असें असे कीं पोलिसा संबंधानें कोणी प्रतिकूळ टीका केली कीं त्या टिकेला उत्तर ह्मणून असें सांगावयाचें कीं जशी जनता तसें पोलीस ! लोक गुन्हेगारांना छपविण्याचा यत्न करतात, त्याला पोलिसांनीं काय करावें ? व लोकांचा तरी विश्वास कसा धरावा ? या उत्तरानें टिकाकारांचें तोंड कदाचित् बंद होईल, पण त्यामुळें असलेल्या स्थितींत फरक पडणें अशक्य होतें. पण बंगालचे गव्हर्नर लॉर्ड कारमायकेल हे या विषयाच्या बुडाशीं गेले, आणि त्यांनीं परवा सरडा पोलीसस्कूलच्या विद्यार्थ्यांना उद्देशून जें भाषण केलें त्यांत ज्या पोलीस नीतिसूत्रांचा उल्लेख केला तीं सूत्रें आचरणांत येतील तर पोलिसाविरुद्धच्या तक्रारींचा एकदम नायनाट होईल अशीं तीं सूत्रें महत्त्वाचीं आहेत. त्यांना विचारी माणसांची मान्यता मिळण्याला त्यांचा नुसता उच्चार करणेंच पुरें आहे. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे तीं सूत्रें हीं आहेत—
१ पोलीस हे लोकांचे सेवक आहेत.
२ पोलिसांची इभ्रत राखणें हें अधिकाऱ्यांचें मुख्य कर्तव्य नव्हे, तर लोकांचा विश्वास संपादून त्यांचें सहकारित्व मिळविणें या गोष्टी सर्व अधिकाऱ्यांनीं मुख्यतः पाहिल्या पाहिजेत.
३ पोलिसांच्या इभ्रतीस जपण्यापेक्षां लोकांच्या स्वातंत्र्यास व हक्कास जपणें हें सरकारचें अधिक महत्त्वाचें कर्तव्य आहे.
४ कायद्याचा भंग करणारांनाच फक्त पोलिसचें भय वाटलें पाहिजे, इतरांना पोलीस आपले मित्र वाटतील असें पोलिसचें वर्तन पाहिजे. जर तसें वाटत नसेल तर त्यांच्या वर्तनांत कोठेंतरी चुकत आहे असें समजावें.
५ कोर्टांत आरोपीला गुन्हेगार ठरविण्यासाठीं पोलिसांची धडपड नसावी, तर कोर्टाला सत्य शोधून काढण्याचे कामीं पोलीस व लोक या उभयतांकडून ही मदत व्हावी.
६ हिंदीलोकांचे हेतु व इंग्लडमधल्या लोकांचे हेतु यांत फरक नाहीं; फरक आहे तो पोलिसच्या वर्तनांत आणि जनतेचा विश्वास संपादण्यांत प्राप्त होणाऱ्या यशांत आहे.
७ इंग्लंडांत पोलिसमध्यें सुधारणा झाली ती कायद्यानें घडवून आणिली नाहीं, तर पोलीसच्या वर्तनानें घडवून आणिली.

या सूत्रांवर भाष्य करण्याची अवश्यकता नाहीं. अवश्यकता जी आहे ती ही सूत्रें पोलिसांच्या हृतटलावर बिंबविण्याची आहे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—कानपूर लखनौकडे तीन दिवसांमध्यें २० इंच पाऊस पडून जलप्रलयाचीं संकटें ओढवलीं आहेत. त्याच्या उलट गुजराथ काठेवाड या भागाला पाऊस नसल्यामुळें दुष्काळाचीं चिन्हें वटारून पहात आहेत. अशा स्थितींत आमचा प्रांत भावी पिकांच्या आशेनें अधिक सुप्रसन्न आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. हवा चांगली शुद्ध, उत्तेजक व आरोग्यकारक आहे.

**प्लेग**— आकोल्याला उंदीर अतोनात मरत आहेत. आणि कधीं ६ कधीं ४ कधीं ३ या रितीनें दररोज प्लेगचे मृत्यु ताडफाड होत असतात. सर्व शहर खालीं होत चाललें आहे. व त्यामुळें हा रोग लवकरच निमेल असा रंग दिसतो. उमरावती, मुर्तिजापूर इ० गांवीं ही प्लेगाचा उद्भव तितक्याच जोराचा आहे.

आलिशान नामदार चीफ कमिशनर साहेब सरबेंजामिन राबर्टसन यांची स्वारी येत्या बुधवारीं नागपूराहून निघून त्याच दिवशीं यवतमाळला जाऊन पुनः परत धामणगांवला येईल. आणि गुरुवारीं सायंकाळीं मेलनें उमरावतीला स्वारि जाणार असून उमरावतीस मंगळवार सायंकाळ पावेतों मुक्काम होणार आहेत. आणि उमरावती नंतर पुढें खांडव्याला मुक्काम करून ता. १७ गुरुवार तिसऱ्या प्रहरा पर्यंत पचमढीला पोंचतील.

**प्राव्हिनशिअल कॉनफरन्सः**— नामदार रावबहादुर मुधोळकर यांचा विचार उमरावती येथें प्राव्हिनशिअल कॉन्फरन्स भरविण्याचा असून त्यासंबंधानें त्यांचा उद्योग जोरानें चालू आहे.

रायसाहेब नवगोपाळ सरकार एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस बुलडाणा येथें नेमून रा. रा. बाळकृष्ण भास्कर केकरे ए. अ. क. बुलडाणा यांस कमिशनर साहेबांच्या दफ्तरांत स्पेशल डयूटीवर नेमिलें.

**धक्काः**— येथील नाझर प्रकर्णाचा पहिला धक्का रा. रा. अमृत लक्ष्मण दिवे ऑडिशनल डिस्ट्रिक्ट जज्य उमरावती यांच्या पर्यंत पोंचला असून सध्या त्यांच्या संबंधानें चौकशी चालू आहे व त्यास कामावरून तहकूब केलें आहे. कोणचाही असला प्रकार मनुष्याला कांहीं काल थक्क करितो व संकटांचें आकाश अधिक काळेंकुट्ट दाखवितें.

**जर्मनवेडः**—ईश्वरदयाळ नांवाच्या शिवणी कडील एक मालगुजारानें आपल्या तीन कष्टांचे जीव गोळीबार घालून घेतले आणि गोळी घालण्याचें कारण तो असें सांगतो कीं जर्मन लोक माझा भोंवती वेढा देत आहेत अशा वेडानें मन इतकें वेडावलें कीं त्याच्या परिणामीं ३ प्राण बळी पडले. नामदार हायकोर्टानें त्याच्या फांशीची शिक्षा कायम केली.

**खूनः**— तऱ्हाळे ता. मंगरूळपीर येथील मारवाडी शेट धीवरचंद याचा तारीख ३ डिसेंबर रोजीं रात्रीं खून झाला होता. या वेळीं त्या गांवीं भरतभेटीची ह्मणून दरसाल जत्रा भरत असते. गुन्हा पत्यांत न आल्यामुळें तसाच पडून राहिला. पुढें येथील वकील रा. रा. गोपाळराव हातवळणे यांच्या घरीं गेल्या एप्रील महिन्यांत कांहीं दागिन्यांची चोरी झाली त्या चोरीचा तपास चालू असतांना या खुनाचा इत्थंभूत शोध लागला आणि मेहरबान पोलिस सुपरिंटेंडेंट साहेब रा. आर्चर्ड आदिकरून सर्व अधिकाऱ्यांनीं मोठ्या नेटानें व कौशल्यानें हा गुन्हा न्याय कोर्टांत आरोपी उभे करण्याच्या मजलेपर्यंत नेऊन पोंचविला. आरोपी नारायण पांडे हा मुख्य गुन्हेगार असून त्याला त्याचा भाऊ बापूराव व कृष्णा असे दोन साथीदार होते. हे दोघेही सरकारी माफीचे साक्षीदार होते आणि येथील सेशन कोर्टानें गेल्या सोमवारीं आरोपाला देहांत शिक्षा सुनावण्यांत आली.

## एकजीव झालेला हिंदुस्थान.

(मिसेस बेझांट यांनीं बनारस येथें सन १९१३ मध्यें दिलेल्या व्याख्यानाचा सारांश)

काणत्याही राष्ट्राच्या घटनेंत तीन अवस्था असतात. प्रथमतः देशांतील कोणी तरी विचारशील सत्पुरुष राष्ट्रैक्याची कल्पना काढतात व ती जनामध्यें व्यक्त करितात. नंतर ती कल्पना दुय्यम प्रतीचे पुढारी जनतेमध्यें लेखनद्वारा व व्याख्यानद्वारा जाहीर करून सार्वत्रिक करितात. व मग त्या कल्पनेची अम्मलबजावणी राष्ट्रांतील मुत्सद्दी घडवून आणतात, इटलीच्या इतिहासावरून ही गोष्ट स्पष्ट होते. प्रथम महानुभाव मॅझीनी यांनीं राष्ट्रैक्याची कल्पना काढली, ती दुसऱ्यांनीं सर्वतोमुखीं आणिली व गॅरिबॉल्डी सारख्यानीं ती कार्यक्षेत्रांत आणून सोडली. इटली व हिंदुस्थान यांचे स्थितींत एक मोठी तफावत आहे. इटलीमध्यें एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेस तेथील सरकार व धर्मगुरू हे प्रतिकूल होते तसें हिंदुस्थानचें नाहीं. एकजीव हिंदुस्थान व्हावा या कल्पनेस इंग्लंडांतील पुष्कळ उदारमतवादी गृहस्थ अनुकूल आहेत. व म्हणून इंग्लंडाच्या साम्राज्याखालीं हिंदुस्थानास स्वराज्य मिळावें, म्हणून माझी खटपट आहे. या व्यवस्थेनें इंग्लंड व हिंदुस्थान अंतर्व्यवस्थेसंबंधीं परस्पर पूर्ण स्वतंत्र राहून परराष्ट्रासंबंधींचें राजकारणापुरते मात्र एक राष्ट्र संघ उत्पन्न करूं शकतील.

हिंदुस्थान सांप्रतकालीं राष्ट्रघटनेच्या पहिल्या अवस्थेंतून पुढें आला आहे. एकजीव हिंदुस्थान, हिंदीराष्ट्र, ही कल्पना येथील सत्पुरुषांनीं काढल्यास बरीच वर्षें होऊन गेलीं. सांप्रत ती कल्पना सर्वतोमुखीं होऊन सर्वांचे हृदयांत वास करीत आहे. या कल्पनेच्या अम्मलबजावणीची तिसरी अवस्था येण्याचा सुमार आला आहे. व या अवस्थेंत घरपंगी विरोध पण वास्तवीक सहायक अशी पुष्कळ गोष्टींची आपणास मदत होत आहे. हिंदुस्थानचे माजी व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन यांच्या शिक्षण विषयक विशेषक पद्धतीमुळें हिंदुस्थानचे लोकांत विलक्षण जागृती उत्पन्न होऊन ते ज्यास्त कर्तव्यदक्ष झालें व त्यांनीं आपल्या सामर्थ्यावर हिंदु व मुसलमानी अशीं दोन विश्वविद्यालयें काढिलीं व अशा रीतीनें कर्झनसाहेबांचे पद्धतीबद्दल आपली असंमती योग्य व जोरदार रीतीनें जगाचे निदर्शनास आणून दिली. त्याचप्रमाणें इंग्रजग्रंथकारांनीं बंगाली लोकांची निर्भत्सना केली तर त्याच बंगाल्यांतील तरुणांनीं स्वयंसेवक होऊन कांहीं दिवसांपूर्वीं जलप्रलय झाला असतां स्वतःस तासचेतास कष्ट सोसून लोकांना मदत केली व सरकारी अधिकाऱ्यांचा धन्यवाद संपादन केला. अशा रीतीनें विरोधानें सामर्थ्य वाढतें व संकटकालापासून शांतीचे सुखाचा काळ येतो. आतां हिंदुस्थान एकजीव करण्याचें जें आपलें ध्येय तें साध्य करून घेण्यास आपण कोणते उपाय योजिले पाहिजेत तें पाहूं व या दृष्टीनें आजचें व्याख्यान हें कालच्या विषयाचा उत्तरार्धच आहे. पहिली बाजू अर्थात

### धर्म

होय. हिंदुस्थानातील अनेक धर्माच्या अनुयायांनीं सर्व धर्म हे आत्मोन्नतीच्या दृष्टीनें सारख्याच योग्यतेचे आहेत हें विधर्मी समाजांत वागविलें पाहिजे. श्रीकृष्णानींच म्हटल्याप्रमाणें 'ज्यामार्गाकरून लोक मजकडे येतील त्यामार्गानें मी त्याजवर अनुग्रह करावयास तयार आहे. ही भावना हृदयांत जागृत व दृढ करण्यास निरनिराळ्या धर्माचा तुलनात्मक अभ्यास अवश्य होवा. तसाच थिऑसफिकल वाङ्मयाचाही या बाबतींत चांगला उपयोग होईल व सर्व धर्म ईश्वरदत्त आहेत ही कल्पना दृढावेल. दुसरें अंग

### शिक्षण

होय. या बाबतींत हिंदुविश्वविद्यालयास माझी सूचना आहे कीं त्यानीं आपल्या विद्यालयांत सर्व धर्मांचे विद्यार्थी घ्यावे. धर्म भिन्न आहेत. त्याचप्रमाणें उपासना प्रकार व अन्नव्यवहार भिन्न आहेत. त्यांजबद्दल त्यांचे त्यांचें अनुयायांचा विशेष कटाक्ष आहे. तेव्हां सर्वांची उपासना एक होईपर्यंत व सर्वांचे अन्न उद्दिष्ट पदार्थांचेच होईपर्यंत धार्मिक शिक्षण अलग द्यावें व विद्यार्थ्यांचीं वसतिगृहें हीं निरनिराळीं ठेवावीं. त्या योग ज्या गोष्टींत भेद आहे तेवढ्या पुरती निराळी स्वतंत्र व्यवस्था राहून विद्यार्थ्यांचें व्यावहारिक शिक्षण व्यायाम, खेळ, वगैरे अन्य जीवनक्रम एके ठिकाणीं होऊन आपण सर्व एकाच हिंदमातेचीं लेकरें आहोंत ही कल्पना त्यांचे मनांत लहानपणापासून रुजेल.

दुसरी सूचना अशी आहे कीं त्यानीं त्या विद्यालयांत स्त्रीशिक्षणाची योग्य व्यवस्था अवश्य करावी. हिंदी स्त्रियांत सार्वजनिक कार्याबद्दल हौस व फिकीर नाहीं अशी तक्रार आहे. पण त्यांना जर योग्य शिक्षणच दिलें जात नाहीं, तर त्यांत त्यांचा काय दोष आहे? ज्याकाळीं हिंदी स्त्रियांना शिक्षण मिळत होतें त्या काळीं त्यांनीं राजकारणांत सुद्धां सल्ला दिल्याचें आपण पहात नाहीं काय? त्यांनीं तत्वज्ञानांत सुद्धां विशेष प्रगती केल्याचें आपण वाचीत नाहीं काय? आज सांप्रत काळांत सुद्धां दक्षिण आफ्रिकेंत हिंदी लोकांच्या स्त्रिया पुरुषांचे बरोबर निशस्त्र प्रतिकाराचे चळवळींत सामील झाल्या नाहींत काय? आपणांस देशभक्त गांधी साहेबांचे पत्नीची हकीकत माहीत नाहीं काय? हिंदुस्थानांतील स्त्रियांनींसुद्धां दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या भागिनींबद्दलची सहानुभूति सभा भरवून व्यक्त केली आहे. स्त्रियांचा प्रश्न म्हणजे अर्ध्या हिंदुस्थानचे प्रजेचा प्रश्न आहे व या अर्ध्या भागाचें सहाय झाल्याशिवाय हिंदुस्थान एकजीव होणें अशक्य आहे. पूर्वकालीन इतिहासाचा अभ्यास व मनन करा म्हणजे वर्तमान कालाची सिद्धी होईल. तिसरें अंग

### एक भाषा

होय. हिंदुस्थान एकजीव होण्यास भाषा एक झाली पाहिजे. जर आपणा सर्वांना इंग्रजी येत असतें तर काय सोय झाली असती. इंग्रजीचे अभावीं सद्रीय सभा शक्य नव्हती. परवां मी डाक्तरांचे नोंदणीचे बिलाविरुद्ध मुसलमानी हकीमांनीं भरविलेल्या सभेस गेले होते. येथें सर्व भाषणें उर्दूमध्यें झाल्यामुळें हिंदी श्रोते व वृत्तपत्रांचे रिपोर्टर कंटाळून निघून गेले. विचार प्रदर्शित करण्यास साधन भाषा आहे व ती एक असणें अत्यवश्य आहे. ती कोणती असावी ते तुम्ही स्वतः ठरविलें पाहिजे. ते ठरविण्याचें धाडस मी करीत नाहीं. उत्तरहिंदुस्थानांत हिंदी भाषा सार्वत्रिक आहे. व मी ती भाषा सर्व हिंदुस्थानची भाषा असावी असें सुचविल्यास तें आपणास रुचेल पण दक्षिण हिंदुस्थानचे लोक नाखुश होऊन 'नको नको' म्हणून ओरडत उठतील. माझ्या मतें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत व हिंदुस्थाताबाहेर निरनिराळ्या देशांत व्यवहारामध्यें इंग्रजी भाषाच उपयोगी पडण्यासारखी आहे. तिचा उपयोग सार्वजनिक कार्यांत व्हावा व सध्या होतही आहे. ती पृथ्वीचे पाठीवर सर्व ठिकाणीं व्यापारास व राजकारणास उपयोगीं पडेल. मात्र गृहकृत्यें प्राकृत भाषांतून चालावीं. रवींद्रनाथ टागोर सारखीं कविरत्नें जों पर्यंत बंगाली भाषेंत काव्य प्रबंध करीत आहेत, तों पर्यंत त्या भाषेची हयगय व्हावी हें कोणालाही रुचणार नाहीं. हीच स्थिती हिंदी, मराठी, उर्दू, कानडी, तेलगू, वगैरे प्राकृत भाषांची आहे. त्यांतील ग्रंथसमूह अमोल आहे व त्यांचें रक्षण होणें अत्यावश्यक आहे. मात्र त्या भाषांचा उपयोग खाजगी व गृहव्यवहारांतच होईल. शिवाय कोणत्याही देशांतील बहुजनसमाज हा प्राकृत भाषेहून अधिक ज्ञान संपादन करूं शकत नाहीं. हा प्राकृत भाषांचा प्रश्न हमत्वाचा आहे व विश्वविद्यालयांतून त्यांची उपेक्षा होणें गैरवाजवी आहे. तसेंच

### एक लिपी

हीं असणें फार फायद्याचें आहे. पुष्कळांना दुसऱ्या भाषा बोललेल्या समजतात. त्या करितां निरनिराळ्या प्राकृत भाषांची लिपी तरी एक झाल्यास फार मदत होईल. चवथें अंग

### एक राहणी

सर्वांनीं आपापल्या धर्माचीं मूलतत्वें पाळावीं पण देश व कालपरत्वें राहणीमध्यें जे आगंतुक भेद झाले आहेत त्यां विषयीं दुराग्रह ठेऊं नये. उत्तर हिंदुस्थानांत शेंडी समोर असते तर दक्षिणेकडे ती मागें ठेवितात. वस्त्रें नेसण्याच्याही तऱ्हा अशाच भिन्न आहेत. या गोष्टींचा धर्माशीं कांहीं ही संबंध नाहीं. हे भेद केवळ देश व काल परत्वानें भिन्न झाले आहेत.

### वर्णभेद.

त्वचेच्या रंगाची गोष्ट अशीच आहे. हिंदुस्थानांतील प्रांताप्रांतांतील लोकांचे चामडीचा रंग वेगळा आहे. ते मनांत विषमता उत्पन्न करीनासे झाले पाहिजेत. सध्याचे काळीं युरोपियन लोक गौरवर्णाचा फार दुरभिमान बाळगतात. त्या योगें आपणास कांहीं जन्मसिद्ध हक्क आहेत असें त्यांस वाटतें. पण तें अगदीं अप्रयोजक आहे. रंगभेदावरून राजकीय हकांमध्यें फरक करण्याचें अगर होण्याचें कांहीं कारण नाहीं. युरोपियन व हिंदी हे एकाच आर्यवंशाचे आहेत, त्यांच्यांत भेद करणें इष्ट नाहीं. शिद्दी व गोरे लोक निराळ्या मानव वंशांतील तरी आहेत. ते उत्क्रांतीचे दृष्टीनें मागें आहेत. तीही गोष्ट हिंदी लोकांची नाहीं. हिंदी लोकांना विषमतेनें वागविणें अगदीं अन्यायाचें आहे. त्यापासून साम्राज्यास खरा धोका आहे. त्याचे मनांत असंतोष व क्रोध उत्पन्न झाल्यास तो अग्नीसारखा धुमसत राहील. ज्या लोकांत शिक्षण, बुद्धिमत्ता व उत्क्रांति हीं सारखी व समसमान आहेत. त्या लोकांना हकही सारखेच असले पाहिजेत. इंग्लंडचे लोक रानटी व निर्वसन असतांना हिंदी लोकांनीं त्यांना वस्त्रें पुरविलीं आहेत. हिंदी लोकांना इंग्रजांनीं आदर दाखविला पाहिजे. मी इंग्रजांना त्यांच्याच पार्लमेंटमध्यें आपल्या मातृभाषेंत अडखळत अडखळत भांबावल्यासारखें बोलतांना पाहिले आहेत. ही राजसभेंतील सभासदांची गोष्ट. तेंच हिंदी गृहस्थ त्यांना परकी असलेल्या इंग्रजी भाषेंत बिनचूक पूर्ण वक्तृत्वानें बोलतांना किती तरी शेकडों आढळतात. अशा योग्यतेच्या राष्ट्रास विषमतेची वागणूक योग्य नाहीं.

अपूर्ण.

## हिंदुस्थान परकाराकडून काढण्यांत येणारें मुदतबंद कर्ज

पोष्ट आफिसा मार्फत कर्ज द्यावयाचें असल्यास तें कोणत्या अटीवर देतां येतें या संबंधीं नोटीस.

१ या सालीं सरकार निराळ्या स्वरूपाचें कर्ज काढीत आहे, व त्यावर शेकडा ४॥ टके व्याज देण्यांत येईल. ह्या कर्जाची पूर्ण फेड फार उशिरां म्हणजे सन १९२५ चे नोव्हेंबर महिन्यांत करण्यांत येईल. परंतु सन १९२० चे आक्टोबर महिन्या नंतर केव्हांही तें फेडून टाकण्याचा हक्क सरकारनें आपले स्वाधीन ठेविला आहे.

२ कलकत्ता, मद्रास, मुंबई व इतर मोठमोठीं शहरें येथून अर्ज येऊन मामुली पद्धती प्रमाणें ४ $\frac{1}{2}$ कोटींचें कर्ज आधींच जमा झालें आहे, आणि ह्या रकमेपुरतें तरी कर्ज घेणें आतां बंद करण्यांत आलें आहे. परंतु लहान रकमांनीं कर्ज देण्याची ज्यांची इच्छा असेल मग ते सेव्हिंग्स बँकांमध्यें ठेवी ठेवणारे असोत वा नसोत, अशा इसमांना सेव्हिंग्स बँकेचें कामकाज चालणाऱ्या अगदीं जवळच्या पोष्ट आफिसाचे मार्फत कर्ज देण्यासाठीं आणखी एक खास सोय देण्यांत येत आहे.

### कर्ज कसें द्यावें.

३ ता० ३० आक्टोबर पर्यंत केव्हांही पोस्ट आफिसाचे मार्फत अर्ज पाठवितां येतील.

४ अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांहून कमी नाहीं व शंभरांनीं बरोबर भाग तुटेल इतक्या रकमेसाठीं द्यावा. व कोणाही एकाच अर्जदारास ५००० हून जास्त रकमेकरितां केव्हांही अर्ज करितां येणार नाहीं.

टीप:— शेकडा ३ $\frac{1}{2}$ टके व्याजाच्या कर्जाच्या प्रॉमिसरी नोटा जरी यापूर्वीच कोणी पोस्ट आफिसामार्फत विकत घेतलेल्या असल्या तरी त्याला ह्या नवीन कर्जापैकीं

५००० रुपयांपर्यंत कर्ज देण्यासाठीं अर्ज करितां येतो.

५ ज्याला अर्ज करण्याची इच्छा असेल त्यानें पुढें दिलेला अर्जाचा नमुना भरावा. सेव्हिंग्स बँकचें काम करणाऱ्या कोणच्याही पोस्ट आफिसांत हा नमुना मिळेल. पण अर्जाबरोबरच जितकें कर्ज देण्यासाठीं तो अर्ज असेल तितकी रक्कम अर्जदारानें भरली पाहिजे. अर्जदाराची जर सेव्हिंग्स बँकमध्यें ठेव असली तर त्या ठेवीचा ही या कामाकरितां त्यास उपयोग करितां येईल, किंवा स्वतंत्र रोख रक्कम देतां येईल. अर्जदारानें पोस्ट आफिसांत स्वतः जावें किंवा दुसऱ्या कोणास पाठवावें. दिलेल्या प्रत्येक रकमेबद्दल पावती देण्यांत येईल.

६ अर्जदार जितकी रक्कम देईल त्या सर्व रकमेइतक्या त्याला शंभर शंभर रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा देण्यांत येतील.

## प्रॉमिसरी नोटा कोणी ठेवाव्यात.

७ ह्या नोटा अर्जदारानें आपल्या स्वतः पाशींच ठेवाव्यात. अगर मर्जीस वाटल्यास आपल्यातर्फें त्या पोस्टाचे अधिकाऱ्यांजवळच राहूं द्याव्यात. कोणाची पद्धति आपणास पसंत आहे. हें अर्जाचा नमुना भरतांना त्यानें नमूद करावें. नोटा आपल्या जवळच ठेवण्याची त्याची इच्छा असली तर त्या त्याचे हवालीं करण्याकरितां तयार होऊन आल्या ह्मणजे पोस्ट आफिस त्याला तसें कळवील. आणि तो त्या घेण्याकरितां स्वतः हजर झाला ह्मणजे त्या त्यास देण्यांत येतील. त्या नोटा पोस्ट आफिसांतच राहूं देण्याचें त्यानें ठरविलें तर त्याला पुन्हां पोस्ट आफिसांत जाण्याचें कारण नाहीं त्यानोटा आपणाकडे आल्या आहेत, व अर्जदाराकरितां त्या ठेवण्यांत आल्या आहेत, असें पोस्ट आफिस अर्जदाराला योग्यवेळीं कळवील. पुढें कधीं जर ह्या नोटा आपले पाशींच ठेवाव्या अशी त्याचीं इच्छा झाली तर पोस्टाचे अधिकारी त्या त्याचे स्वाधीन करितील.

## व्याजाची अदाई.

८ शेंकडा ४ टक्यांप्रमाणें व्याज वर्षांतून दोन वेळां ह्मणजे शेंकडा २ टक्के मे महिन्याचे ३१ वे तारखेस व २ टक्के नोव्हेंबरचे ३० वे तारखेस दरसाल देण्यांत येईल. कर्ज दिल्याचेतारखेपासून तों येत्या नोव्हेंबरचे ३० वे तारखे पर्यंतच्या तुटक मुदतीसाठीं जें व्याज होईल तें, अर्जदार नोटा आपल्यापाशींच ठेवील तर, त्या नोटा त्याचे स्वाधीन करण्याचे वेळीं त्यास रोख देण्यांत येईल, व त्यानें पोस्टाचेअधिकाऱ्यांचे ताब्यांतच त्या ठेविल्या तर पुढील परिग्राफमध्यें निर्दिष्ट केलेलें जें त्याचें खातें ठेवण्यांत येतें, त्या खातीं त्याचें नांवानें तें जमा करण्यांत येईल.

९ आपल्या प्रॉमिसरी नोटा पोष्टाचे अधिकाऱ्यांचेच ताब्यांत ठेवाव्या, असें अर्जदारानें ठरविलें तर अर्जदाराचे नांवानें एक सेव्हिंग्स बँकखातें ह्याप्रीत्यर्थ सुरू करून पोष्टाचे अधिकारी त्या नोटांचें व्याज दर सहा माहीस वेळच्यावेळीं घेऊन तें अर्जदाराचे खातीं जमा करितील. जेव्हां जेव्हां येणें प्रमाणें व्याज घेण्यांत येईल. तेव्हां तेव्हां ती गोष्ट ही पोष्टाचे अधिकारी त्यास वेळोवेळीं कळवितील. हें काम करण्याबद्दल सरकार अर्जदारापासून कांहीं घेणार नाहीं. आणी हें सहामाही व्याजदेतांना त्यावर इन्कमटाक्स (प्राप्तीवरीलकर) कापून घेण्यांत येणार नाहीं.

अर्जदारानें प्रॉमिसरी नोटा आपलेपाशींच ठेविल्या तर सहामाही व्याज देण्याचे वेळीं त्यावर नेहमीं प्रमाणें इन्कमटाक्स कापून घेण्यांत येईल.

## प्रॉमिसरी नोटांची विक्री.

१० वर सांगितलेल्या पद्धतीनें पोष्टामार्फत विकत घेतलेल्या नवीन कर्जाच्या प्रॉमिसरी-नोटा ज्याच्या जवळ असतील अशा सेव्हिंग्स बँकेचे ठेविदाराचे मनांत केव्हां ही असें आलें कीं, त्या किंवा त्यापैकीं कांहीं नोटा विकून टाकाव्या. तर त्याचेसाठीं त्या विकून टाकण्याची ही व्यवस्था पोष्ट आफिस करील. व त्या कामासाठीं दलाली अगर फी कांहीं एक घेणार नाहीं. ह्यासंबंधानें तपशिलवार माहिती पाहिजे असल्यास ती पोष्टआफिसांत केव्हां ही मिळेल.

## अर्जाचा नमुना.

मी————————————

या अन्वयें अर्ज करितों कीं ता. २८ जुलई सन १९१५ चे गॅझिट आफ इन्डिया, एक्स्ट्रा ऑर्डिनरी मध्यें जाहीर करण्यांत आलेल्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या मुदतबंद कर्जापैकीं————रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

+ [ बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे ती रक्कम ————रुपये मी या अर्जाबरोबर दाखल करीत आहे.

बरोबरीच्या दरानें जितके कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे तितकी रक्कम ह्मणजे————रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून ह्या कामासाठीं मला मिळावी अशी मी विनंति करितों.

बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे त्या रकमेच्या अदाई करितां मी————रुपये या अर्जाबरोबर दाखल करीत आहे व बाकीची रक्कम————रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून मला मिळावी अशी मी विनंति करितों.

माझी अशीविनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलच्या प्रॉमिसरी नोटा अकौंटंट जनरल, पोस्ट ऑफिस व टेलेग्राफ्स्, यांचे जवळ माझेसाठीं ठेवाव्या आणि त्याबद्दलचें व्याज ठरीव मुदतीनीं माझे नांवें सुरू केलेल्या पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेचें खात्यांत माझे नांवें जमा करावें.

माझे पासून जितकें कर्ज घेण्याचें मंजूर होईल * त्या रकमेच्या खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रॉमिसरी नोटा मला देण्यांत याव्या.]

नांव————————————

पत्ता————————————

तारीख————————१९१५

* ( वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा.)

+ [ ] वरील या खुणामधील मजकूरांतील अनवश्यक बाबी खोडून टाकाव्या.


सतत ४२ वर्षें चालेलला कारखाना.

## ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठि:--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर -- मुंबई.

एकच भाव! ओटो मुरंगीं ! एकच भाव! !

### आमचेकडे मिळणारा माल

ओटो मुरंगी

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. ही अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळया भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट.

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंबू, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३



# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

## FUNDS almost 5½ CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4½ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. | Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 | 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 | 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 | 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | 65,26 9 | 12,37,10,910 | 1914 | 72,46,0 | 4,96,86,509 |

## BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitutes a record for the company. The next Division of profits will be madea at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

## SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund, divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

—:0—

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms liberal.

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
NagPUr.

N. N. 25


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवात्मजांत छापून प्रसिद्ध केलें

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख १३ माहे सप्टेंबर सन १९१५ ई० [ अंक ३६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयांप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नो. नं २

### अस्सल अंगुरी.

## हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।= ता. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** वं **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास **'वैशेषिक दर्शन'** बक्षीस.

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १० रु; आणि वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथें यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० न० ३

## नोटीशीचे दर

**दर ओळीस दीड आणा.**
**हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.**
**नोटीस सुवाच्य असली पाहिजे.**

**सूचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भत्त्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

**वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोलें** } मॅनेजर

### जाहिर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र लोकांस या जाहिर नोटीशीनें कळविण्यात येते कीं माझा बाप हंसराज मन्नालाल रा० कसबे वाशीम यानें ता० २०-८-१९१५ इ० ची वऱ्हाडसमाचार पत्रांतून जाहिर नोटीस दिली ती नुकतीच माझे वाचण्यांत आली. ही नोटीस त्यानें दुसऱ्याचे फंदानें दिली असून तिच्यांतील मजकूर गलत असून बरोबर नाहीं. माझे माझ्या बापाशीं कांहीं भांडण नाहीं व मी भांडलो नाहीं. सुरजमल पुरणमल या नांवानें जे वाशीम येथें दुकान आहे. त्यांत आमचा निम्मे हिस्सा असून तो दुकानांत हंसराज हानमानबक्ष या नांवानें शरीक आहे. दुकानची वहिवाट सुमारें ९ वर्षा पासून मी दुकानांत राहून करित आलो आहे. दुकानचे एकंदर व्यवहारांतील माल ऐन जिनसी व नगदी शिल्लक व लोकांकडून घेणें असलेले कर्जात वगैरे आमचा निम्मे हिस्सा असून त्याची मालकी माझी आहे. दुकानचे समाईक कर्ज वसूल करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे. माझा बाप हंसराज यानें एकंदर इस्टेटीवर मालकी माझी असल्याबद्दल कबूल केलें असून करार झाला आहे. माझे बापानीं दिलेल्या नोटिशीवरून त्याचें मन माझे विषयीं कोणी कलुषित केलें आहे. असें उघड दिसतें व अशा स्थितींत आमचे इस्टेटीची अफरातफर व विल्हेवाट होण्याचा संभव आहे करितां या जाहिर नोटिशीनें सर्वत्रांस कळविले जाते कीं आमचे बापापासून आमचे खानगी स्थावर जंगम इस्टेटीसंबंधानें व वरील दुकानांतील आमचे निम्मे हिस्सा संबंधानें कोणताही व्यवहार गहाण, खरेदी, बक्षीस, वगैरेचा कोणीही करूं नये. केल्यास तो रद्द असे त्याच प्रमाणें त्याजला खानगी व वरील दुकानाकरितां कोणी कर्ज वगैरे देऊं नये. दिल्यास त्याबद्दल आम्ही जबाबदार नाहीं. वरील दुकानचे कर्जदारानीं आमचे खेरीज वसूल देऊं नये (दिल्यास) लेखी पावती घेतल्याखेरीज दिलेला वसूल कबूल केला जाणार नाहीं. कळावें ता० ४-९-१९१५ इ.

याची एक प्रत आमचे जवळ ठेविली आहे.

सही
हनमान बक्ष हंसराज
मारवाडी द० खु०

साक्ष
H.M.Mahajan
K.W.Kalpande
नो. नं. ३९४

### जाहीर नोटीस.

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं मी तारीख २३ आगष्ट सन १९१५ च्या वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्रांत माझा मुलगा नामे अंबादास उमर वर्षे १६-१७ अज्ञान हा वईट वर्तणूक करूं लागल्यामुळें त्यास माझ्या विरुद्ध असलेल्या कांहीं मंडळीनीं ज्यास्त बिघडविण्याची खटपट सुरुं केली आहे व अशा अज्ञान अवस्थेत कांहीं लोक त्याजकडून लेखी दस्तऐवज वगैरे रकम न देतां करून घेत आहेत. अशी मजला कर्णोंकर्णी कळल्यावरून व तो अजमास एक महिना झाला घर सोडून बाहेर हिंडत आहे ह्मणून मी तारीख १८-८-१५ ची नोटीस माझे स्वतःचे सहीची नोटीस माझा मनुष्य नागो बा सदाशिव कुणबी याच्या हस्ते छापखान्यांत छापण्यास पाठविली होती ती छापून प्रसिद्ध झाली आहे. त्या नोटीशींत वरील मुलाचे अज्ञानपणाचे बाबतींत खुलासा केला नसल्यामुळें ही पुरवणी आज तारखेस दिली असून यांत जाहिर असे कळवितो कीं माझा मुलगा अज्ञान असून त्याजकडून कोणत्याही प्रकारचा कर्जाऊ दस्तऐवज करुन घेतला असल्यास कायद्यानें तो बातल व रद्द आहे. या पुरवणीसुद्धां नोटीशीची छ.पील प्रत चावडीस लाविली आहे. ज्याची इच्छा असेल त्यांनीं अवलोकन करावी. ही पुरवणी दिली कळावें.

सही
१ सखाराम सदाशिव मुक्काम आकोला दस्तुर खुद
नो. नं. ३९९

## नोटीस

नोटीस बेशमी पुंडलीक कृष्णाजी पाटील रा० बोरगांव ता० बाळापूर.

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची ता० २३-८ १९१९ ची वतनदार प्रेसमधून छापलेली नोटीस मिळाली. त्यांतील खरेदीच्या सवदाच्या वगैरे गोष्टी सर्व खोट्या आहेत. तुम्हांकडेस आमची बाकी आहे. ती बुडविण्याची तुमची नियत दिसते. तुम्ही फार पाठीमागें लागला होता व निदान शेत पाहण्यास तरी या असें ह्मणत होता ह्मणून आम्ही शेत पाहण्यास आलो होतो. पण आम्हास सवदा नापसंत असल्यामुळें आम्हीं सर्व गोष्टी नाकारल्या. इतर व सवदा वगैरे सर्व खोटे आहे. हे उत्तर तुम्हांस पोचण्याचे आदीच राधाबाईनें तुम्हावर स्वालकाज मध्यें आमचे पैशाचा दावा केला आहे. ता० ३१-८-१९१९ मु. आकोला.

सही

१ देवलाल लक्ष्मणदास दस्तूर खुद असे.

नो. नं. ३९६

## नोटीस

रा. रा. टीक्या, भीक्या, राघ्या, वल्लद फुरशा हा निम्मेचा मालक डोंग्या उरकड्या वा कोंड्या एक आणा, याद्या सुप्या रूप्या बोलखा एक आणा निंब्या वा पीऱ्या एक आणा मुकींदा खुशाल्या वा आक्या एक आणा, किसन्या बिसन्या वा मांगु महार एक आणा, मन्या मोत्या वा सोन्या एक आणा, तानक्या संपत्या वा जानु एक आणा, बंशा चंद्या नागो एक आणा जात सर्व महार रा. आकोली बु० ता० जळगांव पोष्ट तामगांव जि० बुलठाणे यांस मी खालीं सही करणार अशी नोटीस देतो कीं माझे वडीलापासून तुम्ही सर्व लोक गुराचे कातडे देत आले असून त्यांत हल्लीं चालू सालांत माझा बैल मेला त्याचे कातडे तुम्ही देत नसल्यामुळें मी गांवांतील पंचमिळून त्याचे समोरासमोर मागीतले असतां तुम्ही देण्याचे कबुल केले होते ते अद्याप पावेतों दिले नाहीं त्या नंतर मी तुम्हांस १-२-३ वेळां मागणी केली असून तुम्ही एकमेकावर टाळा टाळी करित आहां आतां ही नोटीस पावल्यापासून ४-६ दिवसाचे आंत कातड्याची किंमत रु० ६ व नोटीशीचा खर्च वगैरे द्यावा. तसें न केल्यास तुम्हावर या नोटिशीचे खर्चासुद्धां व कातड्याचे किंमतीसुद्धां दिवाणींतून दाद मागून सर्वांना प्रतीवादी केलें जाऊन सर्वांपासून कोर्टाचे खर्चासुद्धां पैसे घेतले जातील. त्याबद्दल मुळींच तक्रार ऐकली जाणार नाहीं. आणि दुसरे असे कीं संमत १९७१ सालाचे येत्या दसऱ्याचा आमचे सालपाळीचा हेला असून तो तुम्ही करीत नसल्यामुळें अडथळा आणणार अशा बद्दलची गुणगुणी आमचे कानावर आली आहे. करितां आमचे सालांत हेला घेणार नाहीं अगर आमचे विरुद्ध वागल्यास सर्वांना जबाबदार धरले जाऊन फौजदारीस पात्र व्हाल आणि बे अब्रुबद्दल दोनशे रुपयाचा दावा तुम्हावर घालण्यांत येईल. आपणास जें कांहीं कारण दाखविणें असेल ते सत्य सत्य गोमातेचे इमान करून साग्र मजकुरानें उलट नोटिशीनें खरी खरी हकीकत कळविणें. तसें न केल्यास तुमची कोणतेच प्रकारें तक्रार ऐकली जाणार नाहीं ही नोटीस दिली कळावें तारीख ६-९-१९ इ.

नामदेव वा बापुजी पाटील द. खु.

नो. न. ३९७

---

## एकजीव झालेला हिंदुस्थान.

मागील अंकावरून पुढें चालूं.

हिंदी गृहस्थ आपणास भेटायास येत नाहीत ह्मणून कांहीं अधिकारी तकरार करितात. पण त्यांत दोष कोणाचा? हिंदी गृहस्थ भेटावयास गेल्यास युरोपिअन अधिकारी त्यांना व्हेरँडांत तिष्टत बसवितात. हिंदी लोकांनीं असली वर्तणुक कां सहन करावी? कधींही करूं नये. त्या योगें त्यांच्यांत हांजीहांजी वाढून अधिकारी बेफिकिर व उद्दाम होतात.

गोऱ्या लोकांचे मोटारचा धक्का लागून एक हिंदी गृहस्थ पडतो. तर क्वचित प्रसंगीं मरतोही व त्याबद्दल थोडासा दंड होऊन गुन्हेगार सुटतो. हीच स्थिती फिर्यादी व आरोपी दोघेही युरोपियन असतांना होत नाहीं. पुष्कळ वेळां या लागलेल्या माणसाची प्लीहा फुगलेली होती ह्मणून जबाब मिळतो. पण मार लागलेल्या इतक्या लोकांच्या प्लीहा फुगलेल्या असतात हे अविश्वसनीय आहे.

नुकत्याच निघालेल्या कामिशनपुढें साक्षीदार सांगतात कीं राज्यव्यवस्थेंत हिंदी अधिकारी गोरे अधिकाऱ्यांचे बरोबर नसतात तर दुसरीकडे पाहते तो नेटिव्ह संस्थानांतून राज्यव्यवस्थेंतील नैपुण्य पाहून शेषाद्रीआयर सारख्या ग्रहस्थांचे पुतळ्याचे अनावरण समारंभाचें कार्य व्हाइसराय सारखे मोठाले अधिकारी करतांना दिसतें. सारांश संधी दिली असतां नैपुण्य आहे हें खचित निदर्शनास येतें

### स्वराज्य

या मुद्यासंबंधीं बोलतांना मला हें सांगणें भाग आहे कीं, स्वराज्यासंबंधीं बोलतांना अगर लिहितांना हिंदुस्थानांत त्याचे जबाबदारीपेक्षां हक्काबद्दल जास्त उहापोह होतो. स्त्रिया, पुरुष, मुलें, मालमत्ता यांचें संरक्षण व जुलमाचा प्रतिकार वगैरे स्वराज्यांतर्गत गोष्टी फार कठीण आहेत. नागरिकांचे हक्क संपादण्यापूर्वी नागरिकांची जबाबदारी पूर्णपणें कळली पाहिजे. इग्लंडांतील मुलांना सुद्धां हॅरो व एटन मध्ये इकडल्यापेक्षां जास्त निर्बंध आहेत.

सुट्टीचे दिवशीं सुद्धां त्यांना हजीरी द्यावी लागते. मुलें लहान वयाचीं असल्यामुळें मोठाल्या शहरांतून त्यांना निरनिराळीं संकटें असतात. सभासंबंधीं ऑक्सफोर्ड मधील विद्यार्थ्यांनाही निर्बंध तसेंच आहेत. ऑक्सफर्ड मधील माझे एका व्याख्यानाचे वेळीं मुलांना आपल्या सुपरिंटेंडेंटांचे लेखी परवाने घेऊन यावें लागलें. हें सर्व शिस्तीकरतां व मुलांचे हिताकरतां आवश्यक आहे. त्यांना निरनिराळ्या विषयांचे अध्ययनाविषयीं व वादाविवादाविषयीं पूर्ण मुभा असावी पण वर्तन स्वातंत्र्य मात्र त्यांना नसावें. कारण निरपेक्ष व शांतवृत्तीनें अध्ययन, विवाद वर्तन ठेवण्याचें शिक्षण व शिस्त त्यांना एव्हांपासून लागली पाहिजे. मतें बनविण्याचे हे त्यांचे दिवस आहेत.

### स्वराज्य साम्राज्यांतर्गत असावें.

खेड्याचा कारभार करणारी पंचायत मंडळी असावी. जिल्हा व तालुका निहाय बोर्ड्स असावेत. प्रत्येक देशाचें अंतर्व्यवस्थेकरतां त्याची स्वतंत्र राजसभा असावी. त्या अंतर्व्यवस्थेंत हात घालण्याचा बाहेरील कोणालाही अधिकार नसावा व साम्राज्याचे पार्लमेंटांत प्रत्येक देशाचे कांहीं निवडक सभासद असावे व त्या पार्लमेंटांत देशादेशांतील, राष्ट्राराष्ट्रांतील आंतरराष्ट्रीय प्रश्नाचाच मात्र उहापोह व उलगडा व्हावा. प्रत्येक देशाला स्वतंत्र पार्लमेंट असावें ही कल्पना चर्चिल साहेबांसारख्यांना मान्य होत चालली आहे त्या शिवाय Home rule चे प्रश्नाचा उलगडा शक्य नाहीं. इंग्लिश लोकांना इंग्लंडचे पार्लमेंटांत आयरिश लोक नसावेंत असें वाटणें अगदीं साहजिक आहे तसेंच आर्यलंड संबंधीचे प्रश्नाचा निकाल इंग्लंडचे लोकांनीं करावा हे आयरिश लोकांना न आवडावें हें साहजिक आहे.

या प्रमाणें इष्ट ती क्रांती घडवून आणण्यास आपण फक्त हिंदुस्थानांत चळवळ करून बस्स नाहीं. तर इंग्लंडमध्येंही ती चळवळ केली पाहिजे. हिंदुस्थानांत आलेले इंग्रज बहुधा अज्ञ व दुराग्रही असतात. इंग्लडांतील लोकांना हिंदुस्थानचे प्रश्न साम्राज्याचे दृष्टीनें समजाविले पाहिजेत. इकडील निवडक वक्त्यांनीं तिकडे जाऊन एकसारख्या गांवोगांव सभा भरवून लोकमत तयार केलें पाहिजे. त्याकरतां कार्यकारी लोकांनीं आपलें शील व शिक्षण उत्तम संपादलें पाहिजे. दक्षिण आफ्रिकेकडे पहा तेथील लोकांचे अंगीं स्वराज्य चालविण्याची योग्यता येण्याचे अगोदर त्यांना स्वातंत्र्य मिळाल्यामुळें ते कसे उद्दाम व जुल्मी झाले आहेत. तर नागरिकांचे हक्क मिळण्याकरतां नागरिकांचीं कर्तव्यें उत्तम तऱ्हेनें बजाविण्याची धमक अंगीं आणा. याप्रमाणें माझे विचार मी आपल्याला सादर केले आहेत. हिंदुस्थानची सेवा मी येथें वीस वर्षांपूर्वी आले त्याचेही आगोदर पासून यथामती व यथाशक्ती करीत आहे. व माझेवर चालू असलेल्या फिर्यादींत मला जर कारागृहांत जाण्याचा प्रसंग येऊन बाहेरील जगांतील माझी सेवा संपली तर मला मोठा आनंद वाटतो कीं ही माझी अखेरची सेवाही हिंदुस्थानच्याच कारणीं लागत आहे.

बा. ल. चि.

---

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुद्ध ९ शके १८३७

## श्री देवनाथमहाराजांची कविता.

वैदर्भ देश उर्फ वऱ्हाडप्रांत यानें साहित्याचे इतिहासांत आपलें नांव चिरस्थायि करून ठेविलें आहे. संस्कृत साहित्यशास्त्रांत भाषापद्धतींत वैदर्भीरीति प्रसिद्ध आहे. ही या प्रांतांतल्या ग्रंथकारांची विशिष्ट रचनापद्धति असली पाहिजे. मुसलमानी अंमलांत या प्रांतांत अनेक अवलिया, व शाहिर झाले. परंतु त्यांच्या चरित्रांचा किंवा कवनांचा पत्ता लावण्याचें भाग्यकृत्य अद्याप कोणीं फारशीनवीसानें हातीं घेतलेलें दिसत नाहीं. आमच्या दयाळनाथ देवनाथांची जोडी ही अशीच स्मृतिशेष झाली असती, परंतु सुदैवानें त्यांचे मठ अद्याप कायम आहेत, व त्यांच्या विषयींची पूज्यबुद्धी आह्मां महाराष्ट्रीयांच्या मनांतून नष्ट झालेली नाहीं. उलट रा. अच्युतराव साठे, रा. पांडे, व रा. अग्निहोत्री या त्रिमूर्तींच्या परिश्रमानें या दोन्ही संतकवींची आधीक कविता उपलब्ध होऊन तिची व्यवस्थित रीतीनें मांडणी व प्रकाशन हीं महत्त्वाचीं कामें पार पडल्यामुळें दोन्ही कवींचे काव्यसंग्रह रसिक महाराष्ट्रवाचकाची तृप्ति करण्यास अक्षयीं तयार आहेत. पूर्वीं 'काव्यसंग्रह'कारांना देवनाथांचीं २०० पदेंच मिळालीं होतीं. आतां वरील त्रिमूर्तींनीं ९०० पदें महत्प्रयासानें मिळविलीं आहेत. या पांचशें पदांचा जो गुच्छ महाराष्ट्रवाचकांस नुकताच अर्पण करण्यांत आला आहे त्याचा आमच्या वाचकांस परिचय करून देणें आणि संपादकांनीं केलेल्या या स्तुत्यउद्योगाची महती किती आहे व अशा कामीं जनतेच्या साह्याची किती अपेक्षा आहे हें दाखविणें हाच या लेखाचा उद्देश आहे.

प्रस्तुत पुस्तकाचीं ६१९ पानें आहेत. पैकीं पहिल्या १०९ पृष्टांत देवनाथांचें चरित्र, काव्यकला व कविता यांच्या संबंधानें उपोद्घात आहे, व सुमारें ३० पृष्ठें अनुक्रमाणिका व शब्दकोश यांत खर्च झालीं आहेत. संपादकांनीं देवनाथांच्या कवितांच्या प्रकाशनाचें काम स्वतःच्या हौसेनें हातीं घेतलें; तसें तें मोठ्या उत्साहानें पार पाडलें आहे यांत शंका नाहीं. उपोद्घातांत नाथांचें चरित्र सांगतांना त्यांनीं तत्कालीन स्थिति ही थोडक्यांत वर्णिली आहे. देवनाथांची विद्या कांहींच नव्हती त्यांना मुळीं लिहितां वाचतां सुद्धां येत नव्हतें असें कित्येकांचें ह्मणणें आहे. या आक्षेपाचें खंडन करण्यासारखा पुरावा संपादकाजवळ नसल्यामुळें त्यांनीं केवळ अनुमानाचे बळावर व तत्कालीन शिक्षणपद्धतीवर आपली सारी भिस्त ठेवून देवनाथ

हे चांगले शिकलेले होते असें ध्वनित केलें आहे. खरा प्रकार असा दिसतो कीं त्यावेळची विद्या बहुतेक श्रुतीपरंपरया आलेली असे. पुराणें, कीर्तनें, प्रवचनें वगैरे ऐकण्याचा प्रघात विशेष असे; यामुळें ज्यांना लिहितां वाचतां मुळींच येत नसे अशांत ही रामायण, भारत, भागवत, ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांतली बहुश्रुतता दिसून येई, आणि मनावर त्या श्रुतविद्येचा परिणाम होई. या अर्थानें देवनाथ उत्तमप्रकारें सुशिक्षित होते. पण त्यांच्या कवितेंत संस्कृत शद्बांची विकृत रूपें, ऱ्हस्वदीर्घाबद्दलचा अनियम, वगैरे प्रकार अनेक स्थळीं दिसून येतात. यावरून रामदासी संप्रदायांतल्या अनेक कवीप्रमाणें ते निरक्षर कवि असावेत अशी शंका येते खरी तथापि हा मुद्दा आमच्यामतें क्षुद्र आहे, व त्यावर विशेष चर्चा करण्याचें कारण नाहीं. मुख्य प्रश्न आहे तो त्यांच्या कवित्वशक्तीबद्दलचा आहे. पूर्वी साधूसंतकवीचा कीर्तिपरिमळ देशभर पसरत असे तो त्यांच्या कवित्वशक्तीमुळें नव्हे, तर त्यांच्या साधुत्वामुळें, वेदांतप्रतिपादन शैलीमुळें, किंवा अलौकिक चमत्कार करण्याविषयींच्या सामर्थ्याविषयीं भोळ्याबावळ्या लोकांनीं पसरविलेल्या कंड्यांमुळें असे. कवित्वशक्ति कसोटीला लावून पाहण्याचा कौल अजून ही खरोखर आलेला नाहीं. कारण, ज्यांत कवित्वाचा लेशही नाहीं. अशीं गाड्याभर बाडें प्राचीन कविता ह्मणूनच केवळ उराशीं लावून ठेवणार व तीं छापण्याचें सामर्थ्य नाहीं ह्मणून हळहळणारे पदवीधर अद्यापिही दिसत आहेत. दयाळनाथांची सगळीच कविता प्रासादिक व रसपूर्ण नाहीं; पण कांहीं कविता खरोखरच फार साधी, असून बहारीची, प्रासादिक आणि रसपूर्ण आहे. चरित्रेंकारांचें चरित्रविषयाच्या ठायीं अंधप्रेम असतें, तसे संपादकत्रयांचें देवनाथांचें ठायीं आहे ह्मणून नाथ हे जें बोलले तें सगळें कवित्वच अशी त्यांची समजूत आहे ही समजूत आह्मी दुखवू चाहत नाहीं, पण ती चिकित्सकांच्या कसोटीस उतरणार नाहीं, तोंपर्यंत अंधश्रद्धेच्या जोडीला तिला बसावें लागेल येवढें सांगणें भाग आहे.

टीपा देण्याचे संबंधांत ही संपादकांनीं परिमाणसापेक्षतेकडे पूर्ण दुर्लक्ष केलेलें आढळतें. बऱ्याच ठिकाणीं निरर्थक टीपांचा भारा वाचकांपुढें मांडला आहे. संपादकांची विद्वत्ता व बहुश्रुतपणा या टीपांतून दिसतो. पण हे गुण दाखविणें हा टीपा देण्याचा खरा उद्देश नसून अर्थ विशद करण्यासाठीं जरूर तेवढ्याच टीपा देण्यांत संपादकाचें खरें चातुर्य आहे. हें चातुर्य प्रस्तुत पुस्तकांत फारसें दिसून येत आहे. टीपांचा निष्कारण विस्तार करण्यांत ‘ काव्यसंग्रह ’ कारावर ही ताण झालेली आहे. त्यामुळें पुस्तकाचा आकार फुगून गोरगरीब वाचकांच्या सामर्थ्याबाहेर गेला आहे. टीपा देतांना ही संपादकांनीं माधव चंद्रोबा यांचा शद्बरत्नाकर व मोलस्वर्थचा इंग्रजी कोश यांवरच सर्वथा भिस्त ठेविली आहे. हंसकोश, ज्ञानेश्वरी परिभाषा, वगैरे सारखे कोश त्यांना उपलब्ध झाले नाहींत. त्यामुळें पुष्कळवेळां वरील दोन कोशांत न आढळणाऱ्या शद्बांचे अर्थ संपादकांनीं अनुमानानें दिले आहेत, व ते पुष्कळवेळां चुकले आहेत, उदा० पृ. २३८ वर ‘अमरुपी मन हें चकोर पदार्थीं’ यांतल्या अमरुपी शद्बावरची टीप पहा. हा शद्ब वस्तुतः अमृपी या संस्कृत शद्बाचें विकृतरूप असून त्याचा अर्थ उतावळें असा पण संपादक त्याला ‘ अमृतैषी ’ असा समजतात! पृ. ३५३ ‘ निजसी फणी करुनी अंथरुणा’ यावरील टीपेंतली कल्पना संपादकाच्या डोक्यांतली दिसते. मूळ कवीच्या स्वप्नीं ही ती होती असें ह्मणण्यास आधार दिसत नाहीं. पृ. ३२४ ‘ त्वां हरी तेचि परी केली मला कान्हया’ यावरील टीपेंत परी शद्बाचा अर्थ ‘ स्थिति असा अनुमानानें लाविला आहे. परी शद्बाचा खरा अर्थ प्रकार असा आहे. ‘ हिंपुटी , ह्मणजे बेजार नव्हे, खिन्न. पृ. ५४६ यांतील ‘ शेखीं ’ यावरील टीपेंत ‘हा शद्ब’ शिखर ’ शद्बापासून झाला असावा असा मोलस्वर्थचा तर्क प्रमाण समजून दिला आहे. पण तो चुकीचा आहे. शेखीं हें शेख= शेष याचें सप्तमीचें एक वचन आहे. शेखीं ह्मणजे शेषभागा= अखेरीस. सुदैवानें अशा चुकीच्या टीपा थोड्या आहेत. अर्थसादृश्याच्या टीपा मात्र इतक्या रगड आहेत कीं त्या काढून टाकल्या तर पुस्तकाची उपयुक्ततेच्या दृष्टीनें हानि न होतां पुस्तक स्वल्पमूल्य करतां येईल.

कोणाच्या ही कृतींतले दोष काढणें सोपें असतें, प्रत्यक्ष कृति करण्यास लागणारे परिश्रम ते करणारांसच विचारावे. हा नियम येथें ही पूर्णपणें लागू आहे. आह्मीही संपादकाच्या कृतींतले कांहीं दोष वर दाखविले यावरून त्यांच्या परिश्रमाची किंवा केलेल्या कामगिरीची जाणीव आह्मांस नाहीं असा समज वाचकांनीं करून घेऊ नये. ‘ नहिवंध्या विजानाति गुर्वी प्रसववेदनाम् ’ ही ह्मण अशा वाङ्मयाच्या सेवे संबंधानें तरी अक्षरशः खरी आहे. जुन्या कवींची कविता मिळविणें, ती विषयावर लावणें, तिचा अर्थ लावणें, अप्रचलित किंवा विकृत शद्बांचे अर्थ व त्यांचीं मूळ रूपें यांचा पत्ता लावणें, टीपा देणें, इतर कवींच्या कवितेंतून अर्थसादृश्याचीं उदाहरणें शोधणें, इ. इ. गोष्टी करण्यास मनुष्यानें आपल्या आयुष्यांतला बराचसा काळ त्या कार्याला वाहावाच लागतो. हें कार्य करीत असतां मनाला सारखी तळमळ लागलेली असते, व मनाजोगें काम होईपर्यंत ती शांत होत नाहीं. आणि शरीराला व जीवाला इतके कष्ट दिल्याचा मोबदला मिळण्याची ही आशा नसते. अशा स्थितींत वरील संपादकत्रयासारखे विद्वान् गृहस्थ केवळ साहित्यसेवेच्या इच्छेनें प्रेरित होऊन येवढें महत्कार्य पार पाडण्यास पुढें झाले त्याबद्दल त्यांची प्रशंसा करावी तेवढी थोडी आहे. त्यांनीं महत्परिश्रमानें जुन्या मराठी कवितेचा एक महत्त्वाचा भाग प्रकाशित केला आहे हे महाराष्ट्रवाचकांवर विशेषतः वऱ्हाडांतल्या लोकांवर—त्यांचे महदुपकार आहेत, व या उपकाराची फेड प्रस्तुत पुस्तकास ग्राहक होऊन व पुढील गुच्छ प्रकाशनाचे कामीं यथाशक्ति साह्य देऊन ते करतील अशी आह्मी उमेद बाळगतों. इतकें सांगून संपादकत्रयाचा आह्मी प्रेमानें निरोप घेतों.

## लढाईची खबर.

गेल्या दोन महिन्यांत लढाईचे मुख्य केंद्र राशीया बनून राहिल्यामुळें ज्याचें त्याचें लक्ष जर्मनीनें किती पाऊल टाकलें, किंवा राशीया किती मागें हटला या गोष्टीकडे असे. पण पूर्वरणक्षेत्राचें महात्म्य आतां संपत आलें आहे असें दिसतें. राशियाला चिमट्यांत धरण्याचा किंवा राशियन फौजेंत पाचर मारून ठेवण्याचा जर्मनीचा डाव अजिबात फसला. जर्मन प्रगतीची हद्द होऊन चुकली. आतां तिला ओहोटी लागण्याचा काळ येऊन ठेपला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां जर्मनी राशियांत आपलें पाऊल पुढें रेटीत नेईल तर तो खड्ड्यांत पडेल असें मत कर्नल बारोन नांवाच्या सुप्रसिद्ध लष्करी तज्ञानें दिलें आहे आणि तें खरें दिसतें. याच गृहस्थाचें पश्चिमेकडील रणक्षेत्रांतल्या युद्धाविषयीं असें मत आहे कीं दोस्तराष्ट्रें राशियांतल्या जर्मन प्रगतीच्या ओहोटीची वाट पाहत आहेत ती सुरूं झाली कीं यांनीं इकडून रेटण्याला सुरुवात केलीच. पश्चिमेकडे जर्मनीची बाजू अत्यंत विपन्नावस्थेंत आहे, यांत शंका नाहीं.

राशियन बातमी पत्रावरून कळतें कीं रीगा प्रदेशांत राशियनांनीं द्वीना नदी उतरून तेथून जर्मनांना हाकून लाविलें. ग्राडनों जर्मनीच्या हातांत गेलें होतें, त्यांत राशीयानें परत प्रवेश करून ८ तोफा १५० कैदी पकडले. गुरुवार व शुक्रवार या दोन दिवसांतच ३५६० कैदी त्यांचे हातीं लागले. फार शुभ वार्ता आहे खरी; पण तिच्या सत्यतेबद्दल पुरावा मिळेल तेव्हां ती अधिक गोड लागेल. पश्चिमेकडे तूर्त तोफखान्याच्या चकमकी झडत आहेत. या चकमकींत फ्रेंचाची जर्मनीवर सरशी होत आहे.

ग्यालीपोलीकडे तुर्क लोक रात्रींचे छापे घालण्याचा यत्न करीत आहेत. पण लाग साधत नाहीं व हार खाऊन आणि वर मनुष्यहानीची दक्षिणा घेऊन त्यांना परत फिरावें लागत आहे. तुर्कांजवळ दारूगोळ्याचा तुटवडा पडला आहे. ह्मणून आस्ट्रिया व जर्मनी हीं राष्ट्रें त्याला त्याचा पुरवठा करूं पाहत आहेत. पण रुमानिया मध्यें आडवा येत आहे. तो हॉस्पिटलचें सामान फक्त जाऊ देतो. पण जर्मनी जखमी बांधण्याच्या पट्टयांतून व कापसांतून ज्वालाग्राही पदार्थ पाठवितांना आढळलें आहे.

जर्मनी तह करण्यास तयार आहे अशा गप्पा मागें पुष्कळवेळां उठल्या आहेत, व त्या उठविण्यांत जर्मनीचा कावेबाजपणाचा हेतु कोणता आहे तेंही मागें आह्मी एकदां दाखविलें आहे. दर दोनचार आठवड्यांनीं तहाची हुलकावणी आपली यावयाचीच. या खेपेला तहाची बातमी अमेरिकेहून ‘ खात्रीपूर्वक आधारा’वरून आलेली असली तरी तिची किंमत मागच्या गप्पापेक्षां ज्यास्त कोणी सुज्ञ समजणार नाहीं. ही बातमी अशी आहे कीं जर्मनीला तह करण्याची गोष्ट संमत आहे असें जर्मनीनें प्रेसिडेंट विल्सन यांस कळविलें आहे. प्रेसिडेंट विल्सन हे जर्मनीशीं वितुष्ट करून घेण्याच्या कामीं किती लेचेपेचे असले, आणि अमेरिकन प्राणापेक्षां जर्मनीशीं सख्य ठेवण्याची किंमत अधिक वाटण्याइतका त्यांचा स्वदेशाभिमान शून्यांश झाला असला, तरी तहाची जर्मनीची ही हुलकावणी केवळ दिखाऊ आहे, खरी मनापासून नाहीं येवढें न समजण्याइतके दुधखुळे खास नाहींत; आणि जरी असले तरी नुसत्या जर्मनीच्या इच्छेवर तह होणें न होणें अवलंबून नाहीं हे ते पूर्णपणें जाणत असले पाहिजेत. दोस्तराष्ट्रांची प्रतिज्ञा काय आहे ती त्यांना चांगली अवगत आहे. ज्या कारणामुळें प्रस्तुतचें युद्ध सुरूं झालें तें कारण—प्रशियाची आंपलें वर्चस्व साऱ्या युरोपभर प्रस्थापित करण्याची प्रबळ लालसा—समूळ खणून काढल्याशिवाय दोस्तराष्ट्रें तहाची गोष्ट बिल्कुल ऐकावयाचीं नाहींत. तह व्हावा अशी इच्छा प्रस्तुतचा मनुष्यप्राणाचा संहार पाहून कळवळणाऱ्या मनाला वाटणें स्वाभाविक आहे. पण जर्मनीचें मन या संहाराला पाहून कळवळत आहे असें समजणें ह्मणजे खुळेपणाची कमालच झाली असें ह्मटलें पाहिजे. रोमचे ख्रिस्ती आद्यगुरु पोपमहाराज यांचें मन तळमळत आहे व ते तह घडवून आणण्याची खटपट करीत आहेत, ती गोष्ट निराळी पण त्या बिचाऱ्या धर्मगुरूला राजकीय गोष्टींतले जर्मनीचे पाचपेंच काय कळणार? प्रेसिडेंट विल्सन साहेबांना मात्र अशी अज्ञानाची सबब कधीं पुढें आणतां येणार नाहीं.

## इंग्लंडचे घरचेच शत्रू.

प्रस्तुत युद्धांत इंग्लंडनें आतांपर्यंत केलेली महत्त्वाची कामगिरी कोणाला ठाऊक नाहीं? समुद्रांतून होणारा जर्मनीचा व्यापार इंग्लडनेंच बंद पाडला. पासिफिक महासागरांतल्या जर्मन आरमाराचा नायनाट केला; फ्रान्सचा उत्तर किनारा सुरक्षीत ठेविला; ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं पारिसचे शत्रूच्या हल्ल्यांपासून रक्षण केलें; दोस्तांना पैशाची मदत केली; दारूगोळा स्वतःजवळ बेताबाताचा असूनही आपल्या दोस्तांना त्यांतून ही देऊन संकटाचा प्रसंग निवारला; आफ्रिकेंत जर्मनीच्या वसाहतीचा जंगी मुलुख हस्तगत केला; एका वर्षांत ३० लक्ष सैन्य उभें केलें; शत्रूला फ्रान्समध्यें अडवून धरलें; आणखी काय करावयास पाहिजे होतें ? वस्तुतः सध्याच्या प्रसंगीं तरी या कामगिरीबद्दल असमाधान व असंतोष व्यक्त करून शत्रूच्या मनाला गुदगुल्या करण्याचें कोणाही खऱ्या ब्रिटनाचे मनांत येणें शक्य नाहीं. पण पक्षभेद आणि खरा देशाभिमान यांचे मध्यें नेहमीं छत्तीसाचा आंकडा असावयाचा. खुद्द इंग्लंडमध्यें या पक्षाभिमानाला किंवा दुराग्रहाला बळी पडून कांहीं मंडळी आपल्याच भाईबंधाचें छिद्रान्वेषण करण्यांत भूषण मानू लागली आहे. सक्तीची लष्करी सेवा इंग्लंडांत चालू करावी असें एका पक्षाचें ह्मणणें आहे. दुसरा ह्मणतो कीं ती निदान सध्याच्याकाळीं तरी हानिकारक होईल.

हें काय तें भांडणाचें मूळ. लिबरल पक्ष या दुसऱ्या मताचा आहे, येवढें निमित्त लंडन टाइम्ससारख्या पत्राला त्या पक्षाची व लॉर्ड किचनेर यांची नालस्ती करण्याला पुरे आहे. लंडन टाइम्स व डेली मेल हीं दोन्हीं पत्रें लॉर्ड हार्मस्वर्थ यांचीं आहेत. यांनीं ब्रिटिश सरकारचें उणें शोधून काढून त्याचें तुणतुणें वाजविण्याचा जणूं विडाच उचलला आहे. याचा परिणाम सध्या लढत असलेल्या ब्रिटिश शिपायांच्या मनावर अनिष्ट रीतीनें घडून त्यांची उमेद खचेल ही गोष्ट या शहाण्यासुर्त्या पत्रकर्त्यांच्या ध्यानांत कशी येत नाहीं कोण जाणे! या पत्रांना कोर्टांत खेचावें किंवा कायद्यानें त्यांची मुस्कुटदाबी करण्याचा यत्न करावा, तर संकटाच्या काळीं हें नसतें एक वावटळ उठवून घेतल्यासारखें होईल; आणि त्या सारखें अदूरदर्शित्वाचें कृत्य सध्या दुसरें कोणतें ही नाहीं, अशा पेचांत सरकार सांपडलें आहे. हिंदुस्थानांतल्या वर्तमानपत्रांच्या संपादकांची आज्ञाधारकता, सरकारचीं न्यूनें न पाहतां उलट त्यांवर पांघरूण घालण्याचे कामीं तत्परता, वादग्रस्त प्रश्नाकडे ढुंकून सुद्धां सध्या पाहावयाचें नाहीं असा निश्चय करण्यांत त्यांनीं दाखविलेलें दूरदर्शित्व, सरकारशीं सहकारित्व ठेवण्याची त्यांची तयारी ब्रिटिश राज्याविषयींची त्यांची अत्यंतिक निष्ठा आणि ममत्व हे गुण लंडन टाइम्स व डेली मेल यांच्या सारख्यापत्रांच्या विरोधानें तरी सरकारच्या नजरेस येतील काय? आणि देशीपत्रांच्या मुसक्या अंमळ सैल करण्याची बुद्धि त्यांना होईल काय?

## हिंदुस्थानांतले कारखाने.

सन १९१४ च्या मार्च पर्यंतच्या बारा महिन्यांचा अर्थात् हल्लींचें युद्ध सुरू होण्याच्या अगोदरच्या वर्षांतला हिंदुस्थानांतल्या उद्योगधंद्यांचा व कारखान्यांविषयींचा सरकारी रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे. त्यावरून रिपोर्टाच्या सालीं ह्मणजे १९१२–१३ मध्यें हिंदुस्थानांतल्या सर्व प्रकारच्या लहानमोठ्या कारखान्यांची संख्या ३८६७ होती असें दिसतें. पूर्वीच्या सालापेक्षां ही संख्या सुमारें ४०० नें जास्त होती. यावरून लोकांना कारखाने काढण्याची अवश्यकता भासूं लागली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. देशी राज्यें व संस्थानें यांच्या हद्दींतली कारखान्यांची संख्या १०२ होती. वरील कारखान्यांपैकीं विजेनें चालणारे कारखाने फक्त १३३ होते. हिंदुस्थानांत विद्युच्छक्तीचा प्रसार होण्यास अजून पुष्कळ जागा आहे. पण लोकांचें अज्ञान, भांडवलाचा व विशेषतः परलोकवासी मि. टाटा यांच्या सारख्या धाडसी योजकांचा अभाव यामुळें विद्युच्छक्ति स्वल्प खर्चांत उत्पन्न करण्यासारखीं स्थळें असतां ही तिचा उपयोग करून घेतां येत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या सर्व कारखान्यांतून काम करणाऱ्या कामदारांची दररोजची सरासरी फक्त १० लक्ष होती, तीस कोटि वस्तीच्या मानानें ही संख्या फारच अल्प आहे. ही संख्या अल्प असण्याचें एक कारण आह्मांस हें दिसतें कीं भांडवलाच्या अभावीं हिंदुस्थानांतले बहुतेक कारखाने लहान लहान प्रमाणावर चालविलेले आहेत. रेल्वे कंपन्याचीं वर्कशॉप्स किंवा टाटांचा लोखंडाचाकारखाना यांसारखे दहापांच मोठाले कारखाने वजा केले तर बाकीच्या कारखान्यांतली कामदारांची सरासरी रोजची हाजिरी एक हजार सुद्धां पडावयाची नाहीं. हिंदुस्थानांतल्या भांडवलवाल्यांना भांडवल घालण्यास अद्याप केवढें विस्तीर्ण क्षेत्र मोकळें आहे हें यावरून दिसून येतें. हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें आणखी एक प्रमाण ह्मणून ही गोष्ट देतां येईल.

## व्यापारपरिषद.

अलीकडे युद्धामुळें हिंदुस्थानच्या व्यापाराचा प्रश्न फार नाजुक झाला आहे. अशावेळीं साऱ्या हिंदुस्थानच्या हितास जपणारी व्यापारपरिषदेसारखी संस्था अत्यंत आवश्यक आहे असें जाणून मुंबईचे ठळक ठळक व्यापारी, दलाल, वगैरेंनीं येत्या नाताळांत कांग्रेस बरोबरच आपल्या व्यापारपरिषदेची बैठक मुंबई येथें करण्याचें ठरविलें आहे. फार उत्तम गोष्ट. या परिषदेच्या स्वागत मंडळींत एकच दाक्षिणी गृहस्थ रा. शांताराम मंगेश हे आहेत. बाकी पारशी, गुजराथी, मारवाडी, व खोजे आहेत.

## एक ऐतिहासिक शोध.

मि. रतन टाटा यांनीं पाटणा शहराजवळ खोदकाम करण्यासाठीं दिलेल्या देणगीचें पहिलें फळ—एक ऐतिहासिक शोध—नुकतेच बाहेर आलें आहे. त्या खोदकामावरले मुख्य अधिकारी डा. स्पूनर यांनीं त्या जागीं इराणी शिल्परचनापद्धतीनें बांधलेला एक राजवाडा सांपडल्याचें मागें जाहिर केलें होतें. हा राजवाडा चंद्रगुप्त राजाच्या काळचा असून त्यावरून त्या काळीं इराणी लोकांची छाप हिंदुस्थानावर अनेक प्रकारें पडली होती असें डा. स्पूनर यांचें ह्मणणें आहे. या विषयींचा अधिक शोध करतांना त्यांना अनेक विचित्र गोष्टींची संगति लागली आहे. अशोक स्तंभाची रचना व त्यावरील लिपि यांचें इराणी शिल्प व लिपि यांच्याशीं सादृश्य आहे. अशोकाचे वेळीं त्याच्या राज्याचा पश्चिम भागाचा गव्हर्नर तुष्ट्रास्पा नांवाचा एक इराणी मनुष्य होता. चंद्रगुप्ताचे वेळीं कित्येक पारशी आचार विचार ही हिंदुस्थानांत रूढ झालेले होते. महाभारतांत पांडवांची सभा बांधणारा अप्रतिम कारागीर मयासुर किंवा असुर मय हा आहुर्मज्द नांवाचा पारशी असावा असें डा. स्पूनर यांचें ह्मणणें आहे. चंद्रगुप्ताचा वाडा पारसिकांच्या देशाची प्राचीन राजधानी पेर्सेपोलिस येथील राजवाड्याच्या धर्तीवर बांधलेला आहे. चंद्रगुप्ताचें कुलनाम मौर्य हे सुद्धां पारशी 'मर्व' या पासून आलेलें असावें. पारसिकांचा राजा सेल्यूकस निकेटर यानें आपली मुलगी चंद्रगुप्ताला दिली होती ही गोष्ट प्रसिद्धच आहे चंद्रगुप्ताला गादीवर बसविणारा आचार्य चाणक्य हा अथर्ववेदी होता. अथर्व वेदांत मंत्रतंत्रांचें बंड फार आहे. त्यावेळीं पारशी लोकांत हीमाग नांवाचे ब्राह्मण होते. त्यांच्यांत जादू मंत्र तंत्र फार रूढ असत. विष्णुपुराणांत ब्राह्मणांना 'मागा' असें ह्मटलेलें आहे, तें अर्थात या पारशी पुरोहितांना उद्देशून असलें पाहिजे. या एकंदर पुराव्यांवरून चंद्रगुप्ताचें वेळीं पारशी लोकांचे हिंदुस्थानांत उत्तम वर्चस्व बसलें होतें असें डा. स्पूनर यांचें ह्मणणें आहे. हा त्यांचा शोध सिद्धांत ह्मणून ग्रहण करण्यापूर्वीं त्यांच्या विधानांची सत्यता कसोटीला लावणें अवश्य आहे. डा. सर भांडारकर, डा. गंगानाथ झा, महामहोपाध्याय हरप्रसादशास्त्री, प्रभृति प्राचीन संशोधक मंडळी हा शोध सत्याच्या कसोटीला लावल्यावांचून त्याचें ग्रहण करणार नाहींतच. त्यांच्या कसोटीला हा शोध उतरल्यास हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासावर एक नवीन प्रकाश पडला असें खास ह्मणतां येईल.

# युद्धवृत्त.

लढाईच्या बातम्या ऐकण्याची उत्कंठा फार असते आणि दररोजच्या तारा प्रथम वाचावयाला मिळाव्या ह्मणून किती तरी उड्या पडत असतात. खेळ जसा एखाद्या वेळेला अगदीं नीरस होत जातो तसाच प्रकार सध्याच्या युद्धाचा झाला आहे. हल्लीं लढाईचा मोर्चा असा दिसतो कीं शत्रूंच्या हालचाली पुरतीच लढाई काय ती द्यावी आणि सर्व संयुक्त राष्ट्राचे प्रयत्न युद्धसामुग्री, लष्करें, विमानें, हीं प्रचंड वाढविण्याकडे चालले आहेत. जगांतील अद्भुत अशी एक प्रचंड ढाई देण्यासाठीं सर्व पूर्व उद्योग चालू आहेत आणि हा जेव्हां पूर्व उद्योग पूर्णतेला येऊन पोंचेल तेव्हां मात्र सगळ्या जगाला हालऊन सोडणारी अशी घनघोर लढाई होईल आणि मग लढाईचा शेवट होईल असा रंग दिसतो. तथापि लोकांची जिज्ञासा पुरी करण्याच्या हेतूनें गेल्या पंधरवाड्यांतील लढाईची संगतवार हकीकत आह्मी सरकारी साप्ताहिक लेखावरून खालीं देत आहों.

### रशियाचा आरमारी जय.

रीगाचे आखतांत एका आरमारी लढाईत रशियनांनीं जर्मनांवर जय मिळविला व जर्मनांच्या कित्येक टार्पेडो बोटी बुडविल्या, आणि एका ब्रिटिश पाणबुड्या बोटीनें जर्मनांचें एक सर्वांत मोठें व उत्कृष्ट लढाऊ जहाज टॉर्पेडो मारून बुडविलें असें गेल्या लेखांत सांगितलें होतें. आतां त्यासंबंधानें अधिक माहिती आली आहे. सेक्रेटरी ऑफ स्टेट यांजकडून व्हाइसरॉय साहेबांस आलेल्या तारेंत असें ह्मटलें आहे कीं रीगाचे आखाताचे तोंडाशींच रशियाच्या एका ठाण्यावर जर्मन आरमार हल्ला करित होतें. हा हल्ला करण्यांत शत्रूचा उद्देश असा होता कीं ह्या आखाताचे ईशान्य कोपऱ्यांत 'पर्नाऊ' येथें आपलें सैन्य उतरवावें, व ह्या सैन्यानें बाल्टिक प्रांतांत लढत असलेल्या जर्मन सैन्यास मदत करावी. पण त्यांचा पराभव झाला तेव्हां जर्मनांना आपला हा बेत सोडून द्यावा लागला. कारण त्यांचीं गलबतें तर बुडालींच पण त्याशिवाय चार मोठमोठ्या बोटींत भरलेल्या आपल्या सैन्यासही ते मुकले. कारण हें सैन्य राशियनांनीं कैद करून नेलें.

### स्थल युद्ध.

आरमारी विजय संपादन केल्यामुळें रीगाचे आसपास राशियाला आपलें व स्तानं बळकट राखतां आलें. तथापि निकरानें लढत लढतच रशियन सैन्य मध्यभागाकडे एक एक पाऊल मागें हटत आहे. ता. २४ व २५ आगष्ट रोजीं राशियनांनीं 'व्हिल्ना, जवळ शत्रूस थोपवून धरलें. पण आतां 'वुइलिया' नदीच्या दोन्हीं कांठांनीं राशियन सैन्य हळूं हळूं मागें सरत आहे. बग नदीवरचा 'ब्रेस्ट—लायटोव्हस्क' नांवाचा किल्लाही राशियनांनीं सोडून दिला. पण ह्यांत कांहीं विशेष महत्त्व नाहीं कारण शत्रूच्या उपयोगी पडेल अशी एकही वस्तु राशियनांनीं मागें ठेवली नाहीं.

### पश्चिम रणभूमीवर.

पश्चिम रणभूमीकडून बातमी फारच थोडी येत आहे. बऱ्याच भागांतून तोफांची पुष्कळशी सरबत्ती झाली अशी फ्रेंचांकडून बातमी आली आहे. फ्रेंच वैमानिकांनीं जर्मनींतील 'लोरीक' रेल्वे स्टेशनावर बांब टाकले. 'व्होसजेस' परगण्यांत आणि 'फेच्ट' नदीचे खोऱ्यांत जीं ठाणीं फ्रेंचांनीं नुकतीच सर केलीं होतीं तीं ते मजबूत करित आहेत.

### इताली.

इतालियन सैन्य आस्ट्रियनांवर सारखी चढाई करितच आहेत. अशी बातमी आली आहे कीं 'आयसोंझो' नदीचे वरच्या तीरावर व तसेंच 'कार्सो' पठारावरही त्यांनीं आणखी खंदक सर केले आहेत.

### तुर्कस्थान.

इतालीनें तुर्कस्थानाविरुद्ध युद्ध जाहिर केलें असें गेल्या लेखांत कळविलें होतें. ह्या संबंधानें आतां आणखी तपशीलवार माहिती आली आहे. इतालीनें तुर्कस्थानाविरुद्ध युद्ध जाहिर केलें तें दोन कारणा करितां. पहिलें कारण हें कीं, उत्तर आफ्रिकेंतील 'लिबिया' नामक प्रदेशांतील कांहीं इतालियन प्रजेला बंड करण्यांत तुर्कांनीं मदत केली; व दुसरें कारण असें कीं, तुर्कस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं कांहीं इतालियन लोक राहत असत व आपल्या मायं–देशानें ह्मणजे इतालीनें आस्ट्रियाविरुद्ध जेव्हां युद्ध जाहिर केलें तेव्हां ते तुर्कस्थानांतून निघून जात असतांना तुर्कांनीं त्यांस प्रतिबंध केला.

इतालीनें तुर्कस्थानाविरुद्ध युद्ध जाहिर केलें ही गोष्ट महत्त्वाची आहे. कारण ह्यामुळें दार्देनेल्समध्यें दोस्तराष्ट्रांना चांगलेंच बळ येईल व तुर्कांवर जो जय अखेर मिळणार त्याला ह्यानें मदत होईल.

इकडे दार्देनेल्समध्यें युद्ध चांगलेंच जोरावर आहे. 'सुल्व्हा' चे उपसागरावरील किनाऱ्यावर ब्रिटिश सैन्य उतरवण्यांत आलें हे मागील लेखांत कळविलें आहे. तुर्कांचीं ठाणीं विशेष मजबूत असल्यामुळें ह्या सैन्याला पहिल्या पहिल्यानें फारसें पुढें सरकतां आलें नाहीं. पण आतां अशी बातमी आली आहे कीं डाव्या बाजूनें ब्रिटिश सैन्य बरेंच पुढें घुसलें व त्यानें ७०० यार्ड पर्यंत खंदक सर केले आहेत. एका फ्रेंच विमानानें तुर्कांचें एक सैन्यवाहक जहाज बुडविलें.

दोस्तराष्ट्रांनां वर लिहिल्याप्रमाणें जय मिळाले व इतालीही ह्या लढ्यांत तुर्कस्थानाविरुद्ध सामिल झाला ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं कान्स्तांतिनोपल येथील लोक अगदीं घाबरून गेले आहेत असें ह्मणतात. ह्या शहरांत अन्नाचा व कोळशाचाही तुटवडा भासूं लागला आहे. अशीही

बातमी आली आहे. हें जर खरें असले तर मग तुर्कस्थानाला दार्ती तृण धरून यावयाला कांहीं फारसा वेळ लागणार नाहीं. आणि असें झालें तर त्याचा परिणाम बाकीच्या युद्धावरही चांगलाच होईल, कारण त्यानें जर्मनी लुला पडेल पण दोस्तराष्ट्रांनां व विशेषतः राशियाला चांगलेंच बळ येईल, कारण राशियाला दारूगोळ्याची जी येवढी नड येऊन पडली आहे ती आपणास भागवितां येईल.

### दारूगोळ्याच्या कारखान्याचें काम

तोंपर्यंत लढाईस लागणारा दारूगोळा अधिकें अधिक झपाट्यानें तयार होत आहे. गेल्या कांहीं महिन्यांत रशियानें आपल्या दारू गोळ्याची पैदास दुपटीनें वाढविली आहे असें ह्मणतात. ग्रेट ब्रिटनमध्यें हें काम जोरानें चाललेंच आहे व तोफांच्या गोळ्यांच्या कवच्या हिंदुस्थानांत तयार करण्याच्या कामा संबंधानें ही व्यवस्था पुरी झाली आहे. दारूगोळा तयार करण्याचे दोन कारखाने कलकत्यांत सुरूंही करण्यांत आले. कित्येक लोकांनीं ह्या कामास लागणारीं आपलीं यंत्रें व हत्यारें युद्ध संपेपर्यंत सरकारच्या स्वाधीन केलीं आहेत. या शिवाय पुष्कळ नेटिव्ह संस्थानांनींही उदारपणानें मदत केली आहे.

### अमेरिका व जर्मनी.

इकडे, जे ' आरेबीक ' नांवाचें जहाज जर्मनांनीं बुडविलें ह्मणून मागल्या लेखांत कळविलें त्या संबंधानें अमेरिकेनें चौकशी सुरू केली आहे. आतां ही अखेरची कान उघडणी अमेरिकेनें केली ह्मणजे तरी जर्मनी अधिक सदय व कमी गैरकायदेशीर युद्ध पद्धती स्वीकारील अशी आशा आहे.

### सारांश.

रीगाच्या आखातांत राशियाला मिळालेल्या आरमारी जया मुळें जर्मनांच्या आरमाराला मागें फिरावें लागलें व त्यामुळें जर्मनांना आपलें सैन्य किनाऱ्यावर उतरवितां आलें नाहीं; आणि यामुळेंच, जरी राशियन सैन्य इतर ठिकाणीं मागें हटत आहे तरी त्याला रीगाचे आसपास दम धरून राहतां आलें. पश्चिम रणभूमीवर फ्रेंचांना कांहीं जय मिळाले. इतालीनें तुर्कस्थानाबरोबरही युद्ध सुरू केल्यामुळें दार्देनेल्समध्यें दोस्त राष्ट्रांना बराच जोर सांपडेल. तेथें ब्रिटिश व रशियन सैन्याची आघीच सरशी होत आहे. दारूगोळा अधिकाधिक झपाट्यानें तयार होत आहे. दर्यावरील युद्धांत जर्मनीनें स्वीकारलेल्या बेकायदेशीर युद्ध पद्धतीचा अमेरिका पुनः निषेध करित आहे.

लढाईच्या बातम्या असाव्या तितक्या पुरेशा व समाधानकारक नाहींत. आस्ट्रो जर्मन आर्मीनें आपलें पाऊल व्हिल्ना, ग्रोडनो यांच्या दरम्यान आरेंज शहरापर्यंत जोरानें पुढें सरकाविलें आहे. दाक्षिणेकडे त्याची मजल लक शहरापर्यंत येऊन पोंचली. राशियाची युद्धाची पद्धती वार्सा शहर शत्रूच्या हवाली करून दिलें तेव्हांच जगाच्या निदर्शनास येऊन चुकली आहे. हळूं हळूं मागें पाऊल घ्यावयाचें आणि शत्रूच्या हातीं कपर्दीक देखील लागू न देतां शत्रूचा दारूगोळा खर्ची घालावयाचा हा राशियाचा क्रम एक सारखा चालू आहे.

कधीं कधीं राशियन सैन्य माघार घेतांना आपल्या रस्त्यांतील पिकें मुद्दां लुटून आणित असे. जर्मनांच्या हातांत पडू नये ह्मणून कित्येक खेडींचीं खेडीं त्यानीं उध्वस्त करून टाकलीं. येणें प्रमाणें शह पाठ शह करीत करीत जर्मनीला राशिया आपलीं पाऊलें पुढें मागें टाकीत चालली आहेत. पूर्वेकडील रणक्षेत्रांत विशेषें करून लढाई झालेली नाहीं. फ्रेंच आपली जागा धरून बसले आहेत आणि कोठें कोठें तोफांचा भडिमार कचित् कचित् होत असतो. फ्रेंच विमानांनीं उवरे, मुलहसेन, ऑस्टेंड आणि थारउट इत्यादि ठिकाणीं जर्मन लोकांचा चांगलाच पाडाव केला आणि ज्या ज्या ठिकाणीं प्राणहारक गॅस जर्मन लोक तयार करितात तेथें फ्रेंच विमानानें पुष्कळ संहार केला. इटालियन सैन्याची ऑल्प्स दऱ्या मधून बरीच प्रगति झाली आहे. त्यांच्या विमानांनीं गर्दी सरोवराचा धुव्वा उडवून दिला. डार्डानेलिसकडे बीयू ॲनफाटा या दरीचा भाग संयुक्त राष्ट्रांच्या ताब्यांत आला असून तुर्की लोकांचा पुष्कळसा दारूगोळा ही सापडला आहे.

काल आजपर्यंतच्या बातम्यांवरून असें दिसतें कीं लढाई जितकी निकरावर यावी तितकी येत नाहीं तथापी श्रीमंत चक्रवर्ती झार साहेब हे स्वतः सेनाध्यक्ष होऊन समरांगणांत उभे आहेत. पाश्चिमेकडील रणक्षेत्रांत राशियन सैन्याला गॅलिशियातील टोर्नोपोल येथें चांगलेच जय मिळाले. जर्मनीचे २९०० लोक कैदी करण्यांत आले. आणि या संबंधानें राशियाचा जय जयकार सर्वत्र चालू आहे. आरॅसपासून सॉइसन्स पर्यंत फ्रेंच व जर्मन तोफखान्यांची चांगली चकमक उडाली आणि त्यांत जर्मन शत्रूंचें पुष्कळ नुकसान झालें.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— या आठवड्यांत दोनतीन दिवसांतच ४ इंचाहून अधिक पाऊस झाला आणि या पूर्वा नक्षत्राच्या पावसानें बरीच दाणादाण उडवून दिली. आतां शनवारपासून चांगली उघाडी आहे. एकंदर पाऊस २४ इंच झाला. पिकें चांगल्या स्थितींत आहेत आणि प्लेगाची रोगराई खेरीज करून सार्वजनिक आरोग्य अधिक समाधानकारक असावयाला पाहिजे.

प्लेगः— १३ आगस्टला आकोल्यास प्रथम प्लेगाचा प्रारंभ झाला. तेव्हांपासून गेल्या ९ व्या तारखेपर्यंत प्लेगाच्या मृत्यूचें प्रमाण सौम्य ह्मणजे ४–६ असेंच होतें. पण त्या नंतर प्लेगाचे मृत्यु ८–७–१२–१८–१४–अशा आकड्यांनीं वाढत आहेत. मुर्तिजापूरचा प्लेग बहुतेक शमत चालला आहे पण लाखपुरी येथील प्लेगाचे मृत्यु वाढत आहेत. आकोल्याच्या आसपासच्या खेड्यांत प्लेगाचा उद्भव होण्याचा संभव अधिक असल्यामुळें त्या संबंधानें सरकारी योजना जोरानें चालू आहेत. परवाच्या पावसानें झोपड्यांतून रहावयास गेलेल्या लोकांची विशेष दाणादाण उडाली आणि कित्येक गरीब कुटुंबें नाइलाजास्तव आपल्या घरीं परतही आलीं. इतक्या वर्षाच्या अनुभवानें स्थानत्यागासारखा रामबाण उपाय दुसरा नाहीं. हें सर्वांस कळून चुकलें आहे आणि जो तो आपापल्या परीनें प्राणाला अधिक प्रिय करीत आहे. तेव्हां अशा वेळीं फक्त अनाथ कुटुंबांस झोपड्यांची मदत देण्याकरितां एक धर्म फंड उभारणें फार अवश्यक आहे. आणि या कामीं उदार व सदय लोक चांगला पुढाकार घेतील. व या कामीं आमचे डेप्युटि कामिशनरही लोकांस योग्य मार्ग दाखविण्याला नेटानें मदत करितील, अशी आह्मास उमेद आहे.

राव बहादूर काशीनाथ केशव ठाकूर डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्ज पश्चिम वऱ्हाड हे रजेवरून परत येऊन आपल्या कामावर दाखल झाले. यांच्या सारखा थोर, अनुभवी व जुना सरदार पुन्हां याच भागाला लाभला ही विशेष आनंदाची गोष्ट होय.

राव बहादूर विनायक मोरेश्वर केळकर हे येथेंच फर्स्ट आडिशनल डिस्ट्रिक्ट जज्ज होऊन रा. रा. गोपाळ वामन बापट हे चांदा येथें डिस्ट्रिक्ट जज्यच्या जागीं दाखल होण्यासाठीं गेल्या बुधवारीं येथून रवाना झाले. रावश्री बापट यांनीं येथील मंडळीचा निरोप घेतला तेव्हां त्यांच्या बद्दलचा प्रेमभाव व आदरबुद्धी हीं विशेषतः स्पष्टतेनें दिसून आलीं.

## हिंदुस्थान सरकाराकडून काढण्यांत येणारें मुदतबंद कर्ज.

पोष्ट आफिसा मार्फत कर्ज द्यावयाचें असल्यास तें कोणत्या अटीवर देतां येतें या संबंधीं नोटीस.

या सालीं सरकार निराळ्या स्वरूपाचें कर्ज काढीत आहे, व त्यावर शेंकडा ४ टक्के व्याज देण्यांत येईल. ह्या कर्जाची पूर्ण फेड फार उशिरां ह्मणजे सन १९२३ चे नोव्हेंबर महिन्यांत करण्यांत येईल. परंतु सन १९२० चे आक्टोबर महिन्या नंतर केव्हांही तें फेडून टाकण्याचा हक्क सरकारनें आपले स्वाधीन ठेविला आहे.

२ कलकत्ता, मद्रास, मुंबई व इतर मोठमोठीं शहरें येथून अर्ज येऊन मामुली पद्धती प्रमाणें ४॥ कोटींचें कर्ज आधींच जमा झालें आहे; आणि ह्या रकमेपुरतें तरी कर्ज घेणें आतां बंद करण्यांत आलें आहे. परंतु लहान रकमांनीं कर्ज देण्याची ज्यांची इच्छा असेल मग ते सेव्हिंग्स बँकांमध्यें ठेवी ठेवणारे असोत वा नसोत, अशा इसमांना सेव्हिंग्स बँकेचें कामकरणाऱ्या अगदीं नजीकच्या पोष्ट आफिसाचे मार्फत कर्ज देण्यासाठीं आणखी एक खास संधी देण्यांत येत आहे.

### कर्ज कसें द्यावें.

३ ता० ३० आक्टोबर पर्यंत केव्हांही पोस्ट आफिसाचे मार्फत अर्ज पाठवितां येतील.

४ अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांहून कमी नाहीं व शंभरांनीं बरोबर भाग तुटेल इतक्या रकमेसाठीं द्यावा. व कोणाही एकाच अर्जदारास ५००० हून जास्त रकमेकरितां केव्हांही अर्ज करितां येणार नाहीं.

टीपः— शेंकडा ३॥ टक्के व्याजाच्या कर्जाच्या प्रॉमिसरी नोटा जरी यापूर्वींच कोणी पोस्ट आफिसामार्फत विकत घेतलेल्या असल्या तरी त्याला ह्या नवीन कर्जापैकीं ५००० रुपयांपर्यंत कर्ज देण्यासाठीं अर्ज करितां येतो.

५ ज्याला अर्ज करण्याची इच्छा असेल त्यानें पुढें दिलेला अर्जाचा नमुना भरावा. सेव्हिंग्स बँकचें काम करणाऱ्या कोणच्याही पोस्ट आफिसांत हा नमुना मिळेल. पण अर्जाबरोबरच जितकें कर्ज देण्यासाठीं तो अर्ज असेल तितकी रक्कम अर्जदारानें भरली पाहिजे. अर्जदाराची जर सेव्हिंग्स बँकमध्यें ठेव असली तर त्या ठेवीचा ही या कामाकरितां त्यास उपयोग करितां येईल, किंवा स्वतंत्र रोख रक्कम देतां येईल अर्जदारानें पोस्ट आफिसांत स्वतः जावें किंवा दुसऱ्या कोणास पाठवावें. दिलेल्या प्रत्येक रकमेबद्दल पावती देण्यांत येईल.

६ अर्जदार जितकी रकम देईल त्या सर्व रकमेइतक्या त्याला शंभर शंभर रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा देण्यांत येतील.

### प्रॉमिसरी नोटा कोणी ठेवाव्यात.

७ ह्या नोटा अर्जदारानें आपल्या स्वतः पाशींच ठेवाव्यात. अगर मर्जीस वाटल्यास आपल्यातर्फे त्या पोस्टाचे अधिकाऱ्यांजवळच राहूं द्याव्यात. कोणाची पद्धति आपणास पसंत आहे. हें अर्जाचा नमुना भरतांना त्यानें नमूद करावें. नोटा आपल्या जवळच ठेवण्याची त्याची इच्छा असली तर त्या त्याचे हवालीं करण्याकरितां तयार होऊन आल्या ह्मणजे पोस्ट आफिस त्याला तसें कळवील. आणि तो त्या घेण्याकरितां स्वतः हजर झाला ह्मणजे त्या त्यास देण्यांत येतील. त्या नोटा पोस्ट आफिसांतच राहूं देण्याचें त्यानें ठरविलें तर त्याला पुन्हां पोस्ट आफिसांत जाण्याचें कारण नाहीं त्यानोटा आपणाकडे आल्या आहेत, व अर्जदाराकरितां त्या ठेवण्यांत आल्या आहेत, असें पोस्ट आफिस अर्जदाराला योग्यवेळीं कळवील. पुढें कधीं जर ह्या नोटा आपले पाशींच ठेवाव्या अशी त्याची इच्छा झाली तर पोस्टाचे अधिकारी त्या त्याचे स्वाधीन करितील.

### व्याजाची अदाई.

८ शेंकडा ४ टक्यांप्रमाणें व्याज वर्षांतून दोन वेळां ह्मणजे शेंकडा २ टक्के मे महिन्याचे ३१ वे तारखेस व २ टक्के नोव्हेंबरचे ३० वे तारखेस दरसाल देण्यांत येईल. कर्ज दिल्याचे तारखेपासून तों येत्या नोव्हेंबरचे ३० वे तारखे पर्यंतच्या तुटक मुदतीसाठीं जें व्याज होईल तें, अर्जदार नोटा आपल्यापाशींच ठेवील तर, त्या नोटा त्याचे स्वाधीन करण्याचे वेळीं त्यास रोख देण्यांत येईल, व त्यानें पोस्टाचेअधिकाऱ्यांचे ताब्यांतच त्या ठेविल्या तर पुढील परिशिष्टामध्यें निर्दिष्ट केलेलें जें त्याचें खातें ठेवण्यांत येतें, त्या खातीं त्याचें नांवानें तें जमा करण्यांत येईल.

९ आपल्या प्रॉमिसरी नोटा पोष्टाचे अधिकाऱ्यांचेच ताब्यांत ठेवाव्या, असें अर्जदारानें ठरविलें तर अर्जदाराचे नांवानें एक सेव्हिंग्स बँकखातें ह्याप्रीत्यर्थ सुरू करून पोष्टाचे अधिकारी त्या नोटांचें व्याज दर सहा माहींस वेळच्यावेळीं घेऊन तें अर्जदाराचे खातीं जमा करितील. जेव्हां जेव्हां येणें प्रमाणें व्याज घेण्यांत येईल. तेव्हां तेव्हां ती गोष्ट ही पोष्टाचे अधिकारी त्यास वेळोवेळीं कळवितील. हें काम करण्याबद्दल सरकार अर्जदारापासून कांहीं घेणार नाहीं.

आणि हें सहामाही व्याजदेतांना त्यावर इन्कमटाक्स ( प्राप्तीवरीलकर ) कापून घेण्यांत येणार नाहीं.

अर्जदारानें प्रॉमिसरी नोटा आपलेपाशींच ठेविल्या तर सहामाही व्याज देण्याचे वेळीं त्यावर नेहमीं प्रमाणें इन्कमटाक्स कापून घेण्यांत येईल.

### प्रॉमिसरी नोटांची विक्री.

१० वर सांगितलेल्या पद्धतीनें पोष्टामार्फत विकत घेतलेल्या नवीन कर्जाच्या प्रॉमिसरी-नोटा ज्याच्या जवळ असतील अशा सेव्हिंग्स बँकेचे ठेविदाराचे मनांत केव्हां ही असें आलें कीं, त्या किंवा त्यापैकीं कांहीं नोटा विकून टाकाव्या. तर त्याचेसाठीं त्या विकून टाकण्याची ही व्यवस्था पोष्ट आफिस करील. व त्या कामासाठीं दलाली अगर फी कांहीं एक घेणार नाहीं. ह्यासंबंधानें तपशिलवार माहिती पाहिजे असल्यास ती पोष्टआफिसांत केव्हां ही मिळेल.

### अर्जाचा नमुना.

मी ———————

या अन्वयें अर्ज करितों कीं ता. २८ जुलई सन १९१५ चे गॅझिट आफ इन्डिया, एक्स्ट्रा ऑर्डिनरी मध्यें जाहीर करण्यांत आलेल्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या मुदतबंद कर्जापैकीं ——— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

+ [ बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे ती रक्कम ——— रुपये मी या अर्जाबरोबर दाखल करीत आहे.

बरोबरीच्या दरानें जितके कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे तितकी रक्कम ह्मणजे ——— रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून ह्या कामासाठीं मला मिळावी अशी मी विनंति करितों.

बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे त्या रकमेच्या अदाई करितां मी ——— रुपये या अर्जाबरोबर दाखल करीत आहे व बाकीची रक्कम ——— रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून मला मिळावी अशी मी विनंति करितों.

माझी अशी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलच्या प्रॉमिसरी नोटा अकौंटंट जनरल, पोस्ट ऑफिस व टेलेग्राफ्स्, यांचे जवळ माझेसाठीं ठेवाव्या आणि त्याबद्दलचें व्याज ठरीव मुदतीनीं माझे नांवें सुरू केलेल्या पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेचें खात्यांत माझे नांवें जमा करावें.

माझे पासून जितकें कर्ज घेण्याचें मंजूर होईल * त्या रकमेच्या खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रॉमिसरी नोटा मला देण्यांत याव्या.]

नांव ———————

पत्ता ———————

तारीख ——————— १९१५

* ( वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा. )

+ [ ] वरील या खुणामधील मजकूरांतील अनवश्यक बाबी खोडून टाकाव्या.

### नोटीस

नोटीस बेशमी बळीराम वा॥ शिवराम-आप्पा वाणी आडनांव वढाळकार राहणार सावरगांव तहसील काटवल जिल्हा नागपूर पोष्ट सावरगांव यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार असून सुमारें चार वर्षें झालीं. तुह्मी मला मारून घरांतून बाहेर घालवून दिली. यापूर्वींही तीन वेळां तुह्मी मला मारून बाहेर घालवून दिली होती. परंतु पुनः परत घरीं नेत गेले. परंतु यावेळेस आज चार वर्षें झालीं तरी घरीं नेले नाहीं. व मी आले असतां घरांतून काढून देतां. या चार वर्षांत मला खाण्यापिण्यास व कपड्यालत्त्यास कर्ज रुपये ६०० सहाशें सावकारापासून काढावे लागले. करितां नोटीस देण्यांत येते कीं, ही नोटीस देण्यांत आल्यापासून एक महिन्याचे आंत तुह्मी कर्जाचे रुपये ६०० सहाशें घेऊन येऊन सावकाराचे रुपये देऊन मला घेऊन जावे. असें न केल्यास एक महिन्यानंतर हिच तुमची फारकती समजून मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. मग तुमचा माझेवर अगर गंधर्व लावणारावर कोणत्याही प्रकारचा हक्क किंवा बोजा राहणार नाहीं. तुह्मी गंधर्वाची बायको करून आपला संसार चालवित आहां. व मला नांदवीत नाहीं करितां माझी अशी दशा केली. वरील नोटीस अगाऊ कळविण्याकरितां दिली आहे. तुह्मी रुपये न दिल्यास दिवाणींत दावा करून तुमचे पासून भरून घेईन. ही नोटीस दिली तारीख २९–६–१५ इसवी. सही.

सहिचा आंगठा सुमित्रा भ्रतार बळीराम वाणी वढाळकार राहणार सावरगांव हल्लीं मुक्काम सायखेड तालुके केळापूर जिल्हा यवतमाळ पोष्ट पांढरकेवडा.

नो० नं० ३५७

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रेल्वेनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो. नं १६३

सतत ४२ वर्षे चालेलला कारखाना.

## ए. जे. ह्यात्रे आणि सन सुगंधी.

ठि:—पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदार भुलेश्वर — मुंबई.

एकच भाव! ओटो सुरंगी! एकच भाव!!

### आमचेकडे मिळणारा माल

### ओटो सुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४ ६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, मुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत अरगजा व फितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिर्के, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,26 9 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,86,509 |

## BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitntes sa recort for the company. The next Division of profits will be made at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

## *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserve Fund, divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0 -

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted-Terms libera

***M. deSOUZA,***
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
NagPUr.

V. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख २० माहे सप्टेंबर सन १९१५ ई० [ अंक ३७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पै यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } S. Clements,
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं २

## अस्सल अंगुरी.

## हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ।।।≈ ता. शुद्ध शिलाजीत. -।।- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९

नो० नं० ८

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

# चांदीचीभांडी

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

## ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास **'वैशेषिक दर्शन'** बक्षीस.

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयावें विवेचन करणारें—

## आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १० रु आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो. नं० ३

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस मुद्राङ्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच अठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागे येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भत्त्याचे, किस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, } मॅनेजर
सदाशिवाश्रम, आकोलें }

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो. नं १९३

## नोटीस

नोटिस बेशर्मा मोतीलाल बन्सीलाल साहू दुकान आकोला. यांस—

आह्मी खालीं सह्या करणार दोघे भाऊ यांजकडून नोटिस दिली जाते कीं, आमचे बापाची राख नामें अंबी मर्द परशराम धनगर रा० रिधोरे हिला ती जिवंत असे पर्यंत अगर ती दुसरा नवरा न करी पर्यंत खाण्यास मौजे रिधोरे येथील शेत सर्वे नंबर १३ हा दिला गेला होता. पुढें सदहु शेत अंबीनें तुमचेकडे गहाण ठेवलें. त्या बाबतींत तुमचे आमचे मध्यें खटला चालून सरकारकडून ती जिवंत असे पर्यंत अगर गंधर्व न करीपर्यंत अन्नवस्त्राखातर हें शेत तिजकडे अगर तुमचेकडे रहावें असें ठरलें. आतां सदहु अंबीनें ता० ८ माहे आगष्ट १९१५ रोज रविवारीं गंधर्व केलें आहे. आणि ह्मणून सदरहु शेताची मालकी आमचेकडे आहे. तरी या नोटिशीनें कळवितो कीं, नोटिस पावतांच ८ दिवसांत सदर्हु शेत व त्या पीका सुद्धां आमचे ताब्यांत द्यावें. तसें मुदतांत न केल्यास कोर्ट मार्फत दावा आणून उभ्या पीकासुद्धां किंवा पिकाचे नुकसानीसुद्धा शेत कबजांत घेण्यांत येईल. कळावें. तारीख १२-९-१९१५ इसवि सह्या

मुकुंदराव जानराव देशमुख द० खु०
सीताराम जानराव देशमुख रा. रिधोरे
ता. बाळापूर नि. आंगठा खुद
नो० नं० ३९८

## नोटीस

नोटिस बेशमी चंद्री मर्द नामदेव शिंपी रा. आकोली जहागीर पो. आकोली ता० आकोट हीसः—

खालीं सही करणार नोटिस देतो कीं, त्वां वऱ्हाडसमाचार आकोला या पत्रांत ता. २२-८-१५ ची नोटिस दिली ती पावली. तुझे व माझें लग्न झाल्यास १०-१२ वर्षें झालीं. ९ वर्षें मी तुझें संगोपन केलें. या अवधींत मी तुला कांहींच त्रास दिल्याचे दिसत नसून तूं नऊ वर्षें माझे येथें सुखानें नादलीस. दोन वर्षांपूर्वी तुझा सावत्र बाप नेण्याकरितां आला त्यावेळीं आह्मी तुला पाठविलें. त्यावर सात आठ वेळां कांहीं संभावित लोक बरोबर घेऊन नेण्यास आलो तरी तुझ्या सावत्र बापानें तुला पाठविले नाहीं. मारहाण बद्दल तुझें निष्कारण तुफान आहे. आतां जर तूं येण्यास कबूल आहेस तर आह्मी नेण्यास सुद्धां आलो असतो. परंतु तुझा सावत्र बाप फार रागीट मनुष्य आहे. कदाचित तक्रार वगैरे करील. या भितीनें आमचें धैर्य होत नाहीं. तूं जर वागण्यास तयार आहेस तर आह्मी ही फार खुशीनें तुझें संगोपन करूं. व केलेंही. मी जर वागविण्यास तयार नसतों. अगर नेण्यास आलों नसतो तर खावटी दिली असती. आतां १५ दिवसाचे आंत तूं आपले घरीं यावें अगर तुझा विचार असल्यास तुला नेण्यास मी येतो. कळावें. ता० १४-९-१९१५ सही

नामदेव मानाजी चंदरकार शिंपी.
रा० दाहिगांवरेच ता. दर्यापूर.
नि० आंगठा
नो० नं० ३९९

## हिंदुस्थान सरकाराकडून काढण्यांत येणारें मुदतबंद कर्ज.

पोष्ट आफिसा मार्फत कर्ज द्यावयाचें असल्यास तें कोणत्या अटीवर देतां येतें या संबंधीं नोटीस.

या सालीं सरकार निराळ्या स्वरूपाचें कर्ज काढीत आहे, व त्यावर शेंकडा ४ टक्के व्याज देण्यांत येईल. ह्या कर्जाची पूर्ण फेड फार उशिरां ह्मणजे सन १९२३ चे नोव्हेंबर महिन्यांत करण्यांत येईल. परंतु सन १९२० चे आक्टोबर महिन्या नंतर केव्हांही तें फेडून टाकण्याचा हक्क सरकारनें आपले स्वाधीन ठेविला आहे.

२ कलकत्ता, मद्रास, मुंबई व इतर मोठमोठीं शहरें येथून अर्ज येऊन मामुली पद्धती प्रमाणें ४॥ कोटींचें कर्ज आधींच जमा झालें आहे; आणि ह्या रकमेपुरतें तरी कर्ज घेणें आतां बंद करण्यांत आलें आहे. परंतु लहान रकमांनीं कर्ज देण्याची ज्यांची इच्छा असेल मग ते सेव्हिंग्स बँकांमध्यें ठेवी ठेवणारे असोत वा नसोत, अशा इसमांना सेव्हिंग्स बँकेचें कामकरणाऱ्या अगदीं नजीकच्या पोष्ट आफिसाचे मार्फत कर्ज देण्यासाठीं आणखी एक खास संधी देण्यांत येत आहे.

### कर्ज कसें द्यावें.

३ ता० ३० आक्टोबर पर्यंत केव्हांही पोस्ट आफिसाचे मार्फत अर्ज पाठवितां येतील.

४ अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांहून कमी नाहीं व शंभरांनीं बरोबर भाग तुटेल इतक्या रकमेसाठीं द्यावा. व कोणाही एकाच अर्जदारास ५००० हून जास्त रकमेकरितां केव्हांही अर्ज करितां येणार नाहीं.

टीपः— शेंकडा ३॥ टक्के व्याजाच्या कर्जाच्या प्रॉमिसरी नोटा जरी यापूर्वीच कोणी पोस्ट आफिसामार्फत विकत घेतलेल्या असल्या तरी त्याला ह्या नवीन कर्जापैकीं ५००० रुपयांपर्यंत कर्ज देण्यासाठीं अर्ज करितां येतो.

५ ज्याला अर्ज करण्याची इच्छा असेल त्यानें पुढें दिलेला अर्जाचा नमुना भरावा. सेव्हिंग्स बँकचें काम करणाऱ्या कोणच्याही पोस्ट आफिसांत हा नमुना मिळेल. पण अर्जाबरोबरच जितकें कर्ज देण्यासाठीं तो अर्ज असेल तितकी रक्कम अर्जदारानें भरली पाहिजे. अर्जदाराची जर सेव्हिंग्स बँकमध्यें ठेव असली तर त्या ठेवीचा ही या कामाकरितां त्यास उपयोग करितां येईल, किंवा स्वतंत्र रोख रक्कम देतां येईल अर्जदारानें पोस्ट आफिसांत स्वतः जावें किंवा दुसऱ्या कोणास पाठवावें. दिलेल्या प्रत्येक रकमेबद्दल पावती देण्यांत येईल.

६ अर्जदार जितकी रकम देईल त्या सर्व रकमेइतक्या त्याला शंभर शंभर रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा देण्यांत येतील.

### प्रॉमिसरी नोटा कोणी ठेवाव्यात.

७ ह्या नोटा अर्जदारानें आपल्या स्वतः पाशींच ठेवाव्यात. अगर मर्जीस वाटल्यास आपल्यातर्फे त्या पोस्टाचे अधिकाऱ्यांजवळच राहूं द्याव्यात. कोणाची पद्धति आपणास पसंत आहे. हें अर्जाचा नमुना भरतांना त्यानें नमूद करावें. नोटा आपल्या जवळच ठेवण्याची त्याची इच्छा असली तर त्या त्याचे हवालीं करण्याकरितां तयार होऊन आल्या ह्मणजे पोस्ट आफिस त्याला तसें कळवील. आणि तो त्या घेण्याकरितां स्वतः हजर झाला ह्मणजे त्या त्यास देण्यांत येतील. त्या नोटा पोस्ट आफिसांतच राहूं देण्याचें त्यानें ठरविलें तर त्याला पुन्हां पोस्ट आफिसांत जाण्याचें कारण नाहीं त्या नोटा आपणाकडे आल्या आहेत, व अर्जदाराकरितां त्या ठेवण्यांत आल्या आहेत, असें पोस्ट आफिस अर्जदाराला योग्यवेळीं कळवील. पुढें कधीं जर ह्या नोटा आपले पाशींच ठेवाव्या अशी त्याची इच्छा झाली तर पोस्टाचे अधिकारी त्या त्याचे स्वाधीन करितील.

### व्याजाची अदाई.

८ शेंकडा ४ टक्यांप्रमाणें व्याज वर्षांतून दोन वेळां ह्मणजे शेंकडा २ टक्के मे महिन्याचे ३१ वे तारखेस व २ टक्के नोव्हेंबरचे ३० वे तारखेस दरसाल देण्यांत येईल. कर्ज दिल्याचे तारखेपासून तों येत्या नोव्हेंबरचे ३० वे तारखे पर्यंतच्या तुटक मुदतीसाठीं जें व्याज होईल तें, अर्जदार नोटा आपल्यापाशींच ठेवील तर, त्या नोटा त्याचे स्वाधीन करण्याचे वेळीं त्यास रोख देण्यांत येईल, व त्यानें पोस्टाचेअधिकाऱ्यांचे ताब्यांतच त्या ठेविल्या तर पुढील परिच्छेदामध्यें निर्दिष्ट केलेलें जें त्याचें खातें ठेवण्यांत येतें, त्या खातीं त्याचें नांवानें तें जमा करण्यांत येईल.

९ आपल्या प्रॉमिसरी नोटा पोष्टाचे अधिकाऱ्यांचेच ताब्यांत ठेवाव्या, असें अर्जदारानें ठरविलें तर अर्जदाराचे नांवानें एक सेव्हिंग्स बँकखातें ह्याप्रीत्यर्थ सुरू करून पोष्टाचे अधिकारी त्या नोटांचें व्याज दर सहा माहीस वेळच्यावेळीं घेऊन तें अर्जदाराचे खातीं जमा करितील. जेव्हां जेव्हां येणें प्रमाणें व्याज घेण्यांत येईल. तेव्हां तेव्हां ती गोष्ट ही पोष्टाचे अधिकारी त्यास वेळोवेळीं कळवितील. हें काम करण्याबद्दल सरकार अर्जदारापासून कांहीं घेणार नाहीं. आणि हें सहामाही व्याजदेतांना त्यावर इन्कमटाक्स (प्राप्तीवरीलकर) कापून घेण्यांत येणार नाहीं.

अर्जदारानें प्रॉमिसरी नोटा आपलेपाशींच ठेविल्या तर सहामाही व्याज देण्याचे वेळीं त्यावर नेहमीं प्रमाणें इन्कमटाक्स कापून घेण्यांत येईल.

### प्रॉमिसरी नोटांची विक्री.

१० वर सांगितलेल्या पद्धतीनें पोष्टामार्फत विकत घेतलेल्या नवीन कर्जाच्या प्रॉमिसरी-नोटा ज्याच्या जवळ असतील अशा सेव्हिंग्स बँकेचे ठेविदाराचे मनांत केव्हां ही असें आलें कीं, त्या किंवा त्यापैकीं कांहीं नोटा विकून टाकाव्या. तर त्याचेसाठीं त्या विकून टाकण्याची ही व्यवस्था पोष्ट आफिस करील. व त्या कामासाठीं दलाली अगर फी कांहीं एक घेणार नाहीं. ह्यासंबंधानें तपशिलवार माहिती पाहिजे असल्यास ती पोष्टआफिसांत केव्हां ही मिळेल.

### अर्जाचा नमुना.

मी ——————

या अन्वयें अर्ज करितों कीं ता. २८ जुलई सन १९१५ चे गॅझिट आफ इन्डिया, एक्स्ट्रा ऑर्डिनरी मध्यें जाहीर करण्यांत आलेल्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या मुदतबंद कर्जापैकीं —————— रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

+ [ बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे ती रक्कम —————— रुपये मी या अर्जाबरोबर दाखल करीत आहे.

बरोबरीच्या दरानें जितके कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे तितकी रक्कम ह्मणजे —————— रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून ह्या कामासाठीं मला मिळावी अशी मी विनंति करितों.

बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे त्या रकमेच्या अदाई करितां मी —————— रुपये या अर्जाबरोबर दाखल करीत आहे व बाकीची रक्कम —————— रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून मला मिळावी अशी मी विनंति करितों.

माझी अशी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलच्या प्रॉमिसरी नोटा अकौंटट जनरल, पोस्ट ऑफिस व टेलेग्राफ्स्, यांचे जवळ माझेसाठीं ठेवाव्या आणि त्याबद्दलचें व्याज ठरीव मुदतीनीं माझे नांवें सुरू केलेल्या पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेचें खात्यांत माझे नांवें जमा करावें.

माझे पासून जितकें कर्ज घेण्याचें मंजूर होईल * त्या रकमेच्या खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रॉमिसरी नोटा मला देण्यांत याव्या.]

नांव ——————

पत्ता ——————

तारीख —————— १९१५

* (वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा.)

+ [ ] वरील या खुणामधील मजकूरांतील अनवश्यक बाबी खोडून टाकाव्या.

वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद शुद्ध १२ शके १८३७

### प्रकाशाचें वजन.

एखाद्या वस्तूवर प्रकाश पडला ह्मणजे त्या प्रकाशाबरोबर तिच्यावर एक प्रकारचा भार ही येऊन पडतो, ही गोष्ट सांगितली तर खरी मुद्धां वाटावयाची नाहीं. पण आपल्या वाटण्यावर काय आहे! सत्य हें तुमच्या श्रद्धेची अपेक्षा मुळींच करीत नाहीं. तुह्मी त्यावर श्रद्धा ठेव अगर नका ठेवूं, तें अबाधितच राहणार.

सुमारें शंभर वर्षांपूर्वी प्रकाशाच्या उत्पत्तीसंबंधानें शास्त्रज्ञांचा असा विश्वास असे कीं तापलेल्या व प्रज्वलित पदार्थांपासून आपोआप एक अतिसूक्ष्म पदार्थ बाहेर पडून तो चोहींकडे पसरतो. या पदार्थाच्या अणूंच्या प्रवाहालाच आपण प्रकाश ह्मणतों. हें मत जों पर्यंत कायम होतें तों पर्यंत अणूंचा प्रवाह एखाद्या पदार्थावर येऊन आदळल्यास त्या पदार्थावर कशाचा तरी भार पडला असें ह्मणण्यास कोणताही प्रत्यवाय नव्हता. अर्थात् प्रकाशाला वजन आहे हें ऐकून चपापण्याचें कारण नव्हतें. पण गेल्या चाळीस पंनास वर्षांत न्यूटनच्या वरील मताला विरोधी असें प्रकाशोत्पत्ती संबंधाचें एक नवें मत यंग व फ्रेसनेल या दोघा शास्त्रज्ञांनीं प्रचलित केलें आहे. या शास्त्रज्ञांच्या मतें संपूर्ण अवकाशाला व्यापून टाकणारें स्थितिस्थापकतागुणविशिष्ट, व भारहीन असें ईथर नांवाचें जें एक तत्त्व आहे तें प्रकाशाचें उत्पत्तिस्थान. उष्णतेच्या योगानें पदार्थांचे अणु कंपायमान होऊन त्या कंपाचा धक्का ईथरला बसतो व त्यामुळें त्या ईथरमध्यें कंप उत्पन्न होतात, व या कंपांपासूनच प्रकाश उत्पन्न होतो. प्रकाशोत्पत्तीसंबंधाचें हेंच मत हल्लीं शास्त्रज्ञांमध्यें प्रचलित आहे. हें मत निघालें तेव्हां प्रकाशाच्या वजनाची कल्पनाच कोणाला शिवली नाहीं. ही कल्पना प्रथम विद्युत् व लोहचुंबक यांच्या संबंधाच्या शोधामुळें प्रासिद्धीस आलेले शास्त्रज्ञ मि० मॅक्सवेल यांना सुचली; पण ते आपल्या शोधांत त्यावेळीं इतके निमग्न झालेले होते कीं त्यांना या प्रकाशभाराकडे लक्ष देण्यास फुरसतच झाली नाहीं. त्यानंतर पांच चार वर्षांनीं ह्मणजे १८७६ सालीं मि० प्रेस्टन नांवाच्या गृहस्थाचें या विषयाकडे लक्ष गेलें व त्यांनें अनेक प्रयोग करून पाहिल्यावर असा सिद्धांत काढला कीं ज्या प्रमाणें बंदुकीतून गोळी सोडली कीं ती बंदुक सोडणारा व ज्याला लागते ती वस्तु या दोघांनाही धक्का देते, त्याचप्रमाणें प्रकाशाची ही गोष्ट आहे. प्रेस्टन साहेबांनीं प्रकाशाचा उगम जो सूर्य त्याची प्रकाशविकिरणशक्ति व प्रकाशक्षेपणामुळें उत्पन्न होणारा धक्का यांची शास्त्रीय पद्धतीनें गणना केली. पण गणितशास्त्र हें बिनचूक शास्त्र असल्यानें गणितशास्त्रानें ही गोष्ट सिद्ध केल्याखेरीज लोकांचा विश्वास त्या गोष्टीवर बसेना. ते गणितशास्त्रानुरोधानें या नवीन शोधाची उपपत्ति लावून दाखवा असें ह्मणूं लागले. तेव्हां हें काम प्रोफेसर लारमोर यांनीं आपल्या अंगावर घेऊन त्या कामीं अत्यंत परिश्रम केले, व शेवटीं गणितशास्त्राच्या पद्धतीनें असा सिद्धांत प्रस्थापित केला कीं कोणत्याही वस्तूपासून प्रकाशाचे किरण विकीर्ण होऊं लागले कीं त्या प्रकाशप्रक्षेपणापासून उत्पन्न होणारा धक्का निश्चल स्थितींतल्या प्रकाशप्रक्षेपणाच्या धक्क्यापेक्षां फार मोठा असतो. हा शोध येथेंच थांबला नाहीं. प्रो. लारमोर यांचे मागून लॉर्ड ऱ्याले, व डॉ. बार्लो यांनीं प्रकाशाच्या वजनासंबंधानें पुनः पुनः प्रयोग करून प्रो. लारमोर यांच्या सिद्धांताच्या सत्यत्वाविषयींची पूर्ण खात्री करून घेतली. डॉ. बार्लो यांनीं एका वायुहीन काचपात्रांत काचेचा एक तुकडा लोंबकळत ठेवून त्यावर प्रकाशाचे किरण सोडले. हे किरण त्या काचेच्या तुकड्यांत प्रविष्ट होऊन त्यांचें परिवर्तन होऊन बाहेर पडले तेव्हां त्या प्रकाशकिरणांच्या धक्क्यानें तो तुकडा फिरूं लागला. याप्रमाणें प्रका-

शाचे अंगीं धक्का देण्याची शक्ति अर्थात् वजन आहे हें सिद्ध झाल्यांवर शास्त्रज्ञांचें लक्ष पृथ्वी व ग्रहनक्षत्रांदिकावर सूर्यप्रकाशाचा भार पडून काय परिणाम होतात ते शोधण्याकडे लागलें. या नवीन दिशेनें शोध करतां करतां असें आढळून आलें कीं पदार्थाचा विस्तार जितका मोठा तितकें त्यावरचें प्रकाशाचें वजन कमी कमी दृश्यमान होतें. कारण त्या पदार्थाच्या अंगीं गुरुत्वाकर्षणाची शक्ति असते ती प्रकाशाच्या वजनापेक्षां पुष्कळ अधिक असते. त्या प्रचंड शक्तीपुढें प्रकाशाची अल्प शक्ति समजण्यांत येत नाहीं. पृथ्वीची गुरुत्वाकर्षणशक्ति प्रचंड व त्यामानानें प्रकाशाचें वजन अत्यल्प असल्यामुळें प्रकाशाचें वजन हिशोबांत न धरलें तरी त्यामुळें गाणितांत फरक पडत नाहीं. अर्थात् याच्या उलट ह्मणजे पदार्थ जितका लहान तितकें प्रकाशाचें त्यावरचें वजन गुरुत्वाकर्षणशक्ति कमी झाल्यामुळें अधिक दृष्टोत्पत्तीस येतें. मातीच्या कणाचा व्यास इंचाचा एक लक्षांश भाग असेल तर तेथें गुरुत्वाकर्षणशक्ति व प्रकाशाचें वजन हीं समसमान आढळतील, व त्याहून लहान आकाराचा कण घेतला तर गुरुत्वाकर्षणशक्तिपेक्षां प्रकाशाचें वजन अधिक होऊन तें स्पष्टपणें दृग्गोचर होईल. याप्रमाणें प्रकाशाच्या वजनाचें अस्तित्व प्रस्थापित झाल्यावर त्या वजनाच्या कार्याकडे शास्त्रज्ञांची दृष्टि गेली. धूमकेतु आपापल्या कक्षेंत भ्रमण करीत असतां जेव्हां तो सूर्याचे जवळ येतो, तेव्हांच त्याचें पुच्छ दृष्टीस पडतें ही गोष्ट सर्वांना ठाऊकच आहे. तो सूर्यापासून दूर जातो तसतसें त्याचें पुच्छ मंद मंद दिसत नाहींसें होतें. धूमकेतूचें पुच्छ अत्यंत क्षुद्र अशा जड कणांचें असतें. व हे सगळे कण आकारानें किंवा वजनानें सारखे नसतात. अर्थात मोठ्या आकाराच्या कणांवर प्रकाशाचा भार कमी पडतो व लहान असतात त्यावर ज्यास्त पडतो. मोठ्या कणांच्या अंगीं गुरुत्वाकर्षण शक्ति ज्यास्त असते यामुळें प्रकाशाच्या वजनाचा धक्का ते सहन करूं शकतात; लहान कण धक्का बसल्याबरोबर दूर लोटले जातात. यामुळें मोठे कण लहान कणांच्या गतीनें जाऊं शकत नाहींत; ते मागें पडतात. अशा प्रकारें कणांच्या भिन्न भिन्न गतींमुळें त्यांच्या समुदायाला पुच्छाचा आकार आलेला दिसतो. शनीच्या भोंवतीं चारी बाजूंस जीं कडीं दिसतात त्याच्यासंबंधाचें शास्त्रज्ञांचें विवेचन अशाच प्रकारचें आहे. चंद्र ज्या प्रमाणें आपल्या पृथ्वीभोंवतीं फिरतो, त्याप्रमाणें असंख्य सूक्ष्म जडकण कांहीं ठराविक मार्गानें शनीच्या भोंवतीं फिरत असतात. या कणांचे समुदाय त्यांच्या आकारभिन्नत्वामुळें व प्रकाशाच्या धक्कयाच्या कमी अधिक प्रमाणांमुळें कड्यासारखे फिरतांना दिसतात. शनीभोंवतालच्या कड्यांची ही उत्पत्ति वरील विवेचन पूर्णपणें लक्षांत घेतलें असतां उत्तम प्रकारें सुसंगत दिसते. प्रकाशकिरणाच्या वजनाच्या शोधाची मजल या घटकेपर्यंत इतकी आलेली आहे. पण अजून अज्ञात व अगम्य अशा अनेक गोष्टींची उपपत्ति या शोधामुळें लागेल असा शास्त्रज्ञांना भरंवसा वाटत आहे.

## जर्मनीचें नवें कारस्थान.

ज्या ज्या वेळीं जर्मनीच्या हातून अमेरिकेची एखादी आगळीक घडते त्या त्या वेळीं तुह्मी ग्रेटब्रिटनला दारूगोळा वगैरे युद्धोपयोगी सामान पुरवून तटस्थपणाला बाध आणितां अशी जर्मनी कुरकुर करीत असतो. पण अमेरिकेला असा खडखडीत जबाब देण्याचें धैर्य होत नाहीं कीं होय. आह्मी त्यांना पुरवीत असतों. तुह्मांला हवें असेल तर तुह्मी आमचे गिऱ्हाईक व्हा. तुह्माला नाहीं कोणीं ह्मटलें आहे ? जर्मनी अमेरिकेजवळून दारूगोळा घेत नाहीं यांतलें बिंग उघडे आहे. दारूगोळा अमेरिकेहून युरोपांत न्यावयाचा कसा ? वाटेंत ब्रिटिशआरमार तो फुंकून टाकील त्याची वाट काय ? ग्रेट ब्रिटनला दारूगोळा अमेरिकेहून नेतां येतो, आणि आपणांस नेतां येत नाहीं, हें जर्मनीच्या पोटांत दुखत आहे. पण जर्मन मुत्सद्दी मोठे कावेबाज ! त्यांनीं स्वतः दूर राहून इसापनीतींतल्या माकडाच्या गोष्टी प्रमाणें आस्ट्रियाला पुढें करून अमेरिकेंतल्या दारूगोळ्याचे कारखाने बंद पाडण्याचें कारस्थान सुरू केलें. आस्ट्रियाचा अमेरिकेंतील वकील डा. डंबा याला त्यांनीं हातांशीं धरून त्याच्या मार्फत अमेरिकन कारखान्यांतल्या मजुरांना चिथावून त्यांच्याकडून संप करविण्याची खटपट चालविली होती. कांहीं अकाल्पित रीतीनें एक गुप्त हेर पकडला जाऊन या कारस्थानाबद्दल लेखी पुरावाही अमेरिकेच्या हातीं लागला. इतकें झालें तरी प्रे. विल्सन हे इतके भिम्या स्वभावाचे—आहेत स्वदेशाभिमानशून्य ह्मणा पाहिजे तर—कीं त्यांनीं याबद्दल जर्मनी व आस्ट्रियां या दोघांची चांगली कानउघाडणी करावयास पाहिजे होती, ती न करतां तुह्मी आपल्या वकिलाला येथून काढून न्या ' येवढेंच आस्ट्रियाला ह्मटलें आणि तें ह्मणतांना सुद्धां अतिशय खेदप्रदर्शक उद्गार काढले आहेत ! ! या एकंदर प्रकारावरून प्रे. विल्सन हे राजकारणांतले साधुपुरुष आहेत असें ह्मणणें भाग पडतें. पण राजकारण आणि साधुत्व यांची सांगड जमणें कठीण आहे, हें अनुभवानें अमेरिकेला कळून येईल.

## रशियाची चळवळ.

तार्तरला पकडणें असा इंग्रजीभाषेंत एक भाषणसंप्रदाय आहे. त्याचा अर्थ आपण आपल्या प्रबळ शत्रूला चीत केलें असा मनाचा खोटा ग्रह करून घेणें असा आहे. कारण, वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट असते. तार्तरानेंच त्या माणसाला पकडलेलें असतें. सध्या रशियांत जर्मनीनें जो प्रकार चालविला आहे त्यावरून आपण रशियाला चीत केलें अशी फुशारकी जर्मनीनें मारणें हें तार्तारला पकडण्यासारखेंच आहे. खरा प्रकार असा आहे कीं रशियांत जिकडेपाहावें तिकडे सध्या रशियाचीच विजयपताका फडकत आहे. पूर्व ग्यालिशियामध्यें स्ट्रिपा नदीचे कांठीं जर्मनीला हार खावी लागली व ७००० जर्मन कैद झाले. तेथून द्वीनानदीपर्यंत राशिया प्रत्येक ठिकाणीं जर्मनीला चोप देत आहे. रीगाच्या आखातांतली परिस्थिति कायमच आहे. तेथें जर्मनी मंत्रानें स्तंभित झालेल्या नागासारखा जागचे जागीं फूं फूं करीत बसला आहे, पण त्याचें कांहीं चालत नाहीं. ग्राडनोजवळ आज कित्येक दिवस घनघोर युद्ध चाललें आहे, आणि आह्मी ग्राडनो घेतलें अशा खोट्या बातम्या जर्मनीनें कित्येकवेळा उठविल्या तरी असत्या भुलथापांना वारंवार सांगण्यानें सुद्धां सत्यस्वरूप आलेलें नाहीं.

## ब्रिटिश आरमाराची श्रेष्ठता

प्रस्तुतच्या युद्धांत जर एखादी गोष्ट अगदीं निर्विवादपणें स्थापित झाली असेल तर ती ब्रिटिश आरमाराची अजिंक्यता ही होय. ब्रिटिश आरमार आपली कामगिरी किती स्तब्धतेनें आणि उत्कृष्टप्रकारें करीत आहे याचें एकच प्रमाण ह्मणजे गेल्या तेरा माहिन्यांत जगाच्या निरनिराळ्या भागांतून ब्रिटिश सैन्य लढाईवर गेलेलें आहे, पण हें येवढें प्रचंड सैन्य नेणाऱ्या एका ही जहाजाला धोका पोंचावेण्याची, फार तर काय, पण हिंदुस्थानास दर आठवड्यास येणाऱ्या विलायतच्या मेल बोटीला अडविण्याची जर्मनीची छाती झाली नाहीं, हें देतां येईल. ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या व कांहीं लढाऊ बोटी ही जर्मन पानबुड्या बोटींनीं आतांपर्यंत बुडविल्या आहेत खऱ्या, पण त्यांची संख्या ब्रिटिश आरमाराच्या भव्यतेपुढें इतकी क्षुद्र आहे कीं ती हिशोबांत धरण्याइतक्या महत्वाची नाहीं. रीगाच्या आखातांत जर्मन आरमार स्तंभित होऊन पडलें आहे त्याचें श्रेय ही ब्रिटिश आरमारालाच दिलें पाहिजे. दार्दानेल्सकडे ही ब्रिटिश आरमाराचाच विजय आहे. सारांश, ब्रिटिश राष्ट्राची समुद्रावरची सत्ता उलथून पाडण्याचा जर्मनीचा यत्न ब्रिटिश आरमाराच्या प्रभावानें थंड पडला आहे ही गोष्ट कोणाला ही नाकबूल करतां यावयाची नाहीं.

## 'देवा! असले मित्र देऊं नकोस!'

परलोकवासी ना. प्रो. गोखले यांच्या आसन्नमरण स्थितींत कांग्रेसच्या समेटाच्या वादाच्या वेळीं रा. टिळक यांच्या विरुद्ध साक्ष दिल्यामुळें जहालपक्षांत आपली नाहशी झालेली पत परत मिळविण्याच्या यत्नाला माजी प्रो. विजापूरकर हे लागलेले दिसतात. ' नवयुगा ' च्या आगष्टच्या अंकांत त्यांनीं रा. टिळकांच्या गीतारहस्याचें परीक्षण करण्याचे निमित्तानें रा. टिळक यांची इतकी ओतप्रोत स्तुति केली आहे कीं तिच्या भरांत ते परीक्षणाचें हातीं घेतलेलें काम अजीबात विसरून गेले; इतकेंच नाहीं, तर आपण कोणाविषयीं काय लिहीत आहों याचेंही भान यांना राहिलें नसावें असें दिसतें. रा. टिळक आणि राजकीय बाबतींतले नेमस्त विचार यांचें उत्तर दक्षिण ध्रुवाइतकें सख्य आहे ही गोष्ट साऱ्या जगाला विश्रुत असतां आणि खुद्द रा. टिळकांच्या ' केसरी 'त नेमस्तपक्षाचा सदोदित उपहास होत आला असतां प्रो. विजापूरकर हे रा. टिळकांना ' परोपरीनें राजकीय विचारांवर आपल्या लोकांस यथायोग्य नेमस्त विचारांचें वळण लावणारा ' अशी संज्ञा देऊन त्यांचा गौरव करतात !! रा. टिळक यांना हा खरोखरच गौरव वाटतो कीं ' देवा ! असले मित्र मला देऊं नकोस ' अशी ते परमेश्वराजवळ प्रार्थना करतात, हें कळण्याला एखादा मार्ग असता तर बरें झालें असतें.

## उपासनांचा सुकाळ.

या नांवाखालीं आमच्या पत्रांत छापण्यासाठीं एका गृहस्थाकडून लेख आलेला आहे. धर्मविषयक निरर्थक वादांना स्थळ देऊन व्यर्थ दुही माजविणें आह्मांस पसंत नसल्यामुळें सदर लेख चांगला लिहिलेला आहे, तरी त्यास आमच्यानें स्थळ देववत नाहीं. पण त्या लेखांतला एक विचार करण्यासारखा मुद्दा आहे तेवढा संकलित रूपानें आह्मी वाचकांपुढें ठेवतों. सदर लेखक ह्मणतो— ता. १२ सप्तेंबरच्या सुबोधपत्रिकेंत प्रार्थना समाजाचें पाऊल पुढें पुढें पडत असल्याबद्दल मुंबईच्या प्रार्थना समाजाच्या वार्षिक बैठकींत न्या. मू. चंदावरकर हे सांगतात, आणि ही बातमी ज्या अंकांत प्रसिद्ध होते त्याच अंकांत दुसरीकडे अलीकडे समाजाच्या मंडळींत उपासनेविषयीं पूर्वींसारखा उत्साह राहिलेला नाहीं, प्रार्थनेला कोणी बसत नाहीं, कौटुंबिक उपासना बंद कराव्या लागल्या, वगैरे वगैरे तक्रारी ही येतात. यांचा मेळ कसा घालावयाचा? या तक्रारी तथ्यपूर्ण आहेत यांत शंका नाहीं. वस्तुस्थिति तशी आहे खरी; पण यांत दोष कोणाचा? व्यक्तिविषयक उपासना, कौटुंबिक उपासना, साप्ताहिक उपासना, वगैरे उपासनांचा सुकाळ करून ही शेवटीं अशी स्थिति समाजाला कां यावी याचा विचार करावयास नको काय? उपासनांची नुसती संख्या वाढविल्यानें धर्म जागृति होईल काय? ती होण्यास धर्मोपदेशकांचे ठायीं जें चारित्र्यबल पाहिजे. आणि त्याचीच तर समाजांत वाण आहे. तोंडानें भातृप्रेमाच्या गोष्टी सांगून उपासनेच्या वेळीं अश्रु गाळणारे एरव्हींच्या व्यवहारांत अगदीं भिन्न प्रकारचे आढळतात, अशी जोंवर स्थिति आहे तोंवर अशा उपासनेला बसण्याची बुद्धि तरुणांना झाली नाहीं, तर त्यांत दोष कोणाचा ? आणि अशा समाजानें पुराणांतलीं बांगीं पुराणांत ह्मणणाऱ्या जुन्या समाजाला तरी नांवें कां ठेवावीं ?

## राणीवर्गांत जागृति.

हिंदुस्थानची खरी उन्नति व्हावयाची असेल तर ती हिंदी समाजाच्या अर्धांगाला स्त्रीसमाजाला—जी विकलता आलेली आहे ती दूर होऊन त्या समाजांत खरी जागृति उत्पन्न झाल्याशिवाय कधीं होणार नाहीं असें वारंवार सांगण्यांत येतें व ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. आणि ही जागृति उत्पन्न करण्याचें मुख्य साधन ह्मणजे स्त्री शिक्षणाचा प्रसार हें आहे. आजपर्यंत या कार्याचा सगळा भार पुरुषांवरच पडलेला होता, पण आतां तो उचलण्यास सुशिक्षित स्त्री वर्ग पुढें येऊं लागला आहे

ही आनंदाची गोष्ट. पुण्याचें सेवासदन या बाबतींत प्रशंसनीय कामगिरी बजावीत आहे. पण शिक्षणप्रसाराचें काम इतकें अवजड खर्चाचें आहे कीं त्या कामीं मध्यम स्थितींतल्या माणसांची असमर्थता वारंवार अडचणी आणीत असते. या अडचणी दूर करण्याचें सामर्थ्य जर आज कोणांत असेल तर अंगावर लाखो रुपयांचे जडजवाहिर वागविण्यांत भूषण मानणाऱ्या राणीवर्गाचेच ठायीं आढळेल. त्यांच्यांत जर जागृति होईल, व रत्नजडित अलंकार हीं खरीं भूषणें किंवा खरें सौभाग्य नव्हे, तर ईश्वरानें आपणास दिलेल्या अनुकूळतेचा यत्किंचित् अंश आपल्या भागिनीवर्गाची स्थिति सुधारण्याकडे लावणें हेंच खरें भूषण व हेंच खरें सौभाग्य अशी त्यांची पक्की समजूत होऊन त्या दानप्रवीण होतील तर या भारतभूमीचा भाग्योदय काळ समीप येईल हें खास आहे. सुदैवानें भोपालच्या बेगम साहेब यांनीं या बाबतींत पहिलें उदाहरण घालून दिलें. नंतर इंदूरच्या थोरल्या महाराणीसाहेबांनीं अहिल्याश्रम व विद्यालय काढून अहिल्यादेवीचें चिरस्मारक करून ठेविलें, आणि आतां बडोद्याच्या महाराणीसाहेबांनीं ही आपल्या स्त्रीधनांतून दीड लाख रुपया काढून त्यांतून विद्यार्थिणींना स्कॉलरशिपा देण्याची व्यवस्था केली असल्याची सुवार्ता आली आहे. राणी वर्गांत ही होत असलेली कर्तव्य जागृति सर्वथा अभिनंदनीय आहे असें कोण ह्मणणार नाहीं. पती बरोबर परदेशी प्रवास करून आह्मी अमुक अमुक गोष्टी पाहिल्या येवढें सांगण्यांतच फुशारकी मारणाऱ्या ताईसाहेब, माईसाहेब, आकासाहेब वगैरे मंडळी वरील उदाहरणें पाहून आपल्या अंगावरच्या मोत्यांच्या कंठ्याचा ऐवज स्कालरशिपांसाठीं ट्रस्टींच्या हवालीं करण्यास पुढें येतील तो सुदिन ह्मटला पाहिजे.

# युद्धवृत्त.

गेल्या आठवड्यांत पश्चिमेकडील रणभूमीवरची विशेष कांहीं खबर आली नाहीं. मधून मधून जर्मन विमानें इंग्लंडकडे जात असतात, आणि एखाददुसरा बांब टाकून किंवा तो टाकण्यापूर्वीं भिऊन चोरट्यासारखीं जीव घेऊन परत फिरतात. पण पूर्वेकडील रणभूमीवर मात्र घटकोघटकीं धामधूम चाललेली आहे. रशियांत उत्तरेस पेट्रोग्राडच्या बाजूला जनरल व्हॉन हिंडेनबर्ग व दक्षिणेस ग्यालिशियाच्या सरहद्दीवर जनरल म्याकेनसेन असे दोघे जर्मन सेनापति पुढें पाऊल टाकण्यासाठीं शिकस्तीचे प्रयत्न करून राहिले आहेत. पण कांहीं इलाज चालत नाहीं. जनरल व्हॉन हिंडेनबर्ग यांची आतां सगळी भिस्त तोफखान्यावर आहे व ते तोफखाना मजबूत करण्याच्या खटपटींत आहेत. दक्षिणेस ग्यालिशियाकडे रशियाला आस्ट्रिया व जर्मनी या दोन्ही फौजांशीं भिडावें लागत आहे. तरी एकटा रशिया त्या दोघांना पुरून उरला आहे. गेल्या आठवड्यांत तिकडे रशियाला दोन ठिकाणीं मोठाले जय प्राप्त झाले. पहिला सेरेट नदीपाशीं व दुसरा टार्नोपोल येथें त्याच्याच जवळ तिसराही एक विजय रशियाला मिळाल्याचें रूटर सांगतो. त्या प्रांतांत रशिया नुसता स्वतःचा बचावच करून राहिला आहे असें नाहीं, तर आस्ट्रिया व जर्मनी यांच्या सैन्यांना मागें हटवीत चालला आहे. दक्षिणेंत आपल्या बाजूची त्रेधा उडालेली पाहून जर्मनीनें उत्तरेकडून कांहीं फौज दक्षिणेकडे पाठविली आहे. आतां यापुढें या नव्या मदतीनें आस्ट्रिया-जर्मनीच्या दुकलीची बाजू अधिक मजबूत होईल, आणि तिकडच्या युद्धाला अधिक रंग चढेल.

---

गेल्या आठवड्यांत दार्दानेल्सकडे अगदीं सामसूम होतें. तुर्क लोक खंदकांत छपून कधीं मधीं तोफांचे आवाज काढीत होते. पण त्यापासून विशेष हानि झाली नाहीं. इटलीच्या सरहद्दीवर ही ह्मणण्यासारखें विशेष कांहीं घडलें नाहीं. आस्ट्रियन लोकांनीं काळोखांत स्लाटेनिकच्या खोऱ्यांत छापा घालण्याचा यत्न केला. पण तो फसला.

---

पोलंडमध्यें जर्मन लोकांनीं शिरतांच प्रथम कांहीं दिवस लोकांची मर्जी संपादण्यासाठीं लोकांना अमुक हक्क देऊं, तमुक देऊं अशीं भरपूर आश्वासनें दिलीं; पण त्यांच्या पाठोपाठ जर्मन अधिकारी तेथें जुलूम करूं लागल्यामुळें जर्मन लष्कर व पोलंडचे शेतकरी दोघेही हातघाईवर आल्याची खबर आली आहे.

## ✓ खटल्याचा निकाल.

लाहोर येथें आज कित्येक माहिने स्पेशल ट्रायब्युनल पुढें चाललेल्या राजद्रोही खटल्याचा निकाल गेल्या आठवड्यांत झाला. एकंदर ६१ आरोपी होते. त्यांतल्या २४ आरोपींना फाशीची, २७ आरोपींना जन्मठेप काळ्यापाण्याची आणि ६ जणांना कमी अधिक मुदतीच्या कैदेची अशा ५७ आरोपींना शिक्षा सांगण्यांत आल्या. फाशीची शिक्षा झालेल्यांत लाहोर येथील दयानंद आंग्लो वेदिक कॉलेजाचे माजी इतिहासाध्यापक प्रोफेसर परमानंद हे एक आहेत. खटल्याच्या निकालाची साग्र हकीकत— विशेषतः इतक्या कडक शिक्षा देण्याचीं कारणें— अद्याप आमचे वाचण्यांत आली नाहीं, तों पर्यंत या निकालासंबंधानें बरीवाईट कोणत्याच प्रकारची टीका करणें आह्मांस योग्य दिसत नाहीं.

## स्वराज्य.

(चालू लढाईचें पारितोषक)

यंदाच्या राष्ट्रीय सभेपुढें इंडियाला स्वराज्य ब्रिटिश साम्राज्याखालीं कायमचें मिळावें ह्मणून सरकारपाशीं मागणी करण्याचा संकल्प कित्येक मुत्सद्दी मंडळीचा निश्चिय झालेला आहे. सर सत्येंद्रसिंह यांच्या अध्यक्षतेखालीं या विषयाची संपूर्ण उभारणी करण्यांत यावी असा कित्येक राष्ट्रभक्तांचा पूर्ण निश्चत झालेला आहे आणि हें ध्येय इंडियाचे वृद्ध पितामह श्रीमंत दादाभाई नवरोजी यांनीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षाच्या उच्चस्थानावरून सर्व राष्ट्रास नऊ वर्षांपूर्वींच जाहीर केलेलें आहे. त्यानंतरची झालेली सर्व क्रांती या ध्येयाला उलथून पाडते कीं काय असा भ्रम झाला होता; पण इंडियन राष्ट्राची दानत राजमान्य आहे, ब्रिटिश साम्राज्याला तिचा आधारस्तंभ आहे आणि चालू महायुद्धांत इंडियानें उत्कट राजभक्ती व्यक्त केली आहे. तेव्हां इतक्या कसोटीला लागल्या नंतर आपल्या राष्ट्राच्या स्वराज्या विषयींच्या ध्येयाच्या शिखरापर्यंत चढण्याच्या पायऱ्या अधिक अधिक आक्रमण्याला सर्वच राष्ट्राला नवा जोम आलेला आहे. ही नवी शक्ती लक्षांत घेऊनच विदुषी **बिझांटबाई** स्वराज्याचें ध्येय यंदाच्या काँग्रेस पुढें आणण्यासाठीं मद्रास, मुंबई, बंगाल, वायव्यप्रांत इत्यादि भागांतील काँग्रेसच्या पुढाऱ्यांचें एकमत करण्यासाठीं नेटानें झटत आहेत. प्रस्तुतच्या लढाईच्या कसोटीला इंडियन राष्ट्र बावनकशी सोन्याप्रमाणें उत्तम ठरले ही गोष्ट लार्डहार्डिंज सारखे उदारधी व्हॉइसरायपासून सर्वजण कबूल करीत आहेत. तेव्हां इतक्या शतकांच्या ब्रिटिश राज्याच्या अमलाखालीं वाढलेल्या या राष्ट्र वृक्षाला अमृतफळें येण्याचा हा उत्तम सुयोग आला आहे. तेव्हां लोकांच्या तर्फेची सरकारापाशीं ही स्वराज्याची मागणी राजकृपेनें परिपूर्ण होईल असा नवा उमेदीचा काळ प्राप्त झाला आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय. काँग्रेसमध्यें कांहीं मवाळ अशा विचाराचे आहेत कीं त्यांना या लढाईच्या प्रसंगीं स्वराज्य हा शब्द उच्चारणें देखील मोठ्या अविचाराचे वाटते; पण त्यांनीं इतिहासाकडे नजर फेकावी ह्मणजे लोकांच्या हक्काची प्रगती बाह्यतः दिसणाऱ्या राष्ट्राच्या संकटकालींच होत असते. किंबहुना या राष्ट्रीय संकटावरील वेला ह्मणजे अदूरवर्ती उत्कर्ष वेलाच होत. सर सत्येंद्रसिंह यांनीं मुंबईस हा स्वराज्याचा ओनामा राज्य कर्त्यांकडून संपादावा ह्मणूनच त्यांस मुद्दाम या वर्षीं सर्व राष्ट्राचे अध्यक्ष नेमून त्यांच्या विजय बाहुच्या खालीं सर्व राष्ट्र जमणार आहे. ईश्वर करो आणि ब्रिटिश साम्राज्याच्या या सोन्याच्या दिवशीं इंडियाच्या स्वराज्याचा चिरस्थायी पाया बसविण्यांत येवो.

---

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**— आकाश स्वच्छ, हवा उत्तम, सूर्यप्रकाश तीव्र व तेजस्वी इत्यादि कारणांमुळें सार्वजनिक आरोग्य चांगलें असावयाला पाहिजे, पण तें तसें नाहीं. पिकें साधारण चांगलीं आहेत.

**प्लेगः**— गेल्या शनवार पासून चे प्लेगाचे मृत्यू अनुक्रमें १९, ११, १०, १७, ७, व २३ असे आहेत. व त्या शिवाय दररोज ३, ४ मृत्यु नेहमींच्या मृत्यूच्या प्रमाणाप्रमाणें होत असतात. प्लेगाच्या देवी टोंचणें हा रामबाण उपाय समजून कित्येक लोक स्थानत्याग करीत नाहींत. ही त्यांची चूक आहे, असा अलीकडील कांहीं मृत्यूंच्या उदाहरणावरून अनुभव येतो. तेव्हां या गोष्टीकडे लोकांनीं अवश्य लक्ष पुरविण्याची मेहेरबानी करावी.

गेल्या ९ व्या तारखेला सर बेंजामिन राबर्टसन व त्यांच्या पत्नी या उभयतांनीं यवतमाळ येथें ३ सार्वजनिक संस्था खुल्या करण्याला आपला यशस्वी हात लावला ही गोष्ट त्यांच्या लोककल्याणाच्या कार्याची चांगली साक्ष देते. सुमारें अर्धा लक्ष रुपये खर्च करून बांधलेला स्त्रियांचा दवाखाना त्यांनीं चालू केला आणि लोकांच्या सार्वजनिक कार्याबद्दलची मोठी तारीफ केली. ह्या कार्यांत नामदार स्टॉडन कमिशनर साहेब यांनीं जी मोठी कळकळ दर्शविली तिची आठवण ह्मणून त्यांचा मोठा आकाराचा फोटो दवाखान्याच्या दिवाणखान्यांत टांगण्यांत आला. याच प्रसंगीं **अंजुमन इस्लामची** नवी लायब्ररी ही उघडण्याचा समारंभ यांच्याच हातून झाला. तसेंच यवतमाळच्या स्त्रियांनीं **महिला समाजाची** नवी इमारत **लेडी राबर्टसन** यांच्या हातून उघडून घेतली. आणि त्या योगानें महिला समाजाची राजमान्यताही वाढली हें तेथील पुढारी स्त्रियांना विशेष भूषणास्पद होय. आह्मी यवतमाळकरांनीं हा जो उत्तम योग साधला व स्त्रीपुरुषांची सामाजिक बंधनें श्रेयस्कर रीतीनें अधिक खुलीं करून युरोपियन व इंडियन यांचा अधिक सलोखा केला हें फार चांगलें होय.

---

## नोटीस

नोटिस बेशमी मारुती वा लक्ष्मण मालूस पटांक राहणार मौजे जामखूणनावजी प्रगणे व तालुके वाशिम जिल्हा आकोला.

यांस—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यात येते कीं, मौजे जामरून नावजी येथील आमचे शेतचे आमचे माघारीं कबुलायत तुह्मी लिहून नोंदली. ती पाहतां कबलायत नसून अव्यवस्थीत बटाईपत्र आहे. हे आपणांस आह्मी अनेकवेळां कळविले होते. त्यावर आपण कबुलायत रुपये ३०० तिनशाची करून देऊन नोंदुन देतों. नाहींतर तावडतोब शेताचा कबजा सोडून देतो असे आह्माजवळ कबूल करून निघन गेला. व शेतें आमचे परवानगी शिवाय तुह्मी वहीत केलीं आहेत. त्यासही बरेच दिवस झाले. यावरून आह्मांला वाटते कीं, आपण निवळ अपाथाची करून आह्मांस बुडवूं पाहतां तरी या नोटिशीने कळवितों कीं, ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी तिनशें रुपये स्वामित्वाची आह्मास कबुलायत करून द्यावी. नसता शेताचा ताबा सोडून देऊन ३०० रुपये आणून देऊन आमची पावती घ्यावी. या प्रमाणें आपण करण्यास चुकल्यास रितीप्रमाणें तजवीज करून या नोटिशीच्या खर्चासह वरील स्वामित्वाचे रुपये व शेताचा ताबा आपल्या जवळून घेण्यांत येईल. क.

ता० ९-९-१९१५

सही

सखाराम भिकंभट सराफ र. वाशिम

द० खु०

नो० नं० ३६४

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## जाहीरखबर.

नथू वा॥ पांडू कुणबी रा० दहीगांव प्रगणे वडनेर ता० मलकापूर व इतर सर्व तमाम लोकांसः—

खाली सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं नथू हा माझा मुलगा असून माझे जवळच राहतो. तो अज्ञान आहे व अलीकडे वाईट लोकांच्या संगतीनें बिघडला आहे असें मला वाटतें. त्या लोकांची संगत सोडण्याबद्दल पुष्कळवेळा त्यास सांगितले परंतु ऐकत नाहीं. तरी या नोटिशीनें सर्व लोकांस व नथू यासही कळविण्यांत येते कीं वाईट लोकांची संगत सोडून द्यावी व कोणाचें कर्ज वगैरे काढू नये. कोणास गहाण, खरेदी अगर रोखा वगैरे करून देऊं नये. केल्यास नथू हा अज्ञान असल्यानें सर्व व्यवहार बेकायदा होतील. ही जाहीर नोटीस दिली ता० १९–९–१९१९ इसवी.

सही.

बजी मर्द पांडू कुणबी रा. दहिगांव नि॥ आंगठा दस्तुर हणवंतराव गणपतराव देशमुख खुद.

नो० नं० ३६०

## नोटीस

सुरजमल रामेश्वर मारवाडी दुकान केळीवेळी ता. आकोट.

यांस —

खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यात येते कीं, मौजे केळीवेळी ता० आकोट येथील तुमचे मालकीची महादेव मारवाडी ब्राह्मणावाली खुली जागा ता. ९-९-१९ रोजीं रकम रुपये ७०० स खरेदी घेण्याचे ठरले. व इसाराबद्दल २९ रुपये तुह्मास दिले आहेत. व आठ चार दिवसांत तुह्मी खरेदीखत लिहून द्यावे. व त्यास लागणारा खर्च आह्मी लावावा. व भरण्यापैकीं बाकी राहीलेले रुपये ६७१ तुह्मास विद्यमान सबरजिस्ट्रार समोर द्यावे. या प्रमाणें तुमचे आमचे दरम्यान ठरलेले आहे. मी तुह्मास खरेदीखत करून देणें बद्दल ह्मटलें असतां तुह्मी करून देत नाहीं. या करितां या नोटिशीनें तुह्मास कळवितो कीं, ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत खरेदीखत करून द्यावे. व ताबा द्यावा व मी तुह्मास सबरजिस्ट्रार समोर ६७१ रुपये देण्यास तयार आहे. तसें न केल्यास दिवाणी कोर्ट मार्फत खरेदीचा व्यवहार पुरा करून घेतला जाईल. व त्याबद्दलचा खर्च तुह्मांस सोसावा लागेल. कळावें.

सही

पंढरी वा गोविंदा आडे अज्ञान पालन करणार आई तुळसाबाई मर्द गोविंदा आडे निशानी बांगडी

नो० नं० ३६१

## नोटीस

रा० रा० तनसुखराय घनश्यामदास मारवाडी रा० पो० दानापूर ता० आकोट.

यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्माला प्रॉमेसरी नोट जेष्ट शु० ४ सन १९१४ इसवी रोजीं भरणा रोखनगदी घेऊन लिहून दिली. तिचे व्याजा सगट रुपये १२९० साडेबारांशें निघत आहे. ते रुपये आजपासून आठ दिवसाचे आंत द्यावे. न दिल्यास तुमचेवर कोर्टमार्फत दावा करून रुपये वसूल केले जातील कोर्टाचा खर्च व या नोटीशीचा खर्च तुमचे पासून घेतला जाईल कळावें ता० १६-९-१९१९. इ०

सही.

रामप्रताप नथमल मालक नथमल रामप्रताप दस्तूर मुकदेव गणेशदास द० खु. रा० दानापूर.

नो० नं० ३६२

## जाहिर नोटीस

सर्वत्र साहु सावकार व इतर लोक

यांसः—

खाली सही करणार या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नामें गणपती वा मारुती मसने रा० कासारखेड ( बाळापूर ) उमरवर्षे २० हा कुसंगतीनें बिघडला असून विनाकारण लोकांच कर्ज वगैरे काढून पैसा उधळीत आहे. असे कानोकानी कळल्यावरून सर्वांस कळवितो कीं माझी स्थावर जंगम जिनगी मी मिळविलेली आहे यामुळें तीवर अगर माझे नांवावर माझे मुलास ( गणपतीस ) कोणी कर्ज देऊं नये. दिल्यास त्याबद्दल जबाबदारी मजवर अगर माझे जिनगीवर नाहीं. मुलास कर्ज देऊन माझी जिनगी कोणी लिहून घेतल्यास घेणारा फसेल. तसेच वरील गणपती यांस ही कळविण्यांत येते कीं त्वां लोकांचें कर्ज काढूं नये. काढल्यास त्याबद्दल माझी जिनगी अगर मी जबाबदार होणार नाहीं. माझा वृद्धापकाळ झाला आहे व तूं असा बेफाम होऊन वाटेल तशीं कामें व माझा अपमान करतोस हें बरोबर नाहीं. कळावें तारीख १७ माहे सप्टेंबर १९१९ इ.

सही

सहीची निशानी आंगठा मारुती वल्लद राघोजी मसने (माळी) रा. कासारखेड (बाळापूर) याचा खुद असे

नो. नं. ३६३

पुरवणी—वऱ्हाडसमाचार ता० २० सप्टेंबर १९१५

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना.

**ए. जे. ह्मात्रे आणि सन सुगंधी.**

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर मुळेश्वर -- मुंबई.

एकच भाव! ओटो सुरंगी ! एकच भाव! !

**आमचेकडे मिळणारा माल**

**ओटो सुरंगी**

अत्तरें.– गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. ही अत्तर दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाची मिळतील दर बाटली ४ आणे.

**अष्टगंधी अरगजा** १ तोळ्यास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत अरगजा व कितना निरनिराळ्या सुवासाचा दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुर्टे व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

**Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.**

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.

**FUNDS almost 5 CRORES.**

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* 4½ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,898 |
| 1914 | 72,46,0 | 4.96 86,509 |

### BONUS

The bonus for the premium ending 31 December 1912, constitntes su record for the company. The next Division of profits will be made at 31 December of the current year when all With Profit Policies effected prior to that date will participate—

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after proviaing for the Reserve Fund,
divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

:0

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

Influential and energetic Agents wanted–Terms libera

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 25

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख २७ माहे सप्टेंबर सन १९१५ ई० [ अंक ३८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } S. Clements,
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. नं २

### अस्सल अंगुरी.

# हींग

केवळ एक आणा तो. पवित्र केसर ॥।≈ ता. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. तिबेती ममीरा रु. ३ तो.

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**
नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 5 Dadar Bombay.

# चांदीचींभांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० १ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस.

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १० रु आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो. नं० ३

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः—** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, } मॅनेजर
सदाशिवाश्रम, आकोलें }

### श्री दत्तात्रय अलंकारालय
### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीफुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तांटें, वाट्या, गडवे, वगैरे माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर बाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो. नं १९३

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचेचित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ति १ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशीं ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेकरी, लंगोटे, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुचाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरण शास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, मारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वैगरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेववें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हारिश्चंद्राबिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ३६४

## हिंदुस्थान सरकाराकडून काढण्यांत येणारें मुदतबंद कर्ज.

पोष्ट आफिसा मार्फत कर्ज द्यावयाचें असल्यास तें कोणत्या अटीवर देतां येतें या संबंधीं नोटीस.

या सालीं सरकार निराळ्या स्वरूपाचें कर्ज काढीत आहे, व त्यावर शेंकडा ४ टक्के व्याज देण्यांत येईल. ह्या कर्जाची पूर्ण फेड फार उशिरां ह्मणजे सन १९२३ चे नोव्हेंबर महिन्यांत करण्यांत येईल. परंतु सन १९२० चे आक्टोबर महिन्या नंतर केव्हांही तें फेडून टाकण्याचा हक्क सरकारनें आपले स्वाधीन ठेविला आहे.

२ कलकत्ता, मद्रास, मुंबई व इतर मोठमोठीं शहरें येथून अर्ज येऊन मामुली पद्धती प्रमाणें ४॥ कोटींचें कर्ज आधींच जमा झालें आहे; आणि ह्या रकमेपुरतें तरी कर्ज घेणें आतां बंद करण्यांत आलें आहे. परंतु लहान रकमांनीं कर्ज देण्याची ज्यांची इच्छा असेल मग ते सेव्हिंग्स बँकांमध्यें ठेवी ठेवणारे असोत वा नसोत, अशा इसमांना सेव्हिंग्स बँकेचें कामकरणाऱ्या अगदीं नजीकच्या पोष्ट आफिसाचे मार्फत कर्ज देण्यासाठीं आणखी एक खास संधी देण्यांत येत आहे.

### कर्ज कसें द्यावें.

३ ता० ३० आक्टोबर पर्यंत केव्हांही पोस्ट आफिसाचे मार्फत अर्ज पाठवितां येतील.

४ अर्ज द्यावयाचे ते १०० रुपयांहून कमी नाहीं व शंभरांनीं बरोबर भाग तुटेल इतक्या रकमेसाठीं द्यावा. व कोणाही एकाच अर्जदारास ५००० हून जास्त रकमेकरितां केव्हांही अर्ज करितां येणार नाहीं.

**टीप**:— शेंकडा ३॥ टक्के व्याजाच्या कर्जाच्या प्रॉमिसरी नोटा जरी यापूर्वींच कोणी पोस्ट आफिसामार्फत विकत घेतलेल्या असल्या तरी त्याला ह्या नवीन कर्जापैकीं ५००० रुपयांपर्यंत कर्ज देण्यासाठीं अर्ज करितां येतो.

५ ज्याला अर्ज करण्याची इच्छा असेल त्यानें पुढें दिलेला अर्जाचा नमुना भरावा. सेव्हिंग्स बँकचें काम करणाऱ्या कोणच्याही पोस्ट आफिसांत हा नमुना मिळेल. पण अर्जाबरोबरच जितकें कर्ज देण्यासाठीं तो अर्ज असेल तितकी रक्कम अर्जदारानें भरली पाहिजे. अर्जदाराची जर सेव्हिंग्स बँकमध्यें ठेव असली तर त्या ठेवीचा ही या कामाकरितां त्यास उपयोग करितां येईल, किंवा स्वतंत्र रोख रक्कम देतां येईल अर्जदारानें पोस्ट आफिसांत स्वतः जावें किंवा दुसऱ्या कोणास पाठवावें. दिलेल्या प्रत्येक रकमेबद्दल पावती देण्यांत येईल.

६ अर्जदार जितकी रकम देईल त्या सर्व रकमेइतक्या त्याला शंभर शंभर रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा देण्यांत येतील.

### प्रॉमिसरी नोटा कोणी ठेवाव्यात.

७ ह्या नोटा अर्जदारानें आपल्या स्वतः पाशींच ठेवाव्यात. अगर मर्जीस वाटल्यास आपल्यातर्फें त्या पोस्टाचे अधिकाऱ्यांजवळच राहूं द्याव्यात. कोणची पद्धति आपणास पसंत आहे. हें अर्जाचा नमुना भरतांना त्यानें नमूद करावें. नोटा आपल्या जवळच ठेवण्याची त्याची इच्छा असली तर त्या त्याचे हवालीं करण्याकरितां तयार होऊन आल्या ह्मणजे पोस्ट आफिस त्याला तसें कळवील. आणि तो त्या घेण्याकरितां स्वतः हजर झाला ह्मणजे त्या त्यास देण्यांत येतील. त्या नोटा पोस्ट आफिसांतच राहू देण्याचें त्यानें ठरविलें तर त्याला पुन्हां पोस्ट आफिसांत जाण्याचें कारण नाहीं त्यानोटा आपणाकडे आल्या आहेत, व अर्जदाराकरितां त्या ठेवण्यांत आल्या आहेत, असें पोस्ट आफिस अर्जदाराला योग्यवेळीं कळवील. पुढें कधीं जर ह्या नोटा आपले पाशींच ठेवाव्या अशी त्याची इच्छा झाली तर पोस्टाचे अधिकारी त्या त्याचे स्वाधीन करितील.

### व्याजाची अदाई.

८ शेंकडा ४ टक्यांप्रमाणें व्याज वर्षांतून दोन वेळां ह्मणजे शेंकडा २ टक्के मे महिन्याचे ३१ वे तारखेस व २ टक्के नोव्हेंबरचे ३० वे तारखेस दरसाल देण्यांत येईल. कर्ज दिल्याचे तारखेपासून तों येत्या नोव्हेंबरचे ३० वे तारखे पर्यंतच्या तुटक मुदतीसाठीं जें व्याज होईल तें, अर्जदार नोटा आपल्यापाशींच ठेवील तर, त्या नोटा त्याचे स्वाधीन करण्याचे वेळीं त्यास रोख देण्यांत येईल, व त्यानें पोस्टाचेअधिकाऱ्यांचे ताब्यांतच त्या ठेविल्या तर पुढील परिग्राफमध्यें निर्दिष्ट केलेलें जें त्याचें खातें ठेवण्यांत येतें, त्या खातीं त्याचें नांवानें तें जमा करण्यांत येईल.

९ आपल्या प्रॉमिसरी नोटा पोष्टाचे अधिकाऱ्यांचेच ताब्यांत ठेवाव्या, असें अर्जदारानें ठरविलें तर अर्जदाराचे नांवानें एक सेव्हिंग्स बँकखातें ह्याप्रीत्यर्थ सुरू करून पोष्टाचे अधिकारी त्या नोटांचें व्याज दर सहा माहीस वेळच्यावेळीं घेऊन तें अर्जदाराचे खातीं जमा करितील. जेव्हां जेव्हां येणें प्रमाणें व्याज घेण्यांत येईल. तेव्हां तेव्हां ती गोष्ट ही पोष्टाचे अधिकारी त्यास वेळोवेळीं कळावतील. हें काम करण्याबद्दल सरकार अर्जदारापासून कांहीं घेणार नाहीं. आणि हें सहामाही व्याजदेतांना त्यावर इन्कमटाक्स ( प्राप्तीवरीलकर ) कापून घेण्यांत येणार नाहीं.

अर्जदारानें प्रॉमिसरी नोटा आपलेपाशींच ठेविल्या तर सहामाही व्याज देण्याचे वेळीं त्यावर नेहमीं प्रमाणें इन्कमटाक्स कापून घेण्यांत येईल.

### प्रॉमिसरी नोटांची विक्री.

१० वर सांगितलेल्या पद्धतीनें पोष्टामार्फत विकत घेतलेल्या नवीन कर्जाच्या प्रॉमिसरी-नोटा ज्याच्या जवळ असतील अशा सेव्हिंग्स बँकेचे ठेविदाराचे मनांत केव्हां ही असें आलें कीं, त्या किंवा त्यापैकीं कांहीं नोटा विकून टाकाव्या. तर त्याचेसाठीं त्या विकून टाकण्याची ही व्यवस्था पोष्ट आफिस करील. व त्या कामासाठीं दलाली अगर फी कांहीं एक घेणार नाहीं. ह्यासंबंधानें तपशिलवार माहिती पाहिजे असल्यास ती पोष्टआफिसांत केव्हां ही मिळेल.

### अर्जाचा नमुना.

मी ____________

या अन्वयें अर्ज करितों कीं ता. २८ जुलई सन १९१५ चे गॅझिट आफ इन्डिया, एक्स्ट्रा ऑर्डिनरी मध्यें जाहीर करण्यांत आलेल्या शेंकडा ४ टक्के व्याजाच्या मुदतबंद कर्जापैकीं ____________ रुपये कर्ज मजपासून घ्यावें.

+ [ बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे ती रक्कम ____________ रुपये मी या अर्जाबरोबर दाखल करीत आहे.

बरोबरीच्या दरानें जितके कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे तितकी रक्कम ह्मणजे ____________ रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून ह्या कामासाठीं मला मिळावी अशी मी विनंति करितों.

बरोबरीच्या दरानें जितकें कर्ज देण्यासाठीं मी अर्ज करीत आहे त्या रकमेच्या अदई करितां मी ____________ रुपये या अर्जाबरोबर दाखल करीत आहे व बाकीची रक्कम ____________ रुपये पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकमध्यें माझे खातीं जमा असलेल्या रकमेंतून मला मिळावी अशी मी विनंति करितों.

माझी अशी विनंती आहे कीं कर्जाचा जो हिस्सा मजपासून घेण्याचें मंजूर होईल त्याबद्दलच्या प्रॉमिसरी नोटा अकौंटंट जनरल, पोस्ट ऑफिस व टेलेग्राफ्स्, यांचे जवळ माझेसाठीं ठेवाव्या आणि त्याबद्दलचें व्याज ठरीव मुदतीनीं माझे नांवें सुरू केलेल्या पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेचें खात्यांत माझे नांवें जमा करावें.

माझे पासून जितकें कर्ज घेण्याचें मंजूर होईल * त्या रकमेच्या खालीं लिहिलेल्या प्रकारच्या प्रॉमिसरी नोटा मला देण्यांत याव्या.]

नांव ____________

पत्ता ____________

तारीख ____________ १९१५

* ( वाटल्यास हा नमुना कापून काढून उपयोगांत आणावा. )

+ [ ] वरील या खुणामधील मजकूरांतील अनवश्यक बाबी खोडून टाकाव्या.

## वऱ्हाडसमाचार

मिति भाद्रपद वद्य ४ शके १८३७

### कृषिकर्माची उन्नति.

सध्या हिंदुस्थानाला सर्वांत अत्यंत महत्वाचा प्रश्न ह्मणजे पोटापाण्याचा प्रश्न आहे. पोटापाण्याला मिळविण्याचे मुख्य मार्ग ह्मणजे शेतकी, उद्योगधंदा किंवा नोकरी पैकीं नोकरी ह्मणजे बोलून चालून दुसऱ्याची गुलामगिरी. तिच्या पायीं माणसाची स्वातंत्र्य हानि होते, इतकेंच नाहीं, तर स्वाभिमान ही गलित होतो. ह्मणून तो मार्ग सर्वांत त्याज्य समजला गेला आहे. मनुष्य अनन्यगतिक होतो, तेव्हांच येवढी प्रचंड हानि सोसण्यास तयार होतो. ज्याला हिंदुस्थानच्या स्थितीचें व्यवहारिक ज्ञान नाहीं, तो असेंच ह्मणेल. पण आज आमच्या देशांत अशी वस्तुस्थिति आहे काय ? येथील खरी स्थिति काय आहे ? जो उठला तो प्रथम नोकरी पाहतो, ती नच मिळाली तर दुकानदारी, व ती करण्यास लागणारें द्रव्याचें व बुद्धीचें भांडवल नसलें तर अखेर शेती करण्यास प्रवृत्त होतो, असाच प्रकार बहुधा आढळतो. या व्युत्क्रम स्थितीमुळें आमच्या देशांत उद्योगधंदे, व शेतकी हे दोन्ही वस्तुतः उत्तम प्रकारचे धंदे अधोगतीला पोचले आहेत. पण पाश्चात्य देशांत व अमेरिकेंत याच्या उलट स्थिति आहे. इंग्लंडसारख्या देशांत शेतकीला अनुकूळ अशी नैसर्गिक जमिनीची स्थिति नाहीं ह्मणून शिकलेले लोक तिकडे प्रथम व्यापार, वगैरे उद्योगधंदा पाहतात, तो न मिळाला तर शेतकी करतात, व अनन्यगतिक असतील तेवढेच नोकरींत शिरतात. अमेरिकेंत शेतीला श्रेष्ठ मान आहे. त्याच्या खालोखाल उद्योगधंदे व अखेरचें पद नोकरीला मिळतें. देशांतील बुद्धिमत्ता, आधिभौतिक शास्त्राचें ज्ञान व भांडवल या तिहींचा उपयोग प्रथम शेतकीकडे होतो त्यामुळें अर्थातच अमेरिकेसारखी उत्तम भरभराटीची व लाभकारक शेतकी पृथ्वीच्या पाठीवर दुसरीकडे कोठें पाहण्यास मिळत नाहीं. आमची जमीन सुपीकपणांत किंवा हवापाणी उत्कृष्टपणांत अमेरिकेला हार जाणारी नसतां इकडे शेती फलद्रूप होत नाहीं, व तीच अमेरिकेंत होते याला तशीच कारणें आहेत. या कारणांचा विचार करणें हा या लेखाचा उद्देश आहे. या कारणांपैकीं पहिलें व मुख्य कारण, आमच्या इकडच्या शेतकरी वर्गाचें अज्ञान हें आहे. आमच्या इकडचे शिकलेले लोक शारीरिक श्रम करण्यास असमर्थ व पराङ्मुख असल्यामुळें ते शेतकीसारख्या धंद्यांत पडत नाहींत, व त्यामुळें शेतकीचें काम अशिक्षित नांगऱ्यांचे हातीं गेलें आहे. त्यामुळें आज शेकडों वर्षें चालत आलेल्या शेतकीच्या पद्धतींत सुधारणा होत नाहीं. दरसाल पिकें देऊन देऊन निःसत्त्व झालेल्या जमिनीला केव्हां व कशी विश्रांति द्यावी किंवा तिला पौष्टिकद्रव्यें देऊन तिची सुपीकता कशी वाढवावी हें आमच्या शेतकऱ्यांना कळत नाहीं. पण तेच अमेरिकन शेतकरी पहा. ते शास्त्रीय ज्ञानाच्या योगानें नैसर्गिक अडचणी दूर करून जमीनीची सुपीकता वाढवीत आहेत. निःसत्त्व झालेल्या जामिनीला फास्फरस, नायट्रोजन, सोरा, वगैरे पुष्टिकारक द्रव्यें मृतपशूचीं हाडें, मलमूत्र वगैरेंच्या रूपानें पुरवून ते जामिनीचा सुपीकपणा वृद्धिंगत करीत आहेत. येवढ्यावरच त्यांचे प्रयत्न थांबले नसून राडिओकोला नांवाच्या उद्भि दाणू नायट्रोजनशून्य जामिनींत घालून अगदीं नापीक जमीन शस्यतृणश्यामला करण्यांत त्यांची अहमहमिका लागली आहे. याच्या पुढची पायरी ह्मणजे ज्याप्रमाणें देवी येऊं नयेत ह्मणून गोस्तन देवी, किंवा प्लेगची बाधा होऊं नये ह्मणून प्लेगची लस टोचतात, त्याप्रमाणें उत्तम जामिनींत तयार होणाऱ्या पिकांचीं पुष्ट बीजें त्यांची लस तयार करून नापीक जमिनींतल्या पिकांना टोंचून त्यांच्यांत पुष्टी आणणें ही होय. हा प्रयोग अमेरिकन लोकांनीं इतक्या पूर्णतेला नेला आहे कीं थोड्याच दिवसांत नापीक जमीन तेथें पाहण्यास तरी

मिळेल कीं नाहीं याची शंका वाटते. प्रत्येक शेतकऱ्याला शास्त्रीय प्रयोग करण्याची अवश्यकता न पडावी ह्मणून शास्त्रीय रीत्या तयार केलेलीं रासायनिक खतें आयतीं पुरविणाऱ्या मोठमोठ्या कंपन्या तिकडे निघाल्या आहेत. त्या शेतकऱ्यांना नुसतीं खतें विकत देतात इतकेंच नाहीं; तर नियमित फी घेऊन शेताची पाहणी करतात, व जमिनींतलें कोणतें पोषक द्रव्य कमी झाल्यामुळें पीक कमी येऊ लागलें आहे तें तपासून पाहून कोणतें खत वापरावें याबद्दल शेतकऱ्याला सल्ला मसलत देतात. आमच्याइकडे अशा तऱ्हेचा उपक्रम सरकारच्या शेतकी खात्यामार्फत नुकताच सुरू झाला आहे व तो सर्वथा अभिनंदनीय आहे. त्यापासून शेतकीला फायदा ही होत असल्याचें अनुभवास येत आहे. पण आमचे शेतकरी त्यांच्या शोचनीय अज्ञानामुळें सरकारच्या या योजनेचा पूर्ण फायदा घेण्यास असमर्थ आहेत. ही खेदाची गोष्ट ह्मटली पाहिजे. दुसरी गोष्ट—– अमेरिकेंत पुष्कळ शेतकरी संपन्न स्थितींतले असल्यामुळें तिकडे मोठमोठीं विस्तृत शेतें असतात. व या शेतांची नांगरणी वगैरे कामें वाफेच्या यंत्राकडून करविण्यांत येते. असें करणें त्यांना स्वस्त्यांत ही पडतें व यंत्रद्वारें हीं जड काबाडकष्टाचीं कामें करून घेतल्यामुळें तिकडच्या शेतकऱ्यांना शेतीचें काम इकडच्यासारखें कष्टदायक होत नाहीं. इकडची स्थिति अगदीं उलट आहे. आमचे शेतकरी बहुधा दारिद्री असतात. सावकाराचें घर पाहिल्या शिवाय नांगरणी, पेरणी, निंदाई, मळणी वगैरे खर्चाचीं कामें त्यांना करतां येत नाहींत. शिवाय त्यांचीं शेतें लहान असल्यामुळें वाफेचे नांगर वगैरे यंत्रांकडून असलीं कामें करवून घेण्यास त्यांना परवडत नाहीं. त्यांना अर्थातच हीं कामें स्वतः बैलाकडून करवून घ्यावीं लागतात व ते अर्थात् अधिक खर्चानें व अधिक कष्टदायक होतें. ही अडचण सहज दूर करतां येण्यासारखी नाहीं. पण ती दूर करण्याकडेस आपली प्रवृत्ति ठेविल्याशिवाय हिंदुस्थानच्या शेतीची सुधारणा होण्याला दुसरा माग ही दिसत नाहीं. अलीकडे दुष्काळांत गुरांचा संहार फार झाल्यामुळें शेत कामाला पुरेसे बैल मिळणें मुष्किलीचें झालें आहे. प्लेगला बळी पडून मजूर लोकांची संख्या ही कमी झालेली आहे. अशा स्थितींत यंत्राचें साह्य घेतल्याशिवाय आपलें निभावयाचें नाहीं, व यंत्रसाह्य घेण्यास भांडवल पाहिजे. यासाठीं शेतकाम करणाऱ्या संयुक्त भांडवलाच्या कंपन्या इकडे निघाल्या पाहिजेत व त्यांनीं लहान लहान शेतें खरीद करून मोठालीं शेतें संपादन केल्यावर वाफेचीं यंत्रें व शास्त्रीय पद्धतीवर शेती कशी करावी हे शिकविणारे अमेरिकन गुरु इकडे आणवून त्यांच्या सल्ल्यानें अमेरिकेच्या धर्तीवर इकडे शेतीचा धंदा केला पाहिजे. ही कालावधीची गोष्ट आहे खरी; पण आतांपासून हळूंहळूं शिकलेल्या व धनिक लोकांनीं तिकडे लक्ष घातल्यास कालांतरानें तरी ती गोष्ट साध्य होईल. व्यक्तिशः शेतीचा धंदा आतां दिवसेंदिवस कमी किफायतीचा होत चालला आहे हें उघड दिसतच आहे. तेव्हां अशा स्थितींत संघटित प्रयत्नावांचून आपल्या देशाच्या शेतीची उन्नति होईल अशी अपेक्षा न धरतां संयुक्त प्रयत्नानें ती साधणें हा शहाणपणाचा मार्ग आहे. संयुक्त प्रयत्नानें कार्य करण्याचें वळण परस्पर साह्यकारि मंडळ्यांची चळवळ हळूंहळूं लोकांना देऊं लागली आहेच. हेंच सहकारित्वाचें तत्त्व थोडेसें पुढें जाऊन एकदर शेतकीच्या उद्योग लावण्याचें धाडस लोकच्या पुढाऱ्यांनीं आतां करण्याचा काळ आला आहे. यावेळीं असें धाडस करून तें मोठ्या टापटिपीनें व युक्तीनें यशस्वी करून दाखविणें हें सध्या सुशिक्षित लोकनायकांचें कर्तव्य आहे.

## विचारशक्तिविशिष्ट यंत्र.

विचारशक्ति व स्मरणशक्ति या दोन गोष्टी सर्व प्राण्यांत मनुष्याच्याच आंगीं विशेषें करून असतात अशी पुष्कळांची समजूत आहे. पण अमेरिकेंतले एक इंजिनियर मि. एस. बेंट यांनीं असें एक यंत्र तयार केलें आहे कीं त्या यंत्राकडून विचार करणें, स्मरणराखणें, योग्यसमयीं योग्य काम करणें हीं कामें माणसाप्रमाणें अगदीं हुबेहुब घडून येतात ! हें यंत्र ह्मणजे डोकेंच ह्मटलें पाहिजे. कारण, माणसाच्या डोक्याला जशी त्याच्या ज्ञानेंद्रियांच्या द्वारें बाहेरून प्रेरणा होते, व ती प्रेरणा त्याच्या स्नायूंना चलन देऊन क्रिया घडविते, तसा सगळा प्रकार या यंत्रांत ही घडतो. फरक इतकाच आहे. कीं माणसाच्या डोक्यांत लक्षावधि स्नायुकोष असतात व या यंत्रांत एकच कोष आहे रोज एकाच मार्गानें जाणाऱ्या एखाद्या बोटीवर हें यंत्र ठेविलें असलें तर बोटीचा जाण्याचा मार्ग या यंत्राच्या स्मृतिकोषांत उठलेला दिसतो. इतकेंच नाहीं तर त्या बोटीच्या नेहमीच्या गतींत फेरबदल झाल्यास हें यंत्र मोठा आवाज करून आपणास त्याची जाणीव आहे हें दाखवितें. ज्याप्रमाणें अभ्यास नसलेली एखादी गोष्ट प्रथमच करतांना मनुष्य चुका करतें, पण अभ्यास झाल्यावर ती गोष्ट त्याच्या हातून बिनचूक होत जाते, तसेंच या यंत्राचें ही आहे. वारंवार अभ्यासानें त्या गोष्टीचा छाप या यंत्रावर ज्यास्त ज्यास्त दृढ पडतो; इतकेंच नाहीं तर मनुष्य ज्या प्रमाणें संकटाचे किंवा अडचणीचे प्रसंग मोठ्या विचारानें व युक्तीनें टाळून आपलें नेमलेलें काम सुरळीतपणानें करावयास पाहतो, त्या प्रमाणें हें यंत्र ही सगळ्या अडचणी टाळून सुरक्षित रीतीनें आपलें कार्य करण्याची धडपड करीत असलेलें आढळून येतें. या यंत्राला अद्याप पूर्णता आलेली नाहीं, तथापि ती आल्यावर विचारी माणसाची सगळीं कामें हें यंत्र करील अशी आशा आतां शास्त्रज्ञांना वाटूं लागली आहे.

## मराठींतलीं मासिक पुस्तकें.

विविधज्ञानविस्ताराच्या आगस्टच्या अंकांत रा. चाफेकर यांचा 'मराठी मासिकपुस्तकां' संबंधाचा गेल्या साहित्यसंमेलनासाठीं लिहिलेला निबंध साग्र आला आहे. रा. चाफेकर यांनीं ठळक ठळक मासिक पुस्तकांतल्या लेखांच्या सूचीचें विषयवारीनें वर्गीकरण करून सामाजिक, धार्मिक, वाङ्मयात्मक, औद्योगिक वगैरे विषयांवर कोणत्या मासिकांत किती लेख आले याचें कोष्टक तयार केलें आहे व त्यावरून आमचीं मासिक पुस्तकें (लोकशिक्षण व चित्रमयजगत् खेरीज करून बाकीचीं) आपापलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावीत नाहींत असा सिद्धांत काढला आहे. ही विचारपद्धति आमच्या दृष्टीनें अगदीं चुकीची आहे. कारण, निरनिराळ्या मासिक पुस्तकांच्या अवताराचा हेतु निरनिराळा असतो. त्या हेतू प्रमाणें त्याच्या हातून कार्य घडत आहे कीं नाहीं हें न पाहतां सर्वांना एका मापानें मोजणें हा अगोदर शहाणपणाचा मार्ग नव्हे. धर्म विचाराच्या मासिक पुस्तकांत औद्योगिक विषयावर लेख न आले तर त्याबद्दल त्याला दोष देणें न्यायाचें होणार नाहीं. दुसरी गोष्ट, रा. चाफेकर यांच्या वर्गीकरणांत कोठें चूक आहे कीं काय हें पाहण्याचें साधनही त्यांनीं लेखांचीं नांवें न देतां नुसते आकडे दिल्यामुळें ठेवलेलें नाहीं; आणि तिसरी गोष्ट त्यांनीं लेखांच्या योग्यायोग्यतेचा विचार न करतां नुसत्या आंकड्यावरून मासिकाच्या कार्याची योग्यता ठरविली आहे ती ही पद्धति दोषयुक्त आहे. लोकशिक्षण व चित्रमय जगत् हीं दोन्ही मासिकें आपआपलें काम चांगल्या प्रकारें बजावीत आहेत याविषयीं वाद नाहीं, व त्यांच्या विषयींचा हेवा ही इतर मासिककारांना वाटत नाहीं. पण इतर मासिकांकडे कमीपणा देऊन रा. चाफेकरानीं याच दोन मासिकांची जी स्तुति केली आहे ती केवळ 'आपला तो बाब्या' या ह्मणीची सार्थकता दाखविणारी आहे असें निष्पक्षपाताच्या दृष्टीनें पाहणारास सहज कळून येण्यासारखें आहे. नियामितपणाचे संबंधांत 'बालबोध' हा एकटाच आपलें कार्य चोख रीतीनें बजावीत आहे, अगर निदान रा. ओकांच्या वेळीं बजावीत होता, ही रा. चाफेकरांची माहिती साफ चुकीची आहे. नियामितपणांत बालबोधाची बरोबरी करणारीं आणखी दोन तीन मासिक पुस्तकें आहेत. पण रा. चाफेकरांची दृष्टि पक्षपातानें अंध झाली असल्यामुळें त्यांना तीं दिसलीं नाहींत. असले एकतर्फी लेख आपल्या आवडत्या मासिक पुस्तकांची जाहिरात ह्मणून रा. चाफेकरांनीं पाहिजे तर लिहावे, पण साहित्यसंमेलनाच्या व्यवस्थापकांच्या सौजन्याचा फायदा घेऊन त्यांच्या खर्चानें आपल्या मित्रांची ही जाहिरात फुकट महाराष्ट्रवाचकांत वाटण्याचा प्रयत्न करणें आमच्या दृष्टीनें निंद्य आहे.

## खरें राष्ट्रीयत्व.

व्हाइसराय साहेबांच्या एक्झिक्युटिव्ह कौंसिलचे हिंदी मेंबर ना. सर अली इमाम यांच्या नोकरीची मुदत संपत आल्यामुळें सिमल्याच्या हिंदी रहिवाशाकडून त्यांना मेजवानी देण्यांत आली होती. त्यावेळीं झालेल्या भाषणांवरून हिंदी राष्ट्रपुरुषाच्या देहांत कोणत्या प्रकारचें रक्त खेळूं लागलें आहे याचा अजमास कोणालाही करतां येईल. ब्रिटिश सत्तेविषयीं संशयातीत राजनिष्ठा हें त्या रक्तांतलें महत्त्वाचें घटक आहे. पण त्याच्याच इतकी महत्त्वाची दुसरी महत्त्वाची गोष्ट ह्मणजे राष्ट्रीयत्वाची भावना ही आहे. हिंदुस्थानांत निरनिराळ्या जाती आहेत. कारणपरत्वें त्यांच्यांत तीव्र मतभेद होऊन प्रसंगाविशेषीं ते विकोपालाही जातात. पण या तीव्र मतभेदाचा स्पर्श हिंदु व मुसलमान या दोन्ही जातींतल्या पुढाऱ्यांच्या मनाला स्पर्श करीत नाहीं ही गोष्ट फूट पाडून राज्य निर्वेध करूं पाहणाऱ्या आंग्लोइंडियन पत्रकर्त्यांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. सर अली इमाम हे जातीनें मुसलमान असले तरी भावनेनें ते हिंदी आहेत. अगोदर हिंदी, मग मुसलमान हा भाषणसंप्रदाय प्रचारांत आणणारे पहिले गृहस्थ ह्मणजे परलोकवासी न्यायमूर्ति बद्रुद्दिन तय्यबजी होते. पण जातीपेक्षां एकराष्ट्रीयत्वाची भावना विशेष प्रबळ आहे, आणि तिचा पगडा सर अली इमाम सारख्या थोर मनाच्या पुरुषावर पूर्णपणें बसला आहे. हें महत्कार्य घडवून आणण्याचें श्रेय कांग्रेससारख्या सगळ्या हिंदीराष्ट्राचें एकीकरण करणाऱ्या संस्थेला दिलें पाहिजे. ना. सर अली इमाम यांनीं या राष्ट्रीय भावनेचें जें स्वरूप आपल्या भाषणांत वर्णिलें त्याहून अधिक चांगलें वर्णन किंवा उच्चतर ध्येय कोणालाही श्रोत्यांपुढें मांडतां येईल असें आह्मांला वाटत नाहीं. ते ह्मणाले—राष्ट्रीयत्वाच्या खऱ्या अर्थासंबंधानें कित्येकांच्या भलभलत्या समजुती झाल्या असल्यापुढें तो शब्द उच्चारतांच कित्येक बिचकतात. राजकीय चरित्र्याचा पाया राजाविषयीं दृढ निष्ठा, ब्रिटिश सत्तेविषयीं अभिमान, आणि स्वदेशाविषयीं प्रेम या तीन गोष्टीवर बसविलेला असावा, आणि या ध्येयापुढें विशिष्ट जातीचें किंवा पंथाचें हित विसरून जाऊन सगळ्या देशाचें जें हित तेंच सर्व जातीचें व पंथाचें हित अशी भावना मनांत बाणावी, याचें नांव खरें राष्ट्रीयत्व. ही राष्ट्रीयत्वाची उच्च भावना ठेवून सर्वांनीं एक दिलानें वागावें यांतच हिंदुस्थानचें कल्याण आहे. तसें न केल्यामुळें परवा संयुक्त प्रांताला एक्झिक्युटिव्ह कौंसिल देण्याला जे विरुद्ध होते त्यांना फावलें व हिंदुस्थानची मोठी हानि झाली, असें सांगून व लॉर्ड हार्डिंज यांच्या सारखा हिंदुस्थानाविषयीं खरी सहानुभूति बाळगणारा व्हाइसराय कोणी झाला नाहीं, असें बोलून ना. सर अली इमाम यांनीं आपलें भाषण संपविलें.

# युद्धवृत्त.

गेल्या पंधरावीस दिवसांत पूर्वेकडील रणक्षेत्रावरची महत्त्वाची बातमी ह्मणजे राशीयाची जयपरंपरा ही आहे. दक्षिणेकडे डेराजनो हें शहर घेण्याचा अटोकाट यत्न जर्मनीनें केला व कांहीं काळ त्यांत प्रवेश ही केला, पण राशीयन फौजेनें त्यांना तेथून हुसकावून लाविलें. स्ट्रिपा नदीपाशीं ही अनेक गांवांतून जर्मन लोकांना पळ काढावा लागला. या दोन्ही ठिकाणां मिळून ११००० जर्मन कैदी राशीयाच्या हातीं लागले. राशीयाला फौजेची कमताई कधींच वाटावयाची

नाहीं. याला प्रत्यक्ष प्रमाण ह्मणजे आज ८० लाख फौज राशिया खडी करूं शकत असतां त्यांतली फक्त २० लाख फौज त्यानें बोलाविली आहे हें आहे. त्याला भीती आहे ती निराळीच आहे. जर्मन सोन्याचा मोह सैतानासारखा राशियन लष्करी अंमल्दारांना कर्तव्यपराङ्मुख करील कीं काय अशी भीती वाटूं लागली आहे. ही भीती वाटण्यास नुकतेंच एक कारण घडलें आहे. कर्नल मसायेडॉफ नांवाचा एक अंमल्दार खुद्द झार साहेबापाशीं त्यांचा रक्षक ह्मणून होता. अर्थात् तो राशियन बादशहानें अत्यंत विश्वासुक समजून जवळ ठेवलेला होता. पण त्या गुलामानें जर्मन सोन्याच्या मोहाला बळी पडून आपल्या मालकाशीं बेइमानी केली. तो जर्मनीकडून गुप्तरीतीनें पगार खाऊन राशियाची वित्तंबातमी बार्लिनला पोंचवीत असे. ही गोष्ट त्यानें आतां स्वतःच कबूल केली आहे एकदां वार्सापाशीं असलेलें जर्मन सैन्य राशियाच्या कचाट्यांत सांपडलें असतां त्या सैन्याचा नाश करण्याविषयींचा हुकुम या गुलामानें मधल्यामध्यें कित्येक दिवसपर्यंत दाबून ठेवला व त्यामुळें जर्मन सैन्य बचावलें. अशा या देशद्रोही नराधमाला देहांत शिक्षा झाली, ती योग्यच झाली. पण असे मसायेडॉफ राशियन फौजेंत आणखां किती असतील कोणाला ठाऊक!

---

इटालियन शिपायांची चपळता व धाडस खरोखर प्रशंसनीय आहेत. नऊ हजार फूट उंचीचे डोंगर ते हां हां ह्मणतां सरसर चढून जातात. वाटेंत खोल दऱ्या आल्या तर त्यावर पूल टाकून त्यांतून ते केव्हांच पार निघून जातात, आणि शत्रूवर छापा घालून त्यांचे खंदक सर करतात. अशा धाडशी, चपळ व कर्तृत्ववान् लोकांनीं आस्ट्रियन लोकांना पुरेपुरेंसें करून सोडलें आहे यांत नवल वाटण्याजोगें कांहीं नाहीं.

---

लंडनच्या भोंवतालच्या प्रदेशांत मधूनमधून जर्मन विमानें संचार करून बाँब टाकून स्त्रीहत्या व बालहत्या यांच्या पातकांचा संचय करीत असतात. यापेक्षां विशेष कामगिरी आजपर्यंत त्यांच्या हातून कोणतीच झालेली नाहीं. इंग्लंडमध्यें गेल्या आठवड्यांत घडलेली विशेष गोष्ट ह्मणजे पार्लमेंट मध्यें मि. ॲस्किथ व लॉर्ड किचेनर यांनीं युद्धासंबंधानें केलेलीं भाषणें होत मि. अस्किथ यांनीं सैन्याच्या भरतीच्या संबंधांत आजपर्यंत कधीं न केलेला एक खुलासा केला. इंग्रजी सैन्यांत आतांपर्यंत जवळ जवळ ३० लक्ष माणसांची भरती केली गेली असें मि. ॲस्किथ यांनीं सांगितलें. त्यांचें भाषण अत्यंत उत्साहजनक होतें. एकच गोष्ट जराशी खेदानें त्यांनीं सांगितली. आणि ती ही कीं अलीकडे सैन्यांत भरती होण्यासाठीं पूर्वींच्याइतकी संख्या येत नाहीं. लॉर्ड किचनेर यांनीं याचवेळीं लार्डसच्या सभेंत सैन्याच्या भरती संबंधाचा प्रश्न हा लवकरच सोडवावा लागेल असें उद्गार काढले, या दोन्ही बड्या अधिकाऱ्यांच्या भाषणांतील सादृश्यावरून लोक निरनिराळीं अनुमानें काढूं लागले आहेत. आणि सक्तीची लष्करी सेवा करण्याबद्दलचा प्रश्न आतां जोरानें लवकरच पुढें येईल असें ही कित्येक ह्मणत आहेत. पण या संबंधांत रूटरनें तारेनें पाठविलेली बातमी इतकी त्रोटक आहे कीं त्यावरून तूर्त इकडे तरी खात्रीचें असें कांहींच अनुमान काढतां येण्यासारखें नाहीं.

---

## इतर बातम्या.

पुणें शहर म्युनिसिपाल्टीचे प्रेसिडेंट सरदार नौरोजी पदमजी यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिल्यामुळें त्यांचे जागीं रा. हरि नारायण आपटे यांची नेमणूक बहुमतानें झाली आहे. ‘करमणुक’ बिचारी त्यांच्या प्रेमाला अंतरत चालली आहे.

यंदाच्या मुंबई येथें भरणाऱ्या सामाजिक परिषदेचे अध्यक्ष प्रो. धोंडो केशव कर्वे हे होणार आहेत. परिषदेला यांच्या इतक्या योग्यतेचा मनुष्य अध्यक्षस्थान स्वीकारण्यास क्वचितच मिळाला असेल.

मद्रास हायकोर्टाचे माजी चीफ जास्टिस सर आर्थर कॉलिन्स यांचे मृत्यूबद्दल मद्रास हायकोर्टाला एक दिवस सुटी मिळावयास पाहिजे होती. पण सध्याचे चीफ जास्टिस यांनीं ती दिली नाहीं; इतकेंच नाहीं, तर मृत पुरुषाच्या सन्मानार्थ दुःखपर भाषणें ही करूं नयेत, अशी मनाई केल्यावरून तेथील वकील व ब्यारिस्टर यांनीं निराळ्या सभा भरवून चीफ जास्टिस साहेबांच्या या मनाईच्या निषेधाविरुद्ध ठराव पास करून तो त्यांच्याकडे पाठविला.

मध्यप्रांताची प्राव्हिन्शियल कॉन्फरन्स यंदा उमरावतीस भरणार होती, पण तेथें प्लेग असल्याकारणानें ती नागपुरास भरवावी व राष्ट्रीय सभेच्या घटनेचे पहिल्या कलमावर सही करणारास त्या कान्फरन्समध्यें घेण्यांत यावें असा ठराव या कान्फरन्स संबंधानें डा. गौर यांच्या बंगल्यावर भरलेल्या सभेंत ठरलें. ही कान्फरन्स अर्थात् संयुक्त होईल असा रंग दिसतो.

परलोकवासी ना. गोखले यांच्या स्मारकफंडासाठीं नेमलेल्या कमिटीनें गोखले यांचा एक पुतळा दिल्ली शहरांत उभारावा व त्यांच्या प्रिय संस्थेसाठीं ( सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी साठीं ) एक कायमचा फंड उभारावा ह्मणून पांच लाख रुपयाचा फंड उभारणें अवश्य आहे असें जाहिर केलें आहे व त्यासाठीं सगळ्या हिंदुस्थानच्या लोकांना वर्गणी देण्याविषयीं कळकळीची विनंती केली आहे.

सिंध हैद्राबाद येथील म्युनिसिपालिटीनें सरकारनियुक्त म्युनीसिपल कमिशनर व घरपट्टी यांचा स्वीकार करावा, नाहींपेक्षां त्या म्युनिसिपालिटीचे अधिकार काढून घेण्यांत येतील असें मुंबई सरकाराकडून त्या म्युनिसिपालिटीला लिहून गेलें आहे.

संयुक्त प्रांतांत हिंदु व मुल्मान यांच्यात जें तेढें आहे त्यामुळें त्या प्रांताला एक्झिक्युटिव्ह कौंसिल मिळण्याची संधी प्राप्त झाली असतां दुर्दैवानें तें मिळालें नाहीं, या गोष्टीवरून तेथील लोक शहाणे झाले आहेत, व त्यांनीं येत्या दिसेंबर महिन्यांत लखनौ येथें हिंदु व मुसलमान यांची संयुक्त एज्युकेशनल कान्फरन्स भरविण्याचें ठरविलें आहे. या कान्फरन्सचा उद्देश सरकारच्या शिक्षणविषयक धोरणाची चर्चा करून त्यावर लोकमताचा प्रकाश पाडणें हा आहे

इंदूर संस्थान हें मराठ्यांचें संस्थान असतां तेथें कौन्सिलच्या कारकीर्दींत मराठी भाषेचें उच्चाटन होऊन हिंदी भाषेनें ती जागा पटकाविली व अजून ही हिंदी भाषेचें घोडें पुढें ढकलण्याचे प्रयत्न कांहीं चळवळ्या लोकांनीं चालविले आहेत. अशा वेळीं मराठी भाषेच्या योग्य हक्कांचें संरक्षण करावें व संस्थानांतल्या मराठी लेखकांना उत्तेजन द्यावें या हेतूनें तेथें महाराष्ट्र–साहित्य–सभा नांवाची एक संस्था स्थापन करण्याचें ठरून त्यासाठीं गेल्या शनिवारीं इंदुरास टाउनहॉलांत जाहिरसभा भरली होती. श्रोतृसमाज एक हजारावर होता. अध्यक्षस्थान दिवाण बहादूर गोविंदराव खांडेकर चीफ मिनिस्टर यांनीं स्वीकारलें होतें. संस्थानांतले बहुतेक महाराष्ट्रीय अधिकारी या संस्थेला मदत करीत आहेत. यां सभेंत पुण्याचे मुमुक्षुकर्ते रा. पांगारकर यांचे ही महाराष्ट्र वाङ्मय या विषयावर भाषण झालें. या संस्थेचे सेक्रेटरीचे जागीं रा. वासुदेव गोविंद आपटे व प्रोफेसर देव यांना निवडण्यांत आलें. इंदुरांत अशा प्रकारची जागृति पहिल्यानेंच होत असल्यामुळें ती सर्वथा अभिनंदनीय ह्मटली पाहिजे.

गोखले स्मारक फंडास नामदार व्हाइसराय साहेबांनीं दोनहजार रुपये वर्गणी दिली. इतर युरोपियन अधिकारी ही नामदार साहेबांच्या या उदार कृत्याचें अनुकरण करतील अशी उमेद आहे.

ब्रह्मदेशांत जवानसिंग नांवाच्या एका सरकारी पेनशनरानें आपली मासिक ८ रु. १२ आणे ११ पै ची रकम युद्धफंडाला देऊन टाकली आहे. हा खरा देशाभिमानयुक्त स्वार्थत्याग ह्मणावयाचा!

१८१२ च्या कायद्या अन्वयें बंगाल्यांतल्या सात जणांची सरकारनें उचलबांगडी केली आहे. यांना कोठें पाठविलें तें अद्याप बाहेर आलें नाहीं.

मद्रासटाइम्स पत्राचे सहकारी संपादक मि. रामस्वामी यांनीं आपणांस दहा वर्षांच्या करारानें आणिलें असतां निष्कारण कामावरून दूर केल्याबद्दल त्या पत्राच्या डायरेक्टरांवर ३७ हजार रुपयांचा दावा आणिला आहे.

---

## वैकुंठ गमन.

### ( श्री गुलाबराव महाराज यांचें देह विसर्जन. )

पुणें येथें गेल्या १९ व्या तारखेला आमच्या वऱ्हाडचे प्रसिद्ध साधुवर्य श्रीगुलाबराव महाराज यांस क्षयाच्या व संग्रहणीच्या आजारानें देवाज्ञा झाली हें ऐकून त्यांच्या पुष्कळ भाविक शिष्य मंडळीस विशेष हळहळ वाटेल. एलिचपूर जिल्ह्यांतील माधान या गांवचे हे मूळचे रहाणारे. बालपणींच यांचे डोळे गेले. आणि त्यानंतर आज ३४ वर्षांचा कालक्रम इतका विलक्षण आहे कीं त्यांची गणना साधुकोटींत करीत असतात. यांना इंग्रजी, मराठी, संस्कृत, हिंदी हीं चांगलीं येत असत. अंध कुणबी मनुष्य किती विद्या व कशी संपन्न करील या संबंधांत यांचें चरित्र हें जगास उत्तम उदाहरण होय. त्यांची धारणाशक्ती अद्वितीय होती आणि त्यामुळें त्यांना कित्येक ग्रंथ मुखोद्गत असत. यांची वाणी प्रासादिक असून तीमध्यें विशेष माधूर्य असे. हे चांगले कवि ही असत. त्यामुळें प्रापंचिक मंडळीस परमार्थाचा मार्ग दाखवून त्यांनीं आपला संप्रदाय विशेष विस्तृत केला आहे. डोळ्यांच्या पंगुपणामुळें त्यांची शारीरपष्टी चांगलीशी रहात नसे आणि ह्मणूनच इतक्या थोड्या काळांत त्यांची कारकिर्द संपली.

---

## वऱ्हाडवृत्त.

**हवामानः**—उत्तरा नक्षत्राचा कांहीं कांहीं ठिकाणीं पाऊस थोडा थोडा झाला आणि आतां अवश्यक पर्जन्यासाठीं हस्त नक्षत्राकडे लोकांची दृष्टी आहे. पिकें चांगल्या स्थितींत आहेत.

**प्लेगाचा कहरः**—आकोल्यास सर्व ठिकाणीं व निरनिराळ्या क्यांपामधून ही हा रोग पसरला आहे. दररोजच्या मृत्यूचें प्रमाण २० व त्याहून अधिक असतें. जठार पेठेंत प्लेग सुरु झाल्यामुळें तेथूनही लोकांस सैरावैरा इतरत्र जावें लागत आहे. प्लेगाच्या देवी काढून ही बचाव होत नाहा आणि खरा एकच उपाय ह्मणजे दूषितभागाचा त्याग हा होय. दिवाणी कचेऱ्यांच्या बाजूला प्लेगाचे मृत्यु झाल्यानें सार्वजनिक कल्याणासाठीं कचेऱ्या बंद ठेवाव्या ह्मणून येथील वकील मंडळीनें नागपुरास ताराही केल्या आहेत. कचेऱ्यांकडील भाग दूषित आहे.

---


## आठ आण्यांत लूट.

( खालील सर्व बुकें फक्त आठ आण्यास मिळतील, )

१ **कोकविद्या**—सचित्र व समग्र कोकशास्त्र.

२ **रसायनविद्या**-सोनें चांदी कमावण्याची युक्ति

३ **मंत्रविद्या**—मंत्रसिद्धीच्या योगानें सर्व रोग बरे करणें.

४ **मृताशीं** संभाषण करण्याची युक्ती.

५ **गानविद्या**—गायनासंबंधीं शिकण्याची विद्या.

**वशीकरण**—विद्या.

**पत्ता**—स्पष्ट व बाळबोधींत लिहावा.

प्रयाग नरायण अग्रवाल अलीगड सिटी.


## जाहिरात

खालीं सही करणार यांजकडून जाहिर करण्यांत येते कीं, तारीख १९-९-१९ रोजीं वाघोडी ता. आकोट येथें आकोल्याहून जातांना खालील प्रमाणें दस्तैवज खिशांतून कोठेंतरी रस्त्यानें पडले आहेत. ज्या कोणास सापडले असतील. त्यांनीं ते सर्व दस्तैवज आणून दिल्यास रुपये १० इनाम देण्यात येईल. सदर्हुबद्दल पोलीसला रिपोर्ट दिला आहे. ता. २१-९-१९

| रकम | धनको | रिणको |
|---|---|---|
| ६०० गहाणखत बलदेवदास | | गुणाजी लुकाजी रा बोर्डी |
| ८०० गहाणखत रामगोपाळ | | सिताराम हरकाजी रा. बोर्डी |
| १०० कर्जरोखा रामगोपाळ | | मनवरअली अबासअली |

सही बलदेवदास जैनारायण मारवाडी रा० नो०नं० ३६६ बोर्डी द. खु.

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रासिद्ध केलें.